# ग्रंथपान

ग्रंथाच्या शिर्षावर शीर्षकाचा टिळा पाहूनच दचकायला झाले. संत आणि विद्रोह? काहीतरीच. संत म्हटले की आपल्या नजरेसमोर उभी राहते ती सोज्वळ, सात्विक, सगुण निर्गुणाची छायेने भारलेली मूर्ती. देवाच्या सान्निध्यात राहणारी, आणि त्याच्याच भजनात तल्लीन झालेली. त्याचेच वर्णन करणारी, भक्तीचा संदेश देणारी. ती विद्रोह करील कशी? तू जेवणार नसलास तर मी... असा नामदेवाने हट्ट धरल्याचे वाचले होते. पण विद्रोहाच्या वाटेला जाईल असे स्वप्नातही वाटले नव्हते. टाळ –मृदंग –टाळ–अभंगातून ते काय करणार विद्रोह, असाच आपला समज. पण याच शीर्षकाने कुतूहलही निर्माण केले. म्हटले, चला पाहूया चाळून. एक पायरी चढून डोकवायचे ठरवले, आणि सगळ्या पायऱ्या पार करून कधी गाभाऱ्यात विसावलो, ते कळलेच नाही. जी वाट अनोळखी वाटत होती, तिला आपण किती वेळेस पायाखाली घातले होते,परंतु ओळख पटली नव्हती. ती ओळख करून दिली ती या ग्रंथाने. आणि हेही लक्षात आले, पाहण्याची नजर एकदा तयार झाली की, तिला दुसरी बाजू दिसत नाही. परंतु दुसरी बाजू देखील तितकीच प्रभावी असते, हे प्रभावीपणाने जाणवले ते या ग्रंथाने.




संतसाहित्याचा गाभा म्हणजे परमार्थ, मोक्ष, अध्यात्म, भक्ती आणि सगुणनिर्गुण. भजन, कीर्तन, व्याख्यान, पाठ, पारायणे यात जे अभंग आले, गायले गेले, गायले जातात, ते सारे रस याच गाभ्यातून पाझरलेले असतात. त्यांच्याशी असलेली तादात्म्यता, त्यांची अमृतमयता वादातीतच. परंतु ते तेवढेच नाही. त्याच्याजोडीला आणखीही काही आहे, ज्याकडे पाहिले गेले ते वरवरचे. त्यालाही गाभा आहे विरोध, बंड, आंदोलन, द्वेष, शत्रुत्वाचा. आक्रमकतेचा, तुलनेचा. त्यालाही आकार दिला आहे, तो याच संतांनी.

माझा मऱ्हाटाचि बोलू कवतिके। अमृतातेही पैजा जिंके । अशी भूमिका ज्ञानदेव घेतात, तेव्हा ते प्राकृताची बाजू घेतात. वाड्.मयीन आणि भाषिक विद्रोह व्यक्त करतात, कारण संस्कृत हीच ग्रंथांची भाषा, जी देवाने निर्माण केली म्हणून देवभाषा. मग प्राकृतचे काय? लोकभाषाही देवभाषाच आहे, असे ते ठामपणे प्रतिपादन करतात. हा विद्रोह केवळ भाषेपुरता नाही, तर वर्णव्यवस्थेविरूद्धही आहे. कारण वैदिक परंपरेने लिहिण्या–बोलण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांनाच होता. इतरांनी तसा प्रयत्न करणे म्हणजे धर्मद्रोह होता. तो धर्मद्रोह या संतांनी केला आहे, प्राकृतात वाड्मयनिर्मिती करून. ही निर्मिती करणारे संत हे म्हणजे नामदेव, चोखमेळा, सावता माळी, तुकाराम, गोरा कुंभार, नरहरी सोनार हे आहेतच परंतु सेना न्हावी, माणकोजी बोधले, जनाबाई, बहिणाबाई, सोयराबाई, बंका, निर्मळा, कर्ममेळा, जोगा परमानंद, कान्हो पाठक, सच्चिदानंद बाबा, केशवदास चांगा, बहिरा पिसा, कान्होपात्रा, दादू पिंजारी, लतीब शहा,सजन कसाई, शेख महंमद, विसोबा खेचर... हे सर्वच ब्राह्मणेतर आहेत, बहुजन समाजातून आलेले आहेत. त्यांचा हा द्रोह आहे, हे आपल्याला गोचर होते, ते या ग्रंथातून.

या सगळ्याच सतांच्या वाड्मयनिर्मितीचा काळ हा अधिक महत्त्वाचा घटक आहे. त्यावेळची सामाजिक परिस्थिती, वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, धर्माचे स्तोम, कर्मकांड, सोवळेओवळे, बहुदेवतावाद यांचे स्तोम माजलेले होते. देऊळबंदी होती. तरीही विठ्ठल आणि त्याची भक्ती हाच ध्यास सर्व संतांनी जोपासला. परंतु त्यात हेही आग्रहाने प्रतिपादन केले, ईश्वर एकच आहे. तो प्रत्येकाच्या अंतःकरणात आहे. तीर्थक्षेत्री जाऊन शुद्ध होण्यापेक्षा मनाची शुद्धता हेच तीर्थक्षेत्र. भक्तीसाठी जात आडवी येत नाही. याचा समावेश होतो तो भक्ती आंदोलन.

याचेच उच्छिष्ट महार मेळसेवी। त्या सवे नित जेवी पांडुरंग। असे शेख महंमद म्हणतात.

कुळ जाती वर्ण हे अवघेचि गा अकारण।
हे ज्ञानेश्वर महाराज आवर्जून सांगतात.
तै आम्हा येणे घडे । संसारस्थिती ।
एकनाथ महाराज सांगतात,
चोखा म्हणे मजा नवल वाटते। विटाळापरते आहे कोण?
न लगे भुक्ति मुक्ति वैकुंठिचा वास। सुखे पंढरीस राहीन देवा।

अशा अनेक अभंगांचा संदर्भ देत लेखकाने संतांच्या विद्रोहांचे स्वरूप वाचकांच्या समोर उलगडून ठेवलेले आहे. फुलांची एकेक पाकळी उलगडून दाखवावी तशी. काही वेगळे सापडल्याचा आनंद होतो, नव्याने अर्थ लागल्यासारखा.

ग्रंथाची मांडणी सहा प्रकरणात करण्यात आलेली आहे. नामदेव, तुकाराम, ज्ञानेश्वरबंधू, संतमेळा यांच्यासाठी स्वतंत्र प्रकरणे दिलेली आहेत. तर एकनाथ,भानुदास, जनार्दन स्वामी यांच्यांसाठी एक प्रकरण आहे. संतांच्या विद्रोहाची मांडणी करताना लेखकाने केवळ विद्रोह दर्शविणारे अभंग उद्धृत केलेले नाहीत, संतांचा काळ, सामाजिक व्यवस्था, त्यांची माहिती, प्रत्येकांची वैशिष्ट्ये देखील सांगितलेली आहेत. अभंगांची पार्श्वभूमी स्पष्ट केलेली आहे. विषयाचा गोळीबंद आकृतीबंध साकारला आहे, तसा भाषेचा डौलही सांभाळलेला आहे. टाळ आणि मृदंगाचा मेळ साधल्यासाखा. संतदर्शनाचा सात्त्विकपणा मुखपृष्ठावर पुंडलिक वझे साकारला आहे.

- **मूल्य ३५० रु. सवलतीत २२० रु.**

## ग्रंथपान

कादंबरी ही वाद्यवृंदासारखी असते. अनेक वादकांच्या समन्वयिक प्रयत्नातून जसा सूर निर्माण होतो, तसेच विविध पात्रांच्या देवाणघेवाणीतून कथानक गुंफले जाते. पण त्यासाठी लेखकाला कादंबरीचा संपूर्ण विषय कवेत घ्यावा लागतो. त्या विषयात खोल उडी मारल्याशिवाय ते शक्य नसते. असे मत व्यक्त करताना, आपल्या साहित्यकृतीतून जे सादर करायचे आहे, ते काय आणि कसे, याचे भान लेखकाला आहे, हे स्पष्ट होते. त्यामुळे दोन घटक समोर येतात. त्याच्या साहित्यकृतीत अनेक पात्रे असतील हे ओघानेच आले. आणि जे सांगायचे आहे, त्या भूमिकेचा आवाका त्याने खोलवर शोध घेऊन सर्वांगिनरीतीने आपल्या कवेत घेतला आहे. त्यात लेखकाला आलेले यश कितपत आहे, हा विचार त्यानंतरचा.




'पराकाष्ठा' नावाची ही कांदबरी आहे. म्हणजेच लेखकाला जे सांगायचे आहे,त्यासाठी निवडलेला हा एक साहित्याचा प्रकार. बाळ जन्माला आल्यानंतर त्याच्यासाठी कुठला पाळणा वापरायचा, हे पालकांच्या आवडीनुसार आणि कुवतीनुसार आधीच ठरलेले असते,तसा. डॉ. अनंत लाभसेटवार हे स्वतः प्रथितयश लेखक आहेत. जवळपास पंचवीस पुस्तकांचा खजिना त्यांच्या नावावर आहे. (ते स्वतः बँकेचे मालक आहेत, तेही अमेरिकेत, तरी ते वगळून) त्यांच्या कुशल लेखणीतून सिद्ध झालेली ही लालित्यपूर्ण साहित्यकृती. ते स्वतः अमेरिकेत दीर्घकाळापासून वास्तव्याला असल्याने तिथली पात्रे, त्यांची भाषा, संस्कार, चालीरीती, वातावरण हे सर्व त्यांच्या साहित्यातून व्यक्त होणारच. कॅन्सास, कोलंबिया ही दोन टोकाची शहरे निवडलेली आहेत. संस्कृती, चालीरीती वेगवेगळी असलेली. तशी माईक, सू ॲन, बॉब, जेरी, क्लरिसा, सॅब्रीना, सिंप्सन, टॉम, हेदर, फ्रेड, हेन्री, स्टॅन अशी कितीतरी पात्रे आलेली आहेत. त्यांचे प्रत्येकाचे वेगळेपण यात ठसठशीतपणे जपलेले आहे. आणि त्याचवेळी दुसरे टोक आहे भारतातले. तिथली सरस्वतीदेवी, अक्षयकुमार, देवी, रामसिंग, कमलादेवी, चंद्रा, भरतसिंह, अर्जुन, यांच्यासारखी पात्रे आहेत. अशा दोन भौगोलिक आणि सांस्कृतिक भेद असलेल्या टोकांचे मिलन आणि परस्पर भिन्नता यांचे दर्शन म्हणजे ही कादंबरी.

दिल्लीत घडलेली निर्भयाची क्रूर घटना ही मध्यवर्ती ठेवून अक्षयकुमार आणि देवी या जोडप्याची कथा आहे. देवीशी लग्न करून कामाधंद्यासाठी बिहारमधून दिल्लीला आलेला अक्षयकुमार या प्रकरणात तुरुंगात रवाना होतो. आणि देवीच्या आयुष्याची परवड सुरू होते, तीही काखेत लहान मूल घेऊन. ती पुढे कशी वेगवेगळी वळणे घेते, याचे वर्णन करताना लेखकाने कथेतली उत्कंठा कुठे खंडित होणार नाही, याचे कसब जपलेले आहे. तर माईक हा कॅन्सासमधील मुलगा शिक्षणासाठी कोलंबिया विद्यापीठात जातो. कॅन्सास हा त्यांच्या दृष्टीने ग्रामीणता असलेला भाग. तर कोलंबिया हा उच्चभ्रूंचे मोहरघर असलेला भाग. या कोलंबियात आल्यानंतर त्याची जी वाटचाल होते, त्यात त्याचा, त्यालाच नव्हेतर त्याच्या वडिलानाही अपरिचित असलेला, सावत्रभाऊ बॉब भेटतो. विद्यापीठात जेरी नावाची मैत्रीण भेटते. आणि त्यातून त्याचे शिक्षण, मैत्री, एकनिष्ठा, प्रेम, आणि प्रगती यांचे वर्णन येते. हे वर्णन सुद्धा शेवटपर्यंत वाचकाची उत्सुकता ताणून धरण्याची ताकद असलेले.

या दोन टोकाच्या पात्रांच्या समन्वयातून दोन्ही देशातील चालीरीती, संस्कार, परंपरा यांचे बारकावे दाखवण्यात आलेले आहेत. विशेषतः तिकडे असलेली लग्न व्यवस्था आणि मुक्त व्यवस्था, ग्रामीण आणि उच्चभ्रूंमध्ये असलेली कुटुंब व्यवस्था, आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन, पार्ट्या, डेटस्वर जाणे, एकमेकांपासून विभक्त होणे, पुन्हा जोडले जाणे, आणि स्वतः इतरांपेक्षा अधिकाधिक वरचढ होण्यासाठी सतत प्रयत्नशील असणे, अशा अनेक बारकाव्यांची नोंद घेत लेखकाने तिथल्या एकूण जीवनाचा वेध घेतलेला आहे. त्याचवेळी आपल्याकडील कर्मठ परंपरा, चालीरीती यांचेही बारकावे लेखकाने सुक्ष्मपणे टिपलेले आहेत. विशेषतः माणुसकी आणि मदत करण्यातले मोठेपण. आधार देण्याची वृत्ती. निराधार महिलाश्रमातील वातावरण आणि शेवटचा मुद्दा, जो हल्ली बराच वादात आहे, तो म्हणजे सरोगसी. लेखक स्वतः या विषयात पारंगत असल्याने, त्यातल्या सर्व बाजू त्यांनी अतिशय नाजूकपणे उलगडून दाखवलेल्या आहेत.

दोन ध्रुवांचा समन्वय साधताना त्यांच्या भाषेचा प्रश्न हा सगळ्यात महत्त्वाचा आणि तितकाच अलवार. कादंबरी मराठी भाषेत आहे, परंतु वातावरण इंग्रजी. निवेदन हे प्रमाणभाषेत असावे हा संकेत. तसा बोलीभाषा ही त्याच ढंगात आणि भाषेत यावी, हाही संकेत. तरीही बोली भाषा सांभाळताना संपूर्ण इंग्रजीमधून संवाद देणे अनुचित ठरणारे होते. हा धोका टाळताना लेखकाला बरीच तारेवरची कसरत करावी लागली असणार, हे स्पष्टच आहे. मराठीवर आक्रमण होणार नाही आणि इंग्रजीला डावलले असेही होणार नाही याची चोखपणे काळजी लेखकाने घेतल्याची दिसून येते. अमेरिकासारख्या परमुलखात राहूनही त्यांनी आपल्या माध्यमावर कुठेही परकीय भाषेचे अवास्तव आक्रमण होऊ दिलेले नाही. लेखनातले लालित्य आणि रंजकता दोन्हीही उत्तमपणे साभाळलेली आहे. त्याचे उदाहरण पाहायचे तर ते असे, 'चुलीत धूर, बोहल्यावर चढणे, दोनाचे चार हात होणे, अळूच्या पानावरील पाण्याचे थेंब, आयुष्याची शेंडी वडिलांच्या हाती, स्कर्ट चेस करण्यासाठी अभ्यास करणे, रोल्समध्ये बसणारे स्वतः दरवाजा उघडत नसतात...'

पूर्वपश्चिमेतील भिन्नता आणि एकात्मिकता चित्रकार सतीश भावसार यांनी मुखपृष्ठावर सुरेख दाखवली आहे.

- **मूल्य ४०० रु. सवलतीत २४० रु.**

## ग्रंथपान

‘या माणसाकडे एक लेटरहेड, प्रामाणिकपणा आणि मित्र याखेरीज काही नाही. परंतु हा खूप मोठा होणार आहे यात शंका नाही. असा एजंट आपल्याला मिळणार नाही.’ उद्योगाला सुरूवात केली तेव्हा स्वित्झरलँड कंपनीच्या इंजिनिअरने सादर केलेल्या अहवालातील ही शिफारस. यावरून सारे स्पष्ट होण्यास हरकत नसावी.

‘आनंदयात्री ’ हे मोहन गोरे नावाच्या भन्नाट कलंदर व्यक्तीचे पुस्तक. आनंदयात्री म्हणजे आनंदाने प्रवास करणारा मुसाफीर. कुठल्याही परिस्थितीत ज्याची साथ आनंदाने कधीही सोडलेली नाही, असा आनंदयात्री. हा आनंद आहे हसण्याचा, हसवण्याचा, शिकण्याचा, परिस्थितीला सामोरे जाण्याचा, परिस्थितीवर मात करण्याचा. आपल्याला हवे ते मिळवणारच या जिद्दीचा, मिळवण्यासाठी केलेल्या पराकाष्ठेचा आणि सगळे मिळूनही शेवटी मी कोण आहे, याचे भान न सुटल्याचा. सारे जग फिरून परत आपल्याच मिश्किलीत जगण्याचा. याची सुरुवात पुस्तकाच्या मुखपृष्ठापासून होते.




मोहन गोरे हे मोठे यशस्वी उद्योजक आहेत, सिरॅमेट इंडिया कं., सिरॅमेट कन्सल्टंट कं. आणि विटानिक प्रॉडक्टस् प्रायव्हेट लि. कंपनी यांचे मालक. त्यामुळे आसामी मोठीच. कल्पक, कुशाग्र, हरहुन्नरी, हजरजबाबी, मेहनती. केवळ या भांडवलावर कुठून कुठे जाता येते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे ही आसामी. धाडस किती पराकोटीचे असू शकते त्याचे एक उदाहरण पहा. क्रॉम्प्टन पारकिन्सन कपंनीची जाहिरात आली होती, ‘ग्रॅज्युएट ट्रेनीज इंजिनीअरींग आणि सायन्स शाखेचे पदवीधर हवेत.’ मोहन यांनी या कंपनीत नुसतीच मुलाखत दिली असे नाही, तर आपल्याला हवी असलेली नोकरीही मिळवली. त्यावेळी ते सायन्स इंटरला होते. इथून त्यांचा इंजिनिअरींगचा प्रवास सुरू झाला. पुढे परफेक्ट मशीन टूल्स या कंपनीत गेले. इथे पुरेशी जडणघडण झाली, अनुभव गाठीशी आला आणि त्यातून एक आत्मविश्वास निर्माण झाला, स्वतःचा उद्योग सुरू करण्याचा. सिरॅमिक्स आणि पावडर मेटलर्जी चे क्षेत्र, म्हणून उद्योगाचे नाव ‘सिरॅमेट इंडिया.’ तिथून सुरू झाला तो प्रवास उद्योजक म्हणून. वास्तविक गर्भश्रीमंतीत जन्म घेण्याचे भाग्य लाभलेले परंतु १९४४ च्या मुंबई गोदी स्फोटात सर्वस्व उध्वस्त झालेले. त्यातून उभा राहिलेला हा फिनिक्स पक्षी, मोहन गोरे.

नोकरी आणि उद्योग हे पर्व स्वतःसाठी कसे आनंददायी करता येते, येणाऱ्या संधींना सोन्याच्या मखरात कसे बसवता येते, आणि प्रत्येक माणूस आपल्यासाठी कसा देवदूत होऊन येतो, यांचे प्रसंग अचंबित करणारे आहेत. जी.पी.इलेक्ट्रॉनिक्सचे पुरोषत्तम ब्रिजलाल यांच्याशी जुळलेले धनिष्ठ संबंध, ‘बुखर’ कंपनीकडून मिळालेला जगातील ‘सर्वोत्कृष्ट एजंट’ म्हणून रॅडो घड्याळाचा पुरस्कार, सिनसिनॅटी ते डेट्राईट या प्रवासासाठी चार्टर फ्लाईट, नेव्हीने स्वतःहून केलेली ऑफर, असे अनेक प्रसंग आहेत. ज्यातून मोहन गोरे यांचे व्यक्तिमत्त्व लखलखितपणे झळाळताना दिसून येते, प्रक्रिया केलेल्या धातूसारखे. त्याचप्रमाणे काही खाजगी प्रसंगही आहेत, त्यात ‘दोनाचे चार हात’, ‘लढाऊ व्यक्तिमत्त्व’.

हा एक चरित्रवजा सादर झालेला ऐवज आहे. फ.मु.शिंदे यांच्या शब्दात सांगायचे तर आत्मचिंतन! यात स्वतःचा शोध आहे. कुठून कुठपर्यंत आलो आणि कुठे जायचे आहे, कुठे थांबायचे आहे, याचे भान आहे. कुटुंबीय आणि कुटुंबाइतक्याच घनिष्ट संबंध लाभलेल्या अनेक व्यक्तिरेखा चितारलेल्या आहेत, जशा दिसल्या तशा. यात भारतीय आहेत तशा विदेशातील ही आहेत. त्यांच्याशी असलेला स्नेह रेशमीधाग्यासारखा सुरेख गुंफला आहे. विशेष म्हणजे त्यापैकी अनेकांसाठी स्वतंत्र प्रकरणे दिलेली आहेत. व्यवसायाच्या निमित्ताने कोणती व्यवधाने सांभाळायला हवीत, हेही जाता जाता सुचवले आहे. पुस्तकाची मांडणी सुटसुटीतपणे केलेली आहे. प्रत्येक प्रकरणाला शीर्षक दिलेले आहे. यात आलेले संवाद हे काही वेगळेपण दाखवणारे आहेत. त्यात ते कधी तत्त्वज्ञानालाही स्पर्श करून जातात. संधी विषयीचा विचार मांडताना ते म्हणतात,

‘आलेल्या संधीचा फायदा उठवतो तो माणूस सामान्य होय; ज्याला तो उठवता येत नाही, तो सामान्याहून सामान्य. जो खरोखर हुषार असतो, तो त्याची संधी स्वतः निर्माण करतो.’

‘समीक्षक हा एकप्रकारे शिक्षक असतो आणि आपण किती तळमळीने शिकवले तरी किती शिष्य सुजाण झाले यावर आपले यश आहे, असे आत्मपरिक्षण समीक्षकांनी करावयास हवे.’

‘आपल्या सभोवतालची माणसेसुद्धा अनेकवेळा मोलाचे बोलून जातात, ते लक्षपूर्वक ऐकून त्यावर विचार करण्याची प्रक्रिया ज्याच्याकडून नकळतच होते, तो होतो यशस्वी!

लेखक स्वतःच कबूल करतात, मी काही लेखक नाही. परंतु हे पुरेसे सत्य नाही. ते स्वतः लेखकांच्या मादियाळीत सतत असतात, तेही चांगल्या मान्यवर साहित्यिंकांच्या. विश्व साहित्य संमेलनात सहभागी होते. आणि या पुस्तकातील सहज सुंदर आणि खुशखुशीत भाषा वाचल्यानंतर, लक्षात येते, ते जसे उद्योजक आहेत, तसे लेखकही आहेत, सिद्धहस्त! मुखपृष्ठावरील त्याचे स्केच चितारले आहे, चित्रकार पुंडलिक वझे यांनी. ते पाहताच, कुणाही वाचकाला मोह व्हावा, पुस्तक वाचलेच पाहिजे असा.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

आपण श्यामकांताची पत्रे वाचलेली आहेत. जीएंची पत्रे वाचली आहेत. आता असाच एक पत्र संग्रह आपल्या भेटीला आला आहे, ‘उघडे लिफाफे’ नावाचा. पत्रव्यवहार हा तसा खाजगी ऐवज म्हणायचा. दोन व्यक्तींमधील संवादाचे माध्यम असलेला. साधारणपणे प्रसंगोपात्त लिहिलेला. तर कधी भावनिक भरती ओहोटीच्या निमित्ताने झालेला. जवळच्या व्यक्तींविषयीचा जिव्हाळा, आपुलकी, प्रेम, आदर या चिंब करणाऱ्या अंतस्थ प्रवाहांना उत्कटपणे वाट मोकळी करून देणारा. नात्यातील वीण कशी घट्ट आणि तलम आहे, तिचे दर्शन घडवणारा. कटू गोड अनुभवांना एका फ्रेममध्ये बंदिस्त करणारा. देश, समाज, संस्कृती, साहित्य, कला यांचे दर्शन त्यासोबत घडवणारा, चित्राला बॅकग्राऊंड असावी तसा. आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, त्या पत्र लिहिणाऱ्याच्या मनाचा, व्यक्तित्वाचा समग्रपणे परिचय करून देणारा.




पूर्वी पत्र आवर्जून लिहिले जात असे. त्यासाठी लहानसे कारणही पुरत असे. परंतु त्याला छंद असे नाव नव्हते. सुषमा बर्वे यांचा पत्रव्यवहार पाहिला, तर तो छंद या प्रकारात चपखलपणे बसतो. कदाचित हा त्यांना मिळालेला वारसा असावा, आईकडून मिळालेला. त्याच लिहितात, ‘आमच्या एवढ्या मोठ्या कुटुंबात तिच्या इतका पत्रव्यवहार कोणीच केला नसेल. एकट्या आईने मला लिहिलेल्या पत्रांची संख्या १६५ इतकी आहे.’ हा छंद लेखिकेने आयुष्यभर जपलेला आहे. (या संग्रहातील पत्रांचा कालावधी १९६५ पासून सुरू होतो आणि शेवटचे पत्र आहे २०१३ चे.) मैत्रिणी, नातलग, विद्यार्थी, भेटलेली माणसे यांच्याशी झालेला हा पत्र व्यवहार आहे. त्याला मिळालेला प्रतिसाद म्हणून जी पत्रे त्यांना आलेली आहेत, त्यांचा यात समावेश अधिक आहे. ही पत्रे केवळ पाठविलेल्या पत्रांना उत्तरे म्हणून आलेली नाहीत. तर त्यात लेखिकेचा आलेला अनुभव, त्यांचे जिव्हाळा असलेले वागणे, वागण्यातून निर्माण झालेले नाते, यांचे उत्कटपणे केलेली वर्णने आहेत. ती वाचत असताना लेखिकेने अनेक पातळ्यांवर कशा प्रकारे आपल्याजवळ असलेला चांगूलपणा भरभरून इतरांना वाटला आहे, तोही कुठलीही अपेक्षा न ठेवता, याचा अंदाज येतो. वास्तविक मनुष्य अंगावर आलेल्या दुःखाला आयुष्यभर गोंजारत राहतो आणि आपल्याच कोषात गुरफटून राहतो. तसे दुःख यांच्याही वाट्याला आले आहे. दोन मुलांना पदरात सोडून पतीचे अल्प काळात निधन झाले. परंतु त्या तशा गुरफटून राहिल्या नाहीत. क्षितिजे धुंडाळली. नवेनवे मार्ग तपासून पाहिले. उच्च शिक्षण घेतले. मनाला मुक्त वाटेल असे विविध व्यवसाय करून पाहिले. या मुक्तपणासाठी कायमची चांगली शिक्षणक्षेत्रातली नोकरी सोडून दिली. आंबेवाले देसाई यांच्या पावसच्या घरातून सुरू झालेला प्रवास, चेंबूरच्या प्रा. रामचंद्र बर्वे यांच्याशी येऊन विसावला. काहीच काळ. पुढे तो औरंगाबाद, पुणे असा होत थेट ऑस्टिन,पोर्टलंड, मन्रो, न्यूयार्कपर्यंत पोहोचला. तिथली सीटीझनशीप मिळूनही त्या आपल्या मूळच्या चेंबूरच्या घरी परतल्या. सतत इतरांना मदत करणे, हाच वसा. सतत स्वतःला कशात तरी गुंतवून ठेवणे हा वसा. त्यामुळे मन सतत उत्साही आणि टवटवीत. जे आवडले ते इतरांशी वाटून घेतले. आपला आनंद इतरांपर्यंत पोचविला. त्यामुळे मिळालेले आप्त, मित्र केवळ मुंबई पुण्यात नाहीत, तर अमेरिका, जर्मनी, न्युझीलंड, मॉरिसेस अशा परदेशापर्यंत विखुरले आहेत. सगळ्यांशी नाते जुळलेले राहिले, कायमचे.

आनंद यादव आठवण जागवतात, ‘विद्यापीठातली ती पिवळी, गुलाबी कमळे नाहीशी झाली आहेत. सगळा कमल–कुंजच उध्वस्त होऊन गेला आहे. पूर्वी तो मलाही आवडे. त्या कमळांचा रंग, विशेषतः गुलाबी छटा मला भळभळत्या जखमेसारख्या वाटायच्या.’

दादरच्या दुकानात समक्ष भेट झाली तेव्हा सरोजिनी वैद्य यांनी लेखिकेला मिठीच मारली. ही पत्र लेखनाला मिळालेली उत्कट भेट.

विठ्ठल कामत तर पुण्याला जाताना मुद्दाम सकाळी सात वाजता घरी आले भेटीला.

राम पटवर्धन, दुर्गाबाई भागवत, लीलाताई अलवारीस, कमलाबाई टिळक, रवींद्र पिंगे, पु लं देशपांडे, अनुराधा पोतदार, महादेवशास्त्री अशी कितीतरी मान्यवर मंडळी लेखिकेच्या मांदियाळीत आलेली आहेत, ती या पत्रांमुळेच.

पत्रांचे हे खाजगी भांडार उघड करीत असताना, त्यात कुठे एकच व्यक्ती, एकच प्रसंग वा अनुभव किंवा एक कालखंड अशी विभागणी केलेली नाही. मात्र ज्यांचे पत्र छापले आहे, त्या अगोदर त्या व्यक्तीविषयी, अनुभवाविषयी निवेदन दिले आहे. त्यामुळे त्या पत्राचे सूत्र आणि आशय समजण्यास सुलभ झाले आहे. आई, वडील, आपले आप्त यांच्याविषयी थोडक्यात लिहिले आहे. गाव, माणसे, प्रसंग यांच्याविषयी लिहीत असताना स्वतःविषयी थोडक्यात वर्णन केलेले आहे, तेही आवश्यक तिथेच. तेही मी मी असा अहं टाळून. या पत्रांना सलग असे सूत्र नाही, तरी एक मोठा कालखंड उभा राहतो.

लेखिकेच्या जीवनप्रवासाविषयीचे टप्पे ठळकपणे दिसून येतात. त्यामुळेच याला चरित्र नाही, तरी चरित्राचे टिपण नक्कीच म्हणता येईल. पत्र लिहिताना त्यावर सुंदर चित्र काढण्याची हौस. तीच हौस मुखपृष्ठावरही दिसून येते. त्यावरील फुले त्यांनीच तयार केलेली आहेत.

- **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

‘अंतरंग’ या संग्रहात विजया राजाध्यक्ष रमेश तेंडुलकरांविषयी लिहितात, त्यांनी सचिनचे वलय स्वतःभोवती खेचून घेतले नाही, आणि स्वतःभोवती स्वतःचे वलय कधी निर्माण होऊ दिले नाही. त्यांच्याच एका कवितेच्या शब्दात सांगायचे तर, ‘व्यापक संदर्भ’ नकोच होते. त्याना फक्त स्वतःत झुलणारी एक कोवळी– क्वचित दुखरीही डहाळी जपायची होती.’

गंगाधर गाळगीळांचे बोल त्याना दोन पातळीवरील जाणवले,‘आता वयाप्रमाणे काही ना काही होत राहणार. ते स्वीकारलं पाहिजे. अजून लिहितो आहे मी. खूप सुचतं. लिहिताना आनंद वाटतो.’

नवसाहित्याच्या काळात नवे निर्माण करत त्या नव्याचे प्रवक्तेपणही करणे, ही दुहेरी भूमिका गाळगीळांनी बजावली. आणि आजूबाजूच्या कितीतरी लेखकांच्या काहीशा दडपलेल्या सर्जनशक्ती बंधमुक्त केल्या

स्वयंपाक करणे, एक विरंगुळा या लेखात त्या म्हणतात,‘ लेखिका व स्त्री वेगवेगळ्या भूमिका आहेत का? निदान स्वयंपाक या विशिष्ट बाबतीत तरी नाही. तो जसा स्त्रियांना एकमेकीशी जोडतो तसा लेखिकांनाही एकमेकीशी जोडतो. माझे स्वयंपाकावर इतके प्रेम आहे म्हणूनच तर मला ‘भातपिठल्याची गोष्ट’ तिहिता आली.

कविता ही त्यांची एकमेव मैत्रीण आहे. साद घातली की ती जवळ येते. नाहीतर दूर राहते. ती तिथे आहे हे त्याना ठाऊक असते. ती शुद्ध आहे, मुक्त आहे. अनेक कवींच्या कविता पाठ आहेत. हात मोडला आणि लिहिणे थांबले तेव्हा याच कवितांनी साथ दिली. मर्ढेकरांच्या कवितेच्या आणि अनुषंगाने त्यांच्या अन्य ललितलेखनाचा व समीक्षेचा अभ्यास असलेले दोन खंड प्रसिद्ध झाले. मात्र मर्ढेकरांची भेट झाली नाही. ही टोचणी मागे राहिलीच. साहित्य अकादमीच्या चर्चासत्रानिमित्ताने बँगलोरला जाणे झाले. तिथे ‘द लाँग सायलेन्स’ ची लेखिका शशी देशपांडे ची भेट झाली. ती भेट म्हणजे आत्मसंवादाची वाट. त्यामुळे आता भिंतींचं भय वाटत नाही, असं त्या म्हणतात. ब्युटी पार्लर मधून चेहरा उजळ करून आले तरी ‘यांनी’ त्याची दखल घेतली नाही. तेव्हाच कळले, नाते दृढ करण्यासाठी याची आवश्यकता नाही. आताच्या मुलांना सगळं कसे झटपट हवं. त्यांच्या वेगाने आपणाला पळता येणार नाही का? की मागेच राहणार? असा प्रश्न त्या ‘ससा आणि कासव’ लेखात स्वतःला विचारतात.

विजया राजाध्यक्ष यांचा ‘अंतरंग’ हा लेखसंग्रह वाचनात आला.

**अंतरंग**

विजया राजाध्यक्ष



तेव्हा प्रत्येक लेखात काहीतरी वेगळेपण जाणवत होते, ते असे. प्रत्येकाची एक एक ओळ घेतली तरी हे टीपण सहज पूर्ण होऊन जाईल असे हे लेख.

विजया राजाध्यक्ष यांचं नाव प्रामुख्याने घेतले जाते ते त्यांच्या मर्ढेकरांवरील संशोधना संदर्भात. परंतु त्यांचा खरा पींड आहे तो कथा लेखनांचा. वैदेही पासून अनेक कथा आपल्या वाचनात आहेत. वेगवेगळ्या विषयांच्या, स्वभावांच्या, मानसिकतेच्या. सहज फुलत जाणाऱ्या. ओढ लावणाऱ्या. मनात रूतून बसणाऱ्या. त्याच पद्धतीचा त्यांचा हा लेखसंग्रह. काहीतरी मनात रुजवून जाणारा. प्रथम पुरुषी निवेदनात असल्याने आपुलकीने भरलेला. जणू स्वतःचे अनुभव सांगत असल्यासारखा. स्वतःचे मनोगत व्यक्त करीत असल्यासारखा.

या संग्रहाचे दोन भाग करण्यात आलेले आहेत. त्यातला एक भाग हा १९७४ सालात ‘मानिनी’त प्रसिद्ध झालेल्या लेखांचा आहे. तर दुसरा भाग नंतरच्या काळात वेगवेगळ्या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या लेखांचा आहे. या लेखन प्रकाराविषयी त्यानीच मनोगत व्यक्त केले आहे, ‘हा एक ऐसपैस साहित्यप्रकार आहे. कथा, कादंबरी, नाटक हे प्रमुख साहित्यप्रकार. ललितलेख हा दुय्यम साहित्याप्रकार मानला जातो तो त्याच्या ऐसपैसपणामुळेच. प्रमुख साहित्यप्रकारांमध्ये लेखकाचा एखादा ‘करार’ समाविष्ट असतो. कथा–कादंबरीमागे सांगण्याचा करार, कवितेमागे भावविण्याचा करार, नाटकामागे दाखविण्याचा करार, ललित लेखनात सांगणे असते, त्याप्रमाणे भावविणे असते... ललितलेख हे आता प्रचलित झालेले नाव. आरभीच्या काळात हे लघुनिंबध, गुजगोष्टी यासारख्या नावांनी ओळखले जात असे, हे सर्वपरिचित आहे.’

विजयाबाईंनी स्वतःच लेखनामागचे सूत्र उघड केलेले आहे. तरीही हे लेख वाचत जाताना आपण कुठे जाणार आहोत याचे औत्सुक्य शेवटपर्यंत सोबत करीत राहते. चांगला लेख वाचल्याचा आनंद देत राहते. काळाचे अंतर लेखाच्या खाली दिलेल्या सनावळीवरून लक्षात येते इतकेच. तरीही त्यांच्यातला टवटवीतपणा आजही तसाच जाणवतो. सतीश भावसारांचा अंतरंगातला बहुरंगपर्णी वृक्ष आणि तिथपर्यंत जाणारी नागमोडी वाट, ही कल्पना लेखांच्या प्रवासाला साजेशी असल्याने मुखपृष्ट आकर्षक झाले आहे.

- **मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रु.**

# ग्रंथपान

निखळ आनंद देणारी पुस्तके शोधून काढावी लागतात. तशी ती सहज उपलब्ध आहेत, जा आणि घेऊन ये, असा सल्ला देणारा कुणी अलिबाबाही सहजपणे भेटत नाही. बरे वाचकांचे मेळावे भरत नसल्याने कुठले पुस्तक तरल असा वाचनानंद देईल, त्याची चर्चाही होत नाही. त्यामुळे वाचकांची मोठीच पंचाईत झाली आहे. अशावेळी विद्या हर्डीकर सप्रे यांचे 'मांजरफन' हे पुस्तक हाती आले. ही अडचण काही अंशी दूर झाली, असे ठामपणे म्हणावेसे वाटते.

विनोदाचे काही प्रकार असतात हे आपण ऐकले ते अ.वा. वर्टी, वि.आ. बुआ आणि पु.ल. देशपांडे यांच्याकडून. त्यांचा निखळ आनंदही घेतला वाचनातून आणि त्यांनी केलेल्या सादरीकरणातून. त्यांचाच धागा पकडून परंतु अधिक खोलवर जाऊन हेमलता अंतरकर यांनी प्रस्तावनेत त्यांची वर्गवारी केली आहे, शब्दनिष्ठ, स्वभावनिष्ठ, व्यक्तिनिष्ठ, प्रसंगनिष्ठ आणि संस्कृतीनिष्ठ. तर हर्डीकर सप्रे स्वतःच्या लेखनाची वर्गवारी करतात, हास्यललिते, तरलललिते आणि सरळललिते अशी. हे आहे लेखाचे पुस्तक. परंतु काही लेख हे कथेच्या जवळ जाणारे आहेत. तर काही कथात्म लेख कथेच्या जवळ जाणारे आहेत. कथा आणि लेख यांच्या सीमा पुसट वाटत असल्याने, त्यांनी या लेखनाला ' लेकथा ' असेही नाव दिले आहे. तसेच या पुस्तकाचे पाळण्यातले नाव 'मांजरपण' असे मनाशी होते. परंतु चित्रकर्तीने ते 'मांजरफन' केले. मग तेच नाव निश्चित झाले, दाखल्यावर नोंदवल्यासारखे. यांचे संदर्भ आपल्याला प्रस्तावना व मनोगतात सापडतील.




मांजरफन हे लेकथांचे पुस्तक. यात आलेली ललिते ही विविधांगी आहेत. ती बरीचशी प्रथम पुरुषी निवेदनात आहेत. यात आलेली स्थळे, वातावरण, संस्कार, आजी, इतर नातेवाईक यांचे संदर्भ, परदेशातात आलेले विविध अनुभव, यामुळे ती लेखिकेच्या जीवनप्रवासाचा भाग म्हणून आत्मचरित्राकडे झुकलेली आहेत, असा भास होतो. त्यांच्यात आलेली उत्कटता, आणि निवेदनातील आपलेपण, हे त्यांचे कारण असू शकते.

लेखिकेच्या शब्दात सांगायचे तर या पुस्तकात २१ ललिते आहेत. प्रत्येकाचा विषय वेगळा, आशय वेगळा, ठेवण वेगळी, तसा प्रसंग व व्यक्ती स्वभावातला गोडवा देखील वेगळा. 'आम्रफलम? चौर्यसफलम' मध्ये भारतातून मागवलेल्या हापूस आंब्याचे वर्णन आहे. त्यात लेखिका लिहितात, 'अख्ख्या प्रवासात मला आंब्याच्या अढीत बसल्याची स्वप्नं पडत होती.' 'पातेली आणि..' मध्ये कढई खरेदी केली, तिचे वर्णन करतात, ' ती धरली कानाला आणि क्यारी ऑन लगेज म्हणून चक्क विमानातून मिरवत आणली.' 'असाध्य ते साध्य' यात कर्करोग झालेल्या माधुरीला साक्षात्कार झाला, ' आपलं आयुष्य वाचवायला आपण आपल्याच आयुष्याचा नैवेद्य दाखवायला हवा.' 'बागवासरी' मध्ये जाईचे रोप बागेत लावले, तिच्या बहराचे वर्णन केले आहे, 'तिच्या वासानं हिरवळ गंधावली आहे.' असे प्रत्येक ललितात वेगळेपण सापडते. हे वेगळेपण केवळ विनोदासाठी आहे असे नाही. 'आठवणी देवचाफेच्या' मधील काव्य आणि भावविश्व याचे वेगळेपण, 'जुईची बाग'मधील अंतर्मुख करणारी वेदना आणि जीवदानाचा आनंद याचे वेगळेपण. 'भूक' मध्ये शिकवलेल्या अपरिग्रहाचे वेगळेपण.

पुस्तकावर लेखिकेचा पत्ता पाहिला तर तो इंग्रजीत आहे, म्हणजे आपल्या बोली भाषेत फॉरेनचा. पुस्तक वाचताना त्यांचा पत्त्याचा पत्ता सापडतो तो अमेरिकेचा. म्हणजे या पुस्तकात येणारी वाक्ये हे मिंग्लिश असण्याची शक्यता खूपच संभवनीय. परंतु या समजाला इतका छेद बसतो की आपणच बापडे ठरतो. मूळचा पिंड मराठी असल्याने तो जराही संकरित झालेला नाही. उलट मराठीच अधिक शुद्ध स्वरुपात उजळलेली दिसते, खडबडीत दगडावर कुऱ्हाडीला धार लावतात, तशी. आपण संगणकाच्या टायपिंग बोर्डला 'कीबोर्ड ' म्हणतो, इथं 'टंकलेखणी' असा शब्द वापरला आहे. इमोशनल ब्लॅकमेलिंग साठी शब्द वापरला आहे, 'भावनिक चपळाई '. 'कॅट सिटर' साठी 'मांजरपालिका'. 'वाटरस्प्रिंकलर' साठी शब्द योजला आहे, जलशिंपाचे नळ. असे कितीतरी शब्द आले आहेत, ते वाचताना आपण त्या शब्दांच्या गंधाने मोहीत होऊन जातो. आणि संभ्रमही पडतो, लेखिका अमेरिकेत आहेत, की पुण्याच्या तुळशीबागेत?

विनोदी लेखनात भाषा त्या त्या प्रकाराप्रमाणे तरल असावी लागते. उगीच ओढाताण करून विनोदाच्या साच्यात बसवता येत नाही. तरच अपेक्षित विनोद साधतो. वाचकाच्या मनाला गुदगुल्या करतो. त्याचवेळी वाचकाला अंतर्मुख करण्याची किमया साधलेली असावी लागते. लेखिकेला ही कला साधली आहे असे म्हणण्यापेक्षा ती त्यांच्यात मुरलेली आहे, असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. शब्दांचा चपखलपणा आणि वर्णनातील सहजता, ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे हे सारे लेखन वाचत असताना एक प्रसन्न निखळपणाचा आनंद वाट्याला येतो.

मुखपृष्टावर मांजरीचे रेखाचित्र आहे. त्यातून केवळ शीर्षकाची गंमत दिसत नाही, तर मासोळी डोळे, फुलपाखरांचे कान आणि फुलांची माथ्यावरील सजावट, ही चित्रकर्तीच्या कल्पकतेची सुबक निर्मिती म्हणता येईल. ही निर्मिती आहे प्रियांका देसाई यांची. आत रेखाचित्रे आहेत. ती रेखाटलेली आहेत, राधिका देसाई आणि अश्विनी खाडिलकर यांनी.

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

**सर्वसाक्षी**

संजीवनी खेर




आपल्यासोबत असलेल्या माणसांचे सहचर्य इतके असते की, त्यांच्यातले वेगळेपण आपल्या लक्षात येत नाही. आले तरी त्याचा उच्चार ओठावर अवतरत नाही. केवळ माणसांचेच नाही, निसर्गात असलेले डोंगर, जंगले, नद्या, समुद्र अशा अनेक जागा आहेत, ज्यांचा आनंद घेतो, त्यांच्यासोबत वावरतो, आपल्यातेच एक म्हणून सोडून देतो, थोडेसे दूर होताच. उन्हाळा,पावसाळा, हिवाळा यांचीच तऱ्हा तीच. हीच गोष्ट, तारे, चंद्र आणि सूर्याविषयी. दररोज दिसणारे तारकामंडळ तर जणू आपले नाहीच. चंद्र उरला तो अमावस्या–पौर्णिमा आणि तिथीसाठी. आणि सूर्य? जो नित्य उगवतो, मावळतो, ऊन देतो, प्रकाश देतो. बस. त्यापलीकडे त्याचे महत्त्व हे शास्त्रज्ञांच्या प्रयोगशाळेत, आणि अर्ध्यदान, सूर्यनमस्कारापुरते. पुढे? आणखी असणारे महत्त्व आपल्या ध्यानीच येत नाही. मग देवत्व सापडायचे ते कुठून. दगडात देव शोधणारे आम्ही या खऱ्या देवाकडे देव म्हणून कधी लक्षच दिलेले नाही, ना देत आहोत. जो दिसत नाही, त्याचे रूप आम्ही काल्पनिक उभे करून त्याचा शोध घेत राहतो. आणि जो समोर दिसतो, त्याला ओळखण्यात उणे पडतो. हे उणेपण जागृत करण्याचे, खरोखर दिसणाऱ्या देवाचे रूप आहे सूर्य! ज्याची ओळख होते, ती 'सर्वसाक्षी 'या पुस्तकातून. ती करून दिली आहे संजीवनी खेर यांनी.

संजीवनी खेर यांची साहित्य संपदा आपण यापूर्वीच वाचलेली आहे. कथा, कादंबरी, लेख, अनुवाद, असे बहुविध साहित्य जे बहुतांशी संशोधनावर आधारित आहे. समाज, संस्कृती, चित्रपट यांचा वेध घेणारे आहे. पत्रकार, सहसंपादक, लघुपटकार, दूरदर्शनवरील कार्यक्रमांचे संचालन व त्यात सहभाग, अशा विविध भूमिकांमधूनही आपणास त्यांचा परिचय आहे, जो लेखनाच्या इतकाच व्यासंगाचा परिचय देणारा आहे. त्यांचे 'सर्वसाक्षी' हे पुस्तक या परिचयाला आप्तपणात परिवर्तीत करणारे ठरावे.

सूर्य हा देखील सगळ्यांच्या सारखाच कुटुंबातील एक घटक आहे, स्वतः कुटुंबकर्ता आहे. ऋषी कश्यप आणि देवमाता आदिती यांचा हा पुत्र. त्याच्या पत्नीचे नाव संज्ञा, विश्वकर्म्याची कन्या. संज्ञा, राज्ञी, निष्कुंभा, सरन्यू ही सूर्याच्या एका पत्नीचीच चार रूपे. ऋग्वेदात उषा, प्रत्युषा, संज्ञा, छाया या त्याच्या पत्नी असल्याचा उल्लेख आहे, तर मत्स्यपुराणात राज्ञी, सवर्णा, छाया,सवर्चसा अशी पत्नींची नावे आहेत. त्याच्या अपत्यांची नावे वैवस्वत मनू, यम, यमी; अश्विनीकुमार, शनी, सवर्णी, तपती, रेवंत.

सूर्याला अनेक नावे आहेत, तशा अनेक शक्ती आहेत. भारतातील बहुतेक सण त्याच्याशीच बांधलेले आहेत. हल्ली जिचा अनेक कारणाने गाजावाजा झालेला आहे, ती छटपूजा सूर्योपसना आहे. सूर्य प्रकाशदेव आहे, उर्जेचा देव आहे, वरुणाचा कर्ता आहे, सृष्टीचा, आरोग्याचा विधाता आहे, तो अनेक चालीरीती आणि व्रत, सोहळ्यांच्या अग्रभागी आहे. जयपूर आणि दिल्ली येथील जंतरमंतर ही कालमापने सूर्याशी नाते ठेवून तयार केलेली आहेत.

सूर्य हा नित्य दिसणारा देव आहे. परंतु त्याची मंदिरे आहेत का, आणि असतील कुठे आहेत? त्यांची उभारणी कशी आहे. त्याचे अस्तित्व कसे आहे, त्याची ओळख ठसवणाऱ्या खूणा कोणत्या आहेत, त्याची पूजा केली जाते ती कशी? या कुतूहलाला प्रेरणा दिली ती ठाण्याजवळील नालासोपारा येथे असलेल्या सूर्यमंदिराने. त्यात भर घातली ती राजापूर तालुक्यातील कशेळीच्या कनकादित्य मंदिराने. तिथे मिळालेल्या ताम्रपटाने. मग त्यातून सुरू झाला शोध महाराष्ट्रात असलेल्या सूर्यमंदिरांचा. त्यानंतर देशभरातील मंदिरांचा. आपल्याला कोणार्कचे सूर्यमंदिर, तेही पडझड झालेल्या अवस्थेतील ठाऊक आहे. परंतु देशभरात अनेक ठिकाणी सूर्यमंदिरे आहेत, महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी आहेत. नेवरे, संगमेश्वर, खारेपाटण, सिन्नर, लोणार, चाफळ, वेरूळ–भाजा लेण्या, गोवा, गुजरात, राजस्थान, काश्मीर, मध्यप्रदेश, काशी. इतकेच नाहीतर विदेशातही सूर्याची पूजा केली जात असे. तिथेही त्याची मंदिरे असल्याचे संदर्भ आहेत. जपान, इजिप्त, अमेरिका, मेक्सिको, ग्रीक ही त्याची काही उदाहरणे होत.

या 'सर्वसाक्षी' चा शोध घेणे म्हणजे तप्त तेजालाच आव्हान देण्यासारखे. अशा मंदिरांचा, त्यांच्या अस्तित्वाचा शोध घ्यायचा तर प्रत्येक प्रस्तर घासून, अन्वयार्थ उलगडून पाहणे आलेच. त्यासाठी अनेक संदर्भांची पवित्र मंदिरेही उघडून पाहणे अगत्याचे. या विषयातील मठाधिपतींची मदत तर आवश्यकच. आणि शेवटी या सगळ्यांचा समन्वय साधून त्याला मूर्त रूप देणे, न थकता. हे सारेच अथक परिश्रमाचे काम, कल्पना आणि संयम यांची कसोटी पाहणारे. परंतु लेखिकेने हे आव्हान समर्थपणे पेलले आहे. विषय वरवर रूक्ष वाटणारा. तो वाचकाच्या हाती देताना त्याला तो बोजड वाटता कामा नये, ही दक्षता महत्त्वाची. ती त्यांनी घेतली आहे. लेखनातला सहजपणा जसा जपला आहे, तसा विषयाचाही जपला आहे. विषयवार प्रकरणात विभागणी केली आहे. सोबत पुरेसे फोटो दिले आहेत. त्यामुळे पुस्तक केवळ वाचनीयच नाही तर, आकर्षक देखील झाले आहे. मिथक आणि वरवर वाटणाऱ्या कल्पनांना संदर्भांचे कोंदण लाभले आहे. बूट घालणारा देव,हा संदर्भ तर न विसरता येणारा.

सतीश भावसार यांचे प्राचीन प्रतिमा आणि आताचे मंदिर परिसर यांच्या संगमातून साकारलेले रेखीव मुखपृष्ट छानच.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

'बेलाग कडे - कपारींनी नटलेली शिखरं पांढऱ्याशुभ्र हिमाच्या पदराआडून खुणावत होती. गिर्यारोहकाच्या विजीगिषू वृत्तीला साद घालणारं दर्शन एखाद्या मदनिकेप्रमाणे घायाळ करणारं होतं. गियारोहकांचं या हिमालयाशी असलेलं नातंच वेगळे आहे. यापुढे प्रेयसीच्या उन्मादक सहवासाची आसही फिकी पडेल. गोठवून टाकणाऱ्या थंडीत धपापणाऱ्या श्वासांसह त्या उतुंग आव्हानांना भिडण्याचा, साहसाचा अनुनय करण्यात एक जबरदस्त आसक्ती आहे. एक अस्पर्श्य तृषाग्नी आहे.' गिर्यारोहक असलेल्या प्रत्येकाच्या काळजातून उठणारी स्पंदने कोणती असतील तर ती ही. हिमालयाच्या अंगाखाद्यावर खेळल्याशिवाय त्यांच्या शैशवाला खऱ्या अर्थाने वैभव प्राप्त होत नाही. आणि त्यासोबतीला आपला सह्याद्री, दणकट देशाचा रांगडा आणि तितकाच पित्ततुल्य, तो तर जणू या गिर्यारोहकांना आपल्या हातांचा पाळणा करून जोजवत असतो. अशा सह्याद्री, हिमालय, आणि आस्ट्रियासह संपूर्ण युरोपातील कॅम्पसाईटस् , यांच्याशी घनिष्ठ जिव्हाळा असलेले गिर्यारोहक अनेक आहेत. अनेकांनी त्यांच्या अनुभवांना पुस्तकरुपात शब्दबद्ध केलेले आहे. त्यांच्याशी एकरूप होताना आपणच या कॅम्प्सवर आहोत, इतका समरसतेचा अनुभवही आपण घेत आलो आहोत. त्यासारखेच, परंतु त्यातही खूप वेगळेपण जोपासलेले पुस्तक, 'कॅम्प फायर ' आपल्या हाती सोपवले आहे, वसंत वसंत लिमये यांनी.

**कॅम्पफायर**

वसंत वसंत लिमये




वसंत लिमये यांचा परिचय यापूर्वीच्या त्यांच्या 'धुंद-स्वच्छंद' आणि 'लॉक ग्रिफिन' द्वारा झालेला आहे. 'हाय प्लेसेस ' च्या व्यवस्थापकीय प्रशिक्षण कार्यक्रमामधून निसर्ग आणि साहसाचे पाठ गिरवलेल्या हजारो व्यक्तींच्या अनुभवातून तो समृद्ध होत गेला आहे. आय आय टी पवई चे विद्यार्थी असलेले लिमये नाट्य, छायाचित्रण या छंदात रमलेले आहेत, परंतु त्यांना ओढ आहे ती या शिखरांच्या सहवासात रमण्याची, त्यांच्यासोबत हितगुज करण्याची, कधी कधी स्वतःची मस्ती जिरवण्याची. महाराष्ट्र हा संपन्न देश आहे, गोविंदाग्रजांच्या कवितेप्रमाणे. गड, किल्ले, पर्वतरांगा, नद्या, ओढे, जंगले आणि समशितोष्ण हवामान. ज्यांच्या सहवासात रमायचे म्हटले तरी एक जन्म पूरणार नाही. अशा सुंदर, रमणीय निसर्गाच्या अंगाखांद्यावर खेळण्यातली मजा काही औरच. यात साहस आहे, धाडस आहे, जिव्हाळा आहे, प्रेम आहे. किती घेशील दो कराने इतकी विपुलता आहे. ज्याचा मनापासून आनंद घेतला आहे तो लिमये यांनी. कॉलेजच्या जीवनात लागलेली ही चटक आणि जीवनाचा अविभाज्य भाग झाली आहे. माथेरान, रायगड, राजगड, सिंहगड, राजमाची अशा ठिकाणांपासून्न सुरू झालेली भ्रमंती सह्याद्रीच्या सर्व कड्याकपारीतून झाली. हिमालय आव्हान देवू लागला तेव्हा त्याच्याही जंगल, बर्फ, शिखरे यांच्याशी मैत्री जोडली. अनेक जीवघेण्या आणि तितकाच उत्कट साहसाचा आनंद देणाऱ्या अनुभवांनी स्वतःला समृद्ध केले. निसर्ग पाहण्यासाठी, अनुभवण्यासाठी, त्याच्याजवळ जायला हवे, त्याच्याशी एकरूप व्हायला हवे. तरच त्याचे खरे विलोभनीय रूप पाहता येते. लिमये यांनी केवळ भ्रमंती केली नाही, शिखरे पादाक्रांत केली नाहीत, साहसाचे उच्चांक गाठले नाहीत. निसर्गाशी एकरूप झाले आहेत. त्याच्या संवर्धनाचा वसा चालवणारे पाईक झाले आहेत. निसर्ग तुम्हाला काही देतो, तसे तुम्हीही त्याला काही परत केले पाहिजे. नाहीच काही तरी किमान त्याचा ऱ्हास करू नका, इतकी तळमळीची ते हाक देतात. हे सारे आहे ते अनुभवातून आलेले अमृत.

कॅम्प फायर हा प्रकार म्हणजे रात्री लाकडे पेटवून त्याभोवती गप्पागोष्टी किंवा मनोरंजन करण्याची जागा. फारपूर्वीपासून चालत आलेला हा प्रकार, विश्रांतीच्या वेळेतला, पुढचे मनसुबे ठरवण्याचा, श्रम दूर करण्याचा. गिरीभ्रमण, प्रस्तरारोहण, गिर्यारोहण करणाऱ्यांचा तर हा आवडीचा प्रकार. तेच नाव लिमये यांनी त्याच्या या पुस्तकाला दिले आहे. हे पुस्तक म्हणजे त्यांनी केलेल्या गिरीभ्रमणाच्या, गिरीरोहणाच्या आठवणी आहेत. परंतु तेवढेच नाही. या निमित्ताने भेटलेल्या अनेक व्यक्ती, मित्र, निसर्गाची दिसलेली विविध रूपे, गिर्यारोहण करताना घ्यावयाची काळजी, सोबत काय काय असावे ते साहित्य, त्याची तयारी कशी करावी, ग्रुप लिडरची जबाबदारी, नकाशे, दिशाशोधक यांची आवश्यकता, अवजारे, त्या त्या ठिकाणांची माहिती, यांचाही ते तपशील देतात, तेही अनुभवास धरून प्रसंगाचे वर्णन करून. यात अनेक उत्तम तपशीलही संदर्भासाठी उपयुक्त ठरणारे आहेत. गिर्यारोहणाचा इतिहास, त्याचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची नावे व ठिकाणे, एव्हरेस्ट सर करणारे पहिले शेर्पा तेनसिंग- एडमंड हिलरी आणि या मोहिमेचे नेतृत्व करणारे लॉर्ड जॉन हंट यांची माहिती आणि प्रत्यक्ष या तिघांना भेटण्याचा लाभलेला विलक्षण योग. अशी कितीतरी उपयुक्त माहिती भांडारासारखी आपल्यासमोर खुली करण्यात आलेली आहे. लक्षात राहावेत असे लक्षणीय प्रसंगही खूप आहेत, तिथे पुनर्जन्म झाला, असेच म्हणता येईल.

लिमये हे निष्णात गिर्यारोहक आहेत, त्यासाठी त्यांनी खास प्रशिक्षण घेतलेले आहे. परंतु त्याच जोडीला ते उत्तम लेखकही आहेत. व्यक्ती चित्रण, निसर्ग वर्णन आणि अनुभवांचे कथंन किती सहज सुंदरपणे केलेले आहे, वाचताना त्यात आपण हरवून जावे. लेखन लेख स्वरूपात आहे, परंतु प्रत्येक लेखाच्या सोबत सुरेख चित्रे दिलेली आहेत. मुखपृष्ट आणि त्यावर साकारलेले दृष्य उत्तुंग आणि निबिडाच्या जवळ आणून उभे करतात. नीलेश जाधवांची ही कल्पता सुरेख आहे. या सुंदर आठवणींना साजेशी पुस्तकाची निर्मिती ही सुद्धा लक्ष वेधून घेणारी आहे.

- **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

## ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**




देव,दैव आणि निसर्ग यांच्या वरदानाची आणि कोपाची कारणमीमांसा करणे तसे अवघड काम. किंबहुना अशक्य कोटीतले. वरदानाचा हात उंचावतो, तेव्हा माणसाची अवस्था होते, किती घेशील दो कराने. आणि वक्रदृष्टी वळली तर जीवनाचा अंत जवळ दिसू लागावा. असा प्रसंग आपण दूरचित्रवाणीवर अनुभवला आहे, २०१३ साली, जून महिन्याच्या मध्यावर, चारधाम यात्रेच्या निमित्ताने. केदारनाथ येथे घडलेले निसर्गाचे रौद्र तांडव आजही नजरेसमोर आहे. ते पाहताना मन त्या प्रवाहाखाली सापडल्यासारखे झाले होते, विचारांच्या दिशाच उध्वस्त झाल्या होत्या, कोसळणाऱ्या कडे-कपारीसारख्या. ज्यांचे आप्त यात सापडले होते, त्यांची अवस्था किती दारूण झाली असेल याची कल्पना करणे तर अशक्य होते. परंतु जे स्वतः या तांडवाच्या परिघात घेरले गेले होते, त्यांची अवस्था? जीवन-मृत्यूच्या नाजूक रेषेवरून चालताना त्यांच्या मनात काय येत होते, विचार कोणते होते, होते की बधीर झाले होते? हे केवळ कल्पनेवरच समजण्यासारखे होते. असा अनुभव घेतलेल्या एकता पटेल आणि त्यांचे कुटुंबीय या महाप्रलयातून सुखरूप परतले; मात्र मनावर, काळजावर त्या प्रलयाचे घाव घेऊनच. त्या महाप्रवासाचे वास्तवदर्शी अनुभव सांगणारे पुस्तक त्यांनी आपल्या हाती दिले आहे, त्याचे नाव 'गौरीकुंड १.५ कि.मी.'

एकता पटेल एकूण आठजणांच्या ग्रुपसह चारीधामच्या यात्रेवर निघाल्या. तीन तरुणी, पाच वयस्कर असा हा ग्रुप. केदारनाथपर्यंतचा प्रवास सुखद, सुंदर, अवर्णनीय, असा. गंगा, अलकनंदा, मंदाकिनी या नद्यांची विविध रूपे पाहायला मिळाली. गडवाल डोंगररांगाची मोहून टाकावी अशी निसर्ग निर्मित रांगोळी. हिम, हिरवाई आणि सूर्य यांच्या खेळात स्वर्गाचे नंदनवन दिसावे, अशी मनोहर दृष्ये. त्याचे वर्णन करताना त्या लिहितात, 'नागमोडी आकाराच्या डोंगरांमधून सर्पाकृती वाहणारी नदी. डोंगरांनी जणू तिला वाहण्यासाठी हद्द ठरवून दिली होती आणि तीही वडिलांचा हात धरून चालणाऱ्या अवखळ लेकीप्रमाणे एका डोंगरावरून दुसऱ्या डोंगराला वळसा घालत गोल गोल गिरक्या घेत होती.'

डोंगररांगामधून प्रवास करीत उंचावर असलेल्या जटाधारीच्या ठिकाणांवर पोहचण्यासाठी वाहनांबरोबरच कधी चालत तर कधी हेलिकॉप्टर, कधी डोलीवाले, यांच्या मदतीची आवश्यकता भासली. परंतु ज्याच्या दर्शनाला आलो त्याचे दर्शन उत्तम झाले की जीवनाची सार्थकता लाभते. ती सार्थकता या कुटुंबाला लाभली. 'हे आशुतोष, हे अनंत दृष्टीवाल्या, तू आमचे अंतर्मन जाणून आम्हाला पुन्हा दर्शन दिलेस. आमच्या डोळ्यांचे पारणे फिटले. आम्ही धन्य झालो.कृतकृत्ये झालो.' प्रसन्न मनाने परतीच्या प्रवासाला सुरुवात झाली. आणि निसर्गाने आपले रूप दाखवायला सुरुवात केली. पाऊस पडायला लागला, त्याचा जोर वाढला. थंडी, धुके आणि डोंगररांगात अडकून पडणारे काळे ढग, यांचे थैमान सुरू झाले. नद्यांना पूर आले. त्या पाण्याला कवेत सामावण्यास काठ अपुरे पडले तेव्हा प्रवाह डोंगररांगाच्या खांद्यावरून झेपावले. मस्तीला आल्यासारखे ते धावू लागले. वाटा, रस्ते उखडून फेकल्या. डोंगराचे कडे हादरले. मोठमोठे वृक्ष, दगड, कडे उन्मळून टाकले. सूर्यालाही कवेत घेतले. दिवस असूनही अंधार भासू लागला. आता दिसणारी हॉटेल, झोपड्या, डोंगर यांचे अस्तित्व पुसले गेले. आश्रयाला जागाच उरली नाही. प्रवासाचा मार्ग खुंटला, ना मागे जाता येत होते ना पुढे. प्रत्येकाला आपल्या जिवाची भीती. खचलेले रस्ते, प्रचंड वेगाने वाहणारे प्रवाह, चिखल, प्रेते आणि झाडे. ना खायला अन्न ना प्यायला पाणी. हजारो पर्यटक अडकले, हजारो बेपत्ता झाले, मेले, वाहून गेले. काहींचा मृत्यू तर नजरेसमोर झाला. या सगळ्याचा अनुभव लेखिकेने स्वतः घेतला. त्याचे वर्णन त्या करतात, 'एक सबंध डोंगरच्या डोंगर कोसळला होता. आठशे मीटरच्या भागात आता रस्ताच उरला नव्हता, त्यावरून पाणी वाहत होते. लोकांची प्रेते सगळीकडे विखुरली होती. हृदयाचा ठोका चुकला, आता काय करायचे? संकटे सतत डोक्यावर मधमाश्यांसारखी घोंघावत होती... कुठे जाशी भोगा तर तुझ्यापुढे उभा!'

या प्रसंगातून सुटका करण्यासाठी केलेले प्रयत्नही कसोटी पाहणारे. स्वतंत्र चॉपर भाड्याने मिळवून, त्याद्वारे सुटका करण्यासाठी आप्तांनी केलेली धडपड स्तुत्यच म्हणायला हवी. सोबतीला वयस्कर मंडळी, हाताशी पुरेसे साहित्य नाही. पाऊस आणि थंडीचा सतत मारा. तरीही त्यातून हे कुटुंब परतीच्या प्रवासाला येते, तेही सुखरूप. ही सुद्धा लीलाच, देवाची, दैवाची आणि निसर्गाची.

हे लेखन म्हणजे प्रत्यक्ष अनुभवाचे कथन आहे. भावना, संवेदना, जाणिवा आणि हतबलता यांचेही पदर यातून उलगडत गेलेले आहेत. भावलेले सौंदर्य, दिसलेले भयानकतेचे वास्तव आणि माणसांच्या वागण्याच्या तऱ्हा, यांची केलेले वर्णने, ही लेखिकेच्या तरलतेचा परिचय देतात. 'एक चुकीचे पाऊल आणि तुम्ही या जीवनमरणाच्या रंगमचावरून आऊट!' 'सतत विचारांचा थकवा माणसाला एक क्षण इतके निष्क्रीय बनवतो की माणूस सगळी हत्यारे ठेवून देतो आणि संपूर्ण शरणागती पत्करतो.' या सारखी वाक्ये त्या सहज लिहून जातात. या पुस्तकाचे मूळ लेखन गुजरातीतून झाले आहे, त्याचे मराठी रुपांतर बीना ठाकूर यांनी केलेले आहे. पुंडलिक वझे यांनी त्याचे मुखपृष्ट छानपैकी सजवले आहे.

**मूल्य २०० रु. • सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

बाजारात उपलब्ध असलेली अनेक पुस्तके योगासने आणि प्राणायामांची माहिती देणारी असतात. परंतु ती माहिती वरवरची असते. त्यावर अधिक भर असतो शारीरिक हालचालींवर, बाह्यांगावर. त्याचप्रमाणे लोकांचीही समजूत असते, योगासने म्हणजे ६४ आसनांचाच प्रकार. किंवा शारीरिक व्यायामाचा प्रकार. परंतु ते पुरेसे खरे नाही. योगासनात अंतरंगाचाही समावेश आहे. शरीरातील, स्पंदने, नाडी, मन, बुद्धी आणि विचार यांचाही त्यात महत्त्वाचा वाटा असतो. किंबहुना तोच अधिक असतो. तरच त्याचा हवा तसा परिणाम दिसून येतो. हा समज लोकापर्यंत पोहोचवावा. त्यांना योग म्हणजे काय, प्राणायाम म्हणजे काय, त्याचे कार्य कसे चालते, ते लोकांना समजावे, त्याचा प्रसार व प्रचार व्हावा, यासाठी या पुस्तकाचा प्रपंच मांडावा लागला. कारण हे सगळे जे सांगितले आहे, ते कुठे वाचून वा कुणाचे ऐकून नाही, तर स्वतः घेतलेला अनुभव आहे. म्हणजे स्वानुभवावर आधारलेले हे पुस्तक आहे. त्याचे लेखक आहेत श्रीकृष्ण मराठे. आणि पुस्तकाचे नाव आहे 'माझी आरोग्य सेवा'. हे वरवरचे नाव झाले. कंसात दिलेले उपशीर्ष पहाः 'असाध्य आजाराकडून परिपूर्ण स्वास्थ्याकडे'.




लेखक स्वतः एका असाध्य व्याधीने ग्रस्त होते. त्याचे नावः ॲडिसन्स. या व्याधीचे वैशिष्ट्ये म्हणजे कायम औषधे घेत राहणे. त्यात आणखी पथ्य मोठे, जंजूसंसगापासून दूर राहणे. म्हणजे गर्दीच्या ठिकाणी न जाणे. कायम तिच्यापासून दूर राहणे. बरे जी औषधे घ्याची ती सहजासहजी उपलब्ध नाहीत. ती परदेशातून आयात करावी लागत. त्यांचे नाव : कॉर्टिझोन आणि फ्लुड्रोकॉर्टिझोन. ती मिळवण्यासाठी अनेकांचे साहाय्य झाले, हा भाग वेगळा. व्याधी आयुष्यभर सोबत करणार, औषधे देखील आयुष्यभर घ्यावी लागणार, हे विधिलिखित ठरले होते. परंतु एक दिवस आशेचा किरण सापडला. विवेकानंद केंद्र; कन्याकुमारीच्या सहलीच्या निमित्ताने सापडले. आणि सारे विश्वच बदलून गेले. तिथे मिळालेल्या सल्ल्यानुसार लेखक बंगलोरच्या विवेकानंद केंद्रात दाखल झाले. हे केंद्र म्हणजे योगाचे विश्वविद्यालय. येथे योगावर संशोधन चालते. अनेक तज्ज्ञ मंडळी इथे संशोधन करीत असतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तेथे योगाचा आणि प्राणायामाचा अभ्यास सुरू झाला. आणि एक वर्षानंतर तेथेच भरलेल्या विश्वसंमेलनात जाहीर करण्यात आले, 'श्रीकृष्ण मराठे असाध्य आजारातून पूर्ण बरे झाले आहेत. आता त्यांना कुठलेही औषध त्यांच्या व्याधीसाठी कधीच घ्यावे लागणार नाही'. यावर विरोध नाही तरी शंका घेणारे निघालेच. 'बंगलोरच्या आश्रमाचा व वातावरणाचा हा परिणाम असेल. गर्दीच्या ठिकाणी शहरी भागात गेले की पुन्हा तेच चक्र सुरू होणार.' शंका निरसन करण्यासाठी पुन्हा सर्व चाचण्या घेण्यात आल्या. मुंबईत आल्यानंतरही त्या घेण्यात आल्या. आणि अभिप्राय आला 'व्याधीमुक्त'. इतकेच नाहीतर पुढील जगणे सुरू झाले ते नियमित, सर्वसामान्य माणसांप्रमाणे. गर्दीत, लोकल, जिने चढणे वगैरे. हा परिणाम होता योगासनांचा, प्राणायामांचा, तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली नियमितपणे केलेल्या सरावाचा.

आपल्या अनुभवाचा फायदा इतरांना व्हावा म्हणून मराठे यांनी हे पुस्तक लिहिले. परंतु ते केवळ अनुभवकथन नाही. त्यासोबत योगासने व प्राणायाम आणि शरीरशास्त्रीय विश्लेषण यावर अधिक भर दिलेला आहे. आसने म्हणजे काय? प्राणायाम म्हणजे काय? त्यांचा शरीरातील पेशी, ग्रंथी, अपेशीय ओजस, अतिंद्रिय निदान, मन, मेंदू, नाद, यांच्याशी कसा संबंध येतो? माणसाच्या ठायी असणारे काम, क्रोध, मोह, मद, मस्तर आणि भय हे षड्रिपू कसे नकारात्मक प्रतिसाद देतात, आणि यश, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्‍वर्य, आणि धैर्य हे सदगुण कसे सकारात्म परिणाम घडून आणतात यांचे विवेचन केलेले आहे. योगाद्वारे कोणकोणत्या व्याधीग्रस्तांना आनंदी करता आले, त्याची माहितीही दिलेली आहे. व्याधीग्रस्तांच्या मनात असलेल्या शंकांना दूर करण्याचे काम त्यांनी केले आहे. नुसताच योग नाही तर पतञ्जली योग, ब्रह्मविद्या, ॲक्युपंक्चर, विपश्यना यांच्याही उपयुक्ततेविषयी नमूद केलेले आहे.

या पुस्तकात एकूण तेरा प्रकरणे आहेत. प्रत्येकात आलेली माहिती ही स्वतंत्रपणे दिलेली आहे. शेवटी परिशिष्टात पत्नी आणि मुलगा यांचे मनोगत दिलेले आहे. तिसऱ्या परिशिष्टात मेंदूलहरी व मानसिक अवस्थांचा तक्ता दिलेला आहे. हे पुस्तक म्हणजे व्याधीकडून आरोग्याकडे घेऊन जाण्याचा एक मार्ग आहे. त्यापासून प्रेरणा घेऊन योगाच्या सिद्धांताकडे वळण्याचा मोह नक्कीच व्हावा. मुखपृष्ठावर योग वा आसने यांची प्रतिकृती नाही, तर मन, मेंदू आणि संप्रेरणा दाखवणारे चित्र आहे. त्यावरून आतल्या विषयाचा आवाका लक्षात यावा. रंजन जोशी यांची ही कल्पकता उत्तमच.

**मूल्य २०० रु. • सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

## कोलाज : अमेरिकेच्या अंतरंगाचा
संपादन : डॉ. लतिका भानुशाली
डॉ. गजानन सबनीस




अमेरिका म्हणजे काय, असा प्रश्न विचारणे आता कालबाह्य झाले आहे. अगदी शाळा कॉलेजातला मुलगा याचे सहज उत्तर देईल. उच्च शिक्षण, मोठ्या पगाराची नोकरी किंवा मोठा व्यवसाय आणि स्वतःची एक वेगळ ऐट, म्हणजे अमेरिका. तर यात चुकीचे काही आहे, असे काही आता म्हणता येणार नाही. अमेरिका पुढारलेली आहे, प्रगत आहे आणि तिथे बुद्धिकौशल्याला प्रचंड वाव आहे, मागणी आहे, हे त्याचे कारण आहे. इतरही अनुषंगिक कारणे आहेत. आज भारतातून विशेषतः महाराष्ट्रातून जो वर्ग तिथे स्थलांतरित झाला आहे, होत आहे आणि स्थिरावला आहे, त्याचा प्रवाह पाहिला की हे उत्तर समर्पक असल्याची खात्री होते. परंतु असेही म्हटले जाते की, चमकणारे सारे सोनेच असते, असे नाही. तर अशा पुढारलेल्या आणि संधीचे सोने करणाऱ्या अमेरिकेचे अंतरंग कसे आहे, अमेरिकेशी संबंध आलेल्या अनेकांच्या अनुभवातून ती कशी भावली, स्थलांतरित समाजाच्या जीवनात झालेले बदल आणि मानसिकता कशी आहे, या सगळ्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न डॉ. भानुशाली आणि डॉ. सबनीस या संपादकद्वयांनी केलेला आहे, त्याचे हे पुस्तकः 'कोलाज अमेरिकेच्या अंतरंगाचा.'

अमेरिकेच्या अंतरंगाचा वेध घेण्यासाठी ज्या मान्यवरांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत, ते सर्वच आपापल्या क्षेत्रातील दिग्गज आहेत, नावलौकिक प्राप्त केलेले आहेत, अमेरिकेतील स्वातंत्र्यदेवतेच्या प्रतिकृतीसारखे. डॉ. अनिल काकोडकर यांच्या मते अमेरिका हा इतर विकसित व श्रीमंत देशांपेक्षा श्रेष्ठ देश आहे. कोणत्याही प्रकारच्या बुद्धिमत्तेला वाव मिळण्यासाठी योग्य असलेला हाच देश आहे. खऱ्या अर्थाने संधीचा देश आहे. परंतु या देशाला अणुउर्जेच्या ज्ञानाचा प्रचंड अहंकार आहे. आणि तो उपऱ्यांचा देश आहे. त्याचवेळी ते अमेरिकेत जाऊ इच्छिणाऱ्यांना संदेश देतात, त्यांच्या तालावर नाचू नका, तुमच्या बुद्धिमत्तेचा उपयोग देशासाठी करा.

सिलिकॉन व्हॅलीचे यशस्वी उद्योजक आणि इंजिनिअर, प्रकाश भालेराव यांच्या मते अमेरिका ही मेल्टिंग पॉट नाही, ती आहे एक जिगसॉ. इथे आलेला प्रत्येक समाज स्वतःची वैशिष्ट्ये टिकवून होता व आहे. कुमार केतकरांना दिसलेली अमेरिका दोन प्रकारची आहे. एकिकडे अत्यंत हिडीस, दुष्ट, हिंस्त्र. तर दुसरीकडे अत्यंत विकसित, लोकशाही तत्वांचा आदर करणारी, स्वतंत्र विचारांची. निधर्मवाद, विशुद्ध विज्ञान, तंत्रज्ञान हवे असणारी. हा देश राष्ट्रध्यक्षांच्या तालावर चालत नाही तर त्यांच्या स्टेट डिपार्टमेंटच्या धोरणानुसार चालतो.

सगळीकडे व्यवहाराचे एक महत्त्वाचे चलन म्हणून अमेरिकन डॉलरला पसंती दिली जाते याचे कारण डॉ. नरेद्र जाधव यांनी त्यांच्या मुलाखतीव्दारे सांगितले आहे. तसेच अमेरिकेतील आर्थिक परिस्थिती कधी आणि कशी डबघाईला आली, त्याचीही कारणमीमांसा त्यांनी दिली आहे.

अॅड. उज्ज्वल निकम न्यायप्रक्रियेच्या बाजूने मत नोंदवतात. न्यायाधिशाला कायद्याचे ज्ञान असते, त्या चौकटीत ते खटल्याकडे पाहतात. सामान्य माणसाचा कॉमन सेन्स हा भिन्न असतो. त्याला कायद्याचे सखोल ज्ञान नसते. पण जीवनाकडे पाहण्याचा त्याचा एक विवक्षित जीवनाभिमुख दृष्टिकोन असतो. त्यामुळे तो जीवनाकडे वेगळ्या दृष्टीने पाहू शकतो. जीवनमूल्याचा आधार घेतो. हा दृष्टिकोन अमेरिकन न्यायव्यवस्थेला महत्त्वाचा वाटतो. म्हणून प्रत्येक नागरिकाला 'ज्युरी ड्युटी' लावली जाते. अर्थात ही पद्धती फारशी उपयुक्त नाही. यात भावनेलाही महत्त्व प्राप्त होऊ शकते, असे त्यांचे मत आहे.

अच्युत गोडबोले हे संगणक क्षेत्रातले प्रथितयश असलेले नाव. अमेरिकेतील या व्यवसायाच्या विविध अनुभवांचे वर्णन त्यांनी केले आहे. परंतु त्याचवेळी त्यांनी एक महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले आहे. आणि ते आहे ग्रंथालयाचे. जाडजूड आणि दुर्मिळ पुस्तके काहीही डिपॉझिट न घेता ही ग्रंथालये देतात.

डॉ. सलिल कुलकर्णी, स्वाती दांडेकर, विद्या हर्डीकर-सप्रे, अनुराधा गानू, डॉ.भूषण केळकर, सुनीता धुमाळे यांच्याही मुलाखती यात आहेत. स्वतः डॉ. गजानन सबनीस यांचा लेख आहे.

अनेकांच्या मतांतून एक चित्र उभे करण्याची कल्पना अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. ही कल्पना साकारली आहे डॉ.लतिका भानुशाली आणि डॉ. गजानन सबनीस यांनी. दोघेही आपापल्या क्षेत्रात लौकिक संपादन केलेले. डॉ सबनीस हे अमेरिकेत ५० वर्षे वास्तव्य केलेले, स्थापत्यविशारद आणि हार्वर्ड विद्यापीठाचे निवृत्त प्राध्यापक. तर डॉ. भानुशाली या अर्थशास्त्र, मराठी आणि राज्यशास्त्र या विषयांच्या अभ्यासक, लेखिका. मान्यवरांच्या मुलाखतीतून जे वास्तव प्रतिबिंबित झाले आहे, ते काचेच्या तुकड्यांप्रमाणे अनेक रंगाचे, आकाराचे आहे, ते जसे भावले, तसेच मांडले आहे. एकाच देशाला किती पैलू असू शकतात याचे सार यातून सापडत जाते. तोच या संपादकद्वयांचा हेतू होता, तो साध्य झालेला आहे हे वाचकांनी ठरवायचे आहे. परंतु त्यांनी घेतलेले परिश्रम आणि दाखविलेली कल्पकता नक्कीच स्तुत्य म्हणावी लागेल. भाषेतला आणि लिखाणातला कसदारपणा हा त्यांच्या प्रकृतीशी जुळणारा आहे. स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा आणि अमेरिकन ध्वजासह डॉलरची प्रतिकृती ही जणू मुखपृष्ठावरील मोहरच. पुंडलिक वझे यांचे हे मुखपृष्ठ उठावदार झाले आहे, जसे वाचकांना साद घालीत आहे.

**मूल्य २५० रु. • सवलतीत १५० रु.**

## ग्रंथपान

कुठलेही पुस्तक हातात घेण्याची उत्सुकता वाचकाच्या मनात निर्माण करते ते मुखपृष्ठ. सुंदर, आकर्षक, मोहक पेहराव बाह्यरंगाची तरलता दाखवते तेव्हाच अंतरंगाचे कुतूहल जागृत करते ते मुखपृष्ठच. नितळ निळ्या रंगाचे अंत नसलेले आकाश आणि अथांग पसरलेला बेलाग सागर, त्यावरून झेप घेतलेला पांढराशुभ्र पक्षी, आपल्या सजवलेल्या निवासाच्या खिडकीतून अनिमिष नेत्रांनी पाहणारी पाठमोरी ललना असलेले मुखपृष्ठ असेल तर या कुतूहलास किनारा सापडणे कठीण. अशावेळी एकच पर्याय उरतो, पुस्तक उचलण्याचा, चाळून पाहण्याचा, वाचण्याचा. असे सुंदर आणि कुतूहलाच्या जाणिवा जागृत करणारे मुखपृष्ठ असलेले पुस्तक म्हणजे रेखा राव यांचे ‘झेप’ हे पुस्तक होय. आणि हे मुखपृष्ठ सजवले आहे चित्रकार सतीश भावसार यांनी.




अथांग आणि बेलाग सागर नजरेसमोर दिसू लागतो तेव्हा एक गोष्ट नक्कीच लक्षात येते की, इथे जे काही आहे ते आपल्या इच्छेने, मर्जीने. स्वतंत्र. स्वतःचा आवाका असलेले. समोर आकाश आहे ज्यात जिद्दीने विहार करण्यासाठी पक्षी झेपावला आहे. हा पक्षी आणि ललनेच्या आकांक्षेचा, ध्येयाचा, मुक्ततेचा प्रतीक. हे सारे मनावर उमटले ते हे मुखपृष्ठ पाहून. दुसरे कुतूहल रेखा राव नावाचे. ते कादंबरी विश्वात तसे फारसे परिचित नसलेले. कादंबरी हा विषय तसा मोठा आवाका असलेला. तो या लेखिकेने कितपत पेलला आहे, किती न्याय दिला आहे हा प्रश्न आपोआपच पुढे आला. आतापर्यंत स्त्री लेखिकांनी केलेले लेखन विपुल प्रमाणात आहे. समर्थपणे त्यांनी तो तो विषय, वाङ्मय प्रकार हाताळलेला आहे. त्यांच्या पंक्तीला बसण्याचा मान रेखा राव यांनी मिळवला आहे का, हाही प्रश्न उपस्थित झाला. प्रश्नांची उत्तरे पुस्तक वाचल्याशिवाय कशी मिळणार? मग त्याच कुतूहलापोटी वाचन सुरू झाले.

विषयाचा आवाका मोठा आहे. पार्वती मेमन ही एक जिद्दी मुलगी एका सुसंस्कारी कुटुंबातून ध्येय उराशी बाळगून घराबाहेर पडते. ‘अचा– अम्मा, मला मुळी लग्नच करायचं नाही. शिकून स्वतःच्या पायावर उभं राहायचंय. नोकरी करायचीय. काहीतरी करून दाखवायचं आहे.’ हा तिचा दृढ निश्चय. केरळ सारखा निसर्गसंपन्न परिसर आहे. तिकडचे रीतिरीवाज आहेत. कौटुंबिक संस्कार आहेत. कुटुंब भरलेले आहे. या सगळ्यांना सोडून ही मुलगी नोकरीच्या निमित्ताने अनोळखी मुंबईत पाऊल ठेवते. अनोळखी शहर, अनोळखी माणसे, कार्यालये, गर्दी, वाहने, रेल्वे. या सगळ्यांशी झुंज देते. प्रेमात पडते. अपघातात सापडते, प्रेमाच्या आणि वाहनाच्या. सावरते. आपल्या ध्येयाकडे लक्ष केंद्रित करते. एकटीने प्रवाहाला मागे सारीत झेपावते, येऊन विसावा घेते, जिथे जिद्दीला किनारा सापडतो. आकाशात झेपावणारा शुभ्र पक्षी नजरेसमोर उभा राहतो.

पार्वतीच्या सोबतीने अनेक व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. कुटुंबवत्सल अम्मा–अचा आहेत. कुटुंबात नंदिनी, पद्मिनी, विलासिनी, अमिनी या चार बहिणी आहेत. हे सारेजण एका कोषात वावरत असतात, संस्काराच्या. तर लिना नावाची मैत्रीण आहे, जी स्वतःच्या ऐटीने ग्लॅमरस पद्धतीने जगण्याची इच्छा बाळगून आहे आणि त्यात ती चांगली मुरलेली आहे. सुबेंधू घोष नावाचा प्रियकर तिच्या आयुष्यात डोकावतो. आणि अर्ध्यावर सोडून निघून जातो. मुलीसारखी काळजी घेणारा नोकर कण्णोमा आहे. या साऱ्या व्यक्तिरेखा ठळकपणे उभ्या करण्यात आलेल्या आहेत, त्यांच्या वैशिष्ट्यांसह. त्या पार्वतीच्या जीवनावर परिणामांची छाप टाकण्यात यशस्वी होतात. पार्वतीला एकटे राहावे लागते, सुरुवातीला नाईलाज म्हणून, पुढे ठरवून. एका उंच आसनावर स्थिरावूनही एकटीच, निश्चयाने, दृढपणे यात मनाची घालमेल आहे, अगतिकता आहे, आनंद आणि दुःखाचा ऊनसावलीसारखा खेळ आहे. परंतु या सगळ्यात दिसून येते ते पार्वती मेमनचे खंबीरपण. जे घडून गेले ते मागे पडले. पाठमोरी ललनेची आकृती हेच सांगत असते. सर्व काही मिळवूनही एकटी आहे, सागरासारखी, मर्जीने जगणारी, स्वतंत्र. ठाम.

पार्वती मेमन ही व्यक्तिरेखा उभी करताना, अनेक जागा सापडतात, जिथे संयम सुटू शकतो, तोल जाऊ शकतो. रंजकतेच्या नादात भडकपणा येऊ शकतो. परंतु लेखिकेने हे भान जपले आहे. आपल्याला जे सांगायचे आहे, ते कमी शब्दात, कलात्मकपणे सांगता येते, हे त्यांना साधले आहे. प्रसंगांची गर्दी करून विषयाला ताण देणेही शक्य होते. परंतु मोजक्याच प्रसंगांना आकृतीबंधात बांधून आपल्या इप्सिताकडे त्या पोहोचल्या आहेत. पार्वती मेमनच्या तोंडी टाकलेले वाक्य, ही त्यांच्या कादंबरीच्या शेवटाची कल्पकता सुरेख म्हणावी लागेल. सोडून गेलेला प्रियकर परत येतो. तिचे वैभव पाहून म्हणतो, ‘तुझं ध्येय साध्यं केलंस. मोठी पोस्ट, पैसा, कीर्ती, यश, सारं मिळवलंस. आता आपण लग्न करू या.’ त्यावर ती उत्तर देते, ‘माझ्या पूर्वायुष्यातलं पर्व केव्हाच संपलं. पण माझं ध्येय अजून संपलेलं नाही. मला अजून काही मिळवाचंय. अजून काही शिकायचंय, ह्या मोठ्या खिडकीतून दिसणारं आकाश पाहिलंस? त्याला अंत आहे का?’

फ्लॅशबॅक पद्धतीने या कादंबरीची मांडणी करण्यात आलेली आहे. लेखिका अमराठी असूनही मराठीतून उत्तम लेखन केले आहे. त्यांचा भविष्यकाळ उज्वल आहे, नक्कीच.

**मूल्य १२५ रु. • सवलतीत ७५ रु.**

# ग्रंथपान

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३

जस्ट बिलिव्ह
शिल्पा खेर




'एखादं छान पेंटिंग किंवा एखादं छान शिल्प यांचा काय उपयोग असतो माहीत आहे? दोज आर इन्स्पिरिशन फॉर थाउजण्डस् ऑफ पिपल. मे बी फॉर मिलियन्स.' किती छान विचार आहे हा! कुठलीही कलाकृती ही नुसतीच डोळ्यांना, कानांना वा मनाला रिझवणारी नसते, तर प्रेरणेची उर्जा पुरवणारी ती मोठी शक्तीही असू शकते. हा विचार मांडला आहे शिल्पा खेर यांनी. त्या मुळातच इतरांच्या साठी काही आपण केलेच पाहिजे, या ऊर्जेने भारावलेल्या आहेत. ती उर्जा त्यांनी कृतीत आणली आहे. भाग्यश्री फाउंडेशन ही त्यांची संस्था त्या ऊर्जेचे प्रतीक आहे. आणि तिच्या मुळाशी आहे भविष्याचा वेध घेणारा विद्यार्थी. त्याची भरारी, त्याचा उत्कर्ष. शिवाय इतरही अनेक उपक्रम आहेत, ज्यातून केवळ मदतीचा हातच नव्हे तर, माणूस समजून घेण्याचे,घडवण्याचे कार्य चालते. याचाच एक भाग म्हणजे त्यांचे साहित्य. आतापर्यंतचे प्रकाशित झालेले त्यांचे साहित्य याची ग्वाही देते.

मुलांच्या ठायी अनेक उपजत गुण असतात, परंतु त्यांची जाणीव त्यांना नसते. ती कुणीतरी करून द्यावी लागते. तिचा विश्वास त्यांच्यात निर्माण करावा लागतो. ते करण्याचे काम मॅगनस व्हाईट करतो. मॅगनस हा एलियन आहे. परगृहावरून तो आला आहे. तो जगातल्या पाच मुलांची निवड करतो, जी मुले जगातली सगळ्यांत हुशार आहेत. ती जगातल्या वेगवेगळ्या भागातून आलेली आहेत. त्यांच्याकडे असलेली बुद्धिमत्ता, क्षमता, आणि उर्जा ही उच्च कोटीची आहे. ती कशी प्रकट करायची आणि तिच्याशी या मुलाचा परिचय कसा करून द्यायचा, हे महत्त्वाचे कार्य करतो तो मॅगनस. त्यासाठी मजेशीर कल्पकता तो उपयोजतो. प्रत्येक मुलासाठी एक दिवस देतो, स्वप्नातला. आणि स्वप्नात तो कोणते स्वप्न कोणत्या प्रकाराने साध्य करतो, हे इतर मुलांना दाखवतो. किंबहुना इतर मुले ही त्याच्या स्वप्नाचा एक भाग असतात. त्यातून प्रत्येकाला स्वतःची ओळख होते, तशी एकमेकांची देखील होते. त्यातून एक वाक्य उत्स्फूर्तपणे येते, 'आपला टॅलेण्ट दुसऱ्यांना कळण्यापेक्षा महत्त्वाचं आहे आपल्याला स्वतःला त्याची जाणीव असणं, आपल्यावर विश्वास असणं.'

या पाच मुलांची नावे आहेत, समर, जेम्स, लिन्सी, मिसा आणि निक. प्रत्येकाचा देश वेगळा, संस्कृती वेगळी, वर्ण वेगळा, शरीरयष्टी वेगळी, तशी प्रत्येकाची स्वप्ने,ध्येय वेगवेगळी. त्यामुळे जे प्रसंग उभे केले आहेत, ते त्यांना अनुसरून. त्या प्रसंगात तो कसा वागतो, कोणते निर्णय घेतो, त्यापाठी त्याची भूमिका कशी आहे, इतरांसाठी तो काय करू शकतो, स्वतःपेक्षा इतरांची किती काळजी घेऊ शकतो, आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्यातून बाहेर पडण्याचे त्याचे कसब कसे आहे, हे सारे त्यातून पाहिले जाते, उलगडले जाते. आणि जगातल्या हुषार मुलांपैकी तो एक का आहे, याची ओळख त्यातून करून दिली जाते. त्यातले उदाहरण घ्यायचे तर मिसाचे 'रेस्ट ॲट यूवर होम'चे स्वप्न. ती एक अतिशय सुखवस्तू घरातील मुलगी असूनही अशा ठिकाणी हॉस्पिटल चालवते, एक डॉक्टर म्हणून, जेथे हॉस्पिटल ही संकल्पनाच कुणाला ठाऊक नाही, आणि ती मान्य नाही, अशा अतिशय दुर्गम आदिवासी भागात, अंधश्रद्धेच्या गर्तेत सापडलेल्या भागात. तिथे तिला अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागते, अगदी जिवे मारण्याच्या घटनेपर्यंत. तरीही ती आपले व्रत सोडत नाही. उलट सगळ्यांचा विश्वास संपादन करते. त्यातले एक वाक्य ती सांगते, 'पेशंट जर माझ्याकडे येत नसेल तर मला पेशंटकडे गेले पाहिजे.' आणि लोक तिचे हॉस्पिटल जाळायला निघतात, तेव्हा ती सांगते,'विश्वास ठेवा, इथलं हॉस्पिटल जाळल्यानंतर इथे पुन्हा दुसरं हॉस्पिटल उभं राहील. अधिक नव्या आशा आकांक्षा घेऊन. तुम्हा सर्वांची अधिक जोमाने सेवा करण्यासाठी.'

मुलांचे भावविश्व उभे करणे, ही मोठी अवघड कला आहे. स्वभाव आणि प्रसंग यांची सांगड घालायची हे काम आव्हानात्मक स्वरुपाचे असते. परंतु लेखिकेने, प्रत्येक मुलाचे वेगळेपण त्याच्या वैशिष्ट्यांसह ठळकपणे जपले आहे. त्याला अधिकाधिक उजाळा दिला आहे. आपल्याला जे सांगायचे आहे, तो धागा घट्ट गुंफला आहे. पालकांना आपल्या मुलांच्या टॅलेण्टकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा असावा, हे या मॅगनसच्या व्यक्तिरेखेतून साकारते, तसे मुलांना स्वतःच्या टॅलेण्टला आपण कसे आकार देऊ शकतो, ते या पाच मुलांच्या व्यक्तिरेखांतून दाखविले आहे. त्यासाठी भाषेकडे अधिक लक्ष द्यावे लागते. आपल्याला जे सांगायचे ते सुलभरीतीने वाचकाला उमगले पाहिजे, याचेही भान लेखिकेने जपले आहे. अलीकडे सर्वच स्तरावर इंग्रजीचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू झाला आहे. चार मराठी वाक्यात दोन इंग्रजी वाक्यांचा समावेश होऊ लागला आहे. ते वास्तव लेखिकेला नजरेआड करणे शक्य नव्हते. त्यामुळेच काही वाक्ये इंग्रजीतून पेरली आहेत. जगातली हुषार मुले म्हटल्यानंतर इंग्रजीला वगळून कसे चालेल?

बालसाहित्यात मुखपृष्ठाचे महत्त्व वेगळे आहे. आतला विषय कोणता आहे, आणि तो जिज्ञासेला पूरक आहे की नाही, हे मुखपृष्ठानेच अगोदर सांगायचे असते. पुंडलिक वझे यांनी मुलांना समोर ठेवून चित्रकलेची काही पुस्तके यापूर्वीच प्रसिद्ध केलेली आहेत. त्यामुळे या पुस्तकातील समर ऊर्फ सिमी या मुलाचे भावविश्व काय होते आणि ते कसे साकारले गेले, याची कल्पना स्पष्ट व्हावी, असेच मुखपृष्ठ त्यांनी तयार केले आहे. छान!

**मूल्य २०० रु. • सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

'लोकांना नुसता रस्ता दाखवून लोक त्यावर चालत नाहीत. त्यांना दिशा दाखवली पाहिजे, त्यांच्यासोबत चाललं पाहिजे.' 'माझ्या समाजाला कुणाही समोर हात पसरावे लागू नयेत. त्यांना त्यांचे अधिकार कळावेत, आपले अधिकार मिळवण्याची कुवत आणि हिम्मत त्यांच्यात यायला हवी, हे माझं स्वप्न आहे.' 'आपण करत असलेले काम हे केवळ कुणालातरी वाटते म्हणून करायची गोष्ट नाही. हे काम करण्यात आपल्याला आनंद, समाधान मिळते यापलीकडेही ती अधिक जबाबदारीने करायची गोष्ट आहे.'

**पंख आणि पंजे**
विलास सरमळकर



हे उद्‌गार आहेत, प्रत्यक्ष समाजात राहून समाजासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे. गाव सुधारणा, शिक्षण, महिला सक्षमीकरण, रोजगार हमी, ग्रामसभा, लोकाधिकार अशा अनेक क्षेत्रात ग्रामपातळीवर काम करणारे हे कार्यकर्ते आहेत. आपण काही केले पाहिजे, आणि जे करायचे ते मनापासून करायचे, असे हे कार्यकर्ते आहेत. गावपातळीवरील, गावाशी नाळ जोडलेले. आंतरिक तळमळ आणि परिश्रम करायची तयारी असलेले. त्यांचे कार्य कसे चालते, ते करतांना कोणत्या दिव्यातून त्यांना जावे लागले, त्यांच्या कार्याचे फळ कसे आहे आणि व्यक्ति म्हणून या कार्यकर्त्याची ओळख काय आहे, याचा परिचय देणारे पुस्तक म्हणजे हे 'पंख आणि पंजे' होय.

'कोरो साक्षरता समिती' नावाची संस्था अनेक उपक्रम चालवते. त्यासाठी कार्य करणाऱ्या, कार्याची आवड असलेल्या उत्साही कार्यकर्त्यांची निवड करून त्यांना फेलोशिप देते. आवश्यक ते प्रशिक्षण आणि मार्गदर्शनही देते. अशी फेलो मंडळी आपापल्या गावी, वस्ती वा त्यांच्या समुहात जाऊन काम करतात. यात ज्यांनी उत्तम प्रकारे काम केले आहे, करीत आहेत, अशा बारा कार्यकर्त्यांचा परिचय व त्यांचे कार्य याविषयी या पुस्तकात माहिती दिलेली आहे. लेखक स्वतः याच संस्थेत कार्यरत असल्याने व्यक्ति आणि कार्य यांच्याशी परिचित आहेत. एका अर्थाने ही सगळीच मंडळी सहप्रवासी आहेत.

'मेळघाटची गंगा' या लेखातील गंगा ही बारावी शिकलेली आहे. कोरकू, मराठी हिंदी या भाषा तिला अवगत आहेत. समाजकार्याची आवड असलेली गंगा धाडसी आहे. तिच्या कार्यामुळे ती सरपंच म्हणून निवडली गेली. सरपंच म्हणून वागताना कुणाला पंचायतीच्या कचेरीवर येण्याची गरज भासणार नाही याची काळजी घेते. तिचे दप्तर बुलेटवर असते. स्वतः बुलेट घेऊन ती सगळ्यांच्या मदतीला हजर असते. इतकेच नाही तर, गावात पाणी न सोडणाऱ्या इंजिनिअरचा भ्रष्टाचारी स्वभाव पाहून एक दिवस त्याच्या कानाखाली वाजवायला ती कमी करीत नाही. तिने तिच्या गावाला 'मॉडेल गाव' बनवण्याचा ध्यास घेतला आहे. 'इस्तो' या लेखातील विठ्ठल सोनारवाडी, चंदगड तालुक्यातला. शिक्षणात आपला गाव मागे का असावा, या चिंतेतून त्यावर मात करण्याचा तो चंग बाधतो. शाळा, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांच्याशी बसून या प्रश्नाचे मूळ शोधून काढतो. त्याची वर्गवारी करून उपाय ठरवतो. आज या गावातले पालक मुलांच्या शिक्षणासाठी आग्रही झाले आहेत आणि मुलांनी गावाचे नाव काढायला सुरुवात केली आहे. 'पुढचं पाऊल'मधील बबीता ही उस्मानाबाद जिल्ह्यातील कबेर गावची. पाच लमाण तांडे एकत्रित करून तिथे रेशन दुकान, स्मशानभूमी, ग्रामपंचायत यासाठी पुढाकार घेते. शिक्षणात आपली मुले मागे राहतात कारण त्यांची भाषेची अडचण. त्यांना लमाणी भाषा येते. शिक्षण प्रमाण मराठीतून. त्यामुळे ते समजत नाही. म्हणून शाळेतच जाणे नको. ही समस्या ओळखून ती दूर करण्यासाठी प्रत्येक तांड्यावर 'सांकशाळा' या नावाने मुलांचे वर्ग घेते. कावळा, कोंबडा, मांजर, गाय, डोंगर यांना दोन्ही भाषेत कोणते शब्द आहेत ते समजावून सांगते. यातून मुलांच्या मनातला गोंधळ दूर होतो. मुले शाळेकडे वळू लागतात. वर्गातील मुलांची संख्या आपोआप वाढली. पाच वर्षात १३२ बचतगटांच्या माध्यमातून १८५० महिलांना संघटित केले. शिधापत्र, ओळखपत्र, आधारकार्ड, जातीचे दाखले मिळवून देण्यात ती आघाडीवर असते. 'दशा आणि दिशा' या लेखातील द्वारकाताई 'लोकाधिकार' आंदोलन संघटनेच्या जिल्हा प्रवक्त्या आहेत. पारधी समाजाला गायरानाची शेती मिळावी म्हणून आंदोलन करतातच परंतु त्याचवेळी गावातले वातावरण सलोख्याचे असावे म्हणून प्रयत्न करतात. 'असाध्य ते साध्य, करिता सायास' या लेखातील सूर्यकांत अनेक चळवळीत काम करतो. परंतु त्याचे खरे कार्य आहे ते कोरडी असलेली माण नदी जिवंत करण्याचे. सगळ्यांच्या सहभागातून पाणी अडवण्याचे. भालवडी हे त्यामुळे टँकरमुक्त झाले. 'गावकारभारीण' या लेखातील मंगल कांबळे ही महिला कुटुंबाचे घर केवळ नवऱ्याच्या नावावर न राहता, जोडीने पत्नीच्या नावाचाही त्यात समावेश असावा, यासाठी प्रयत्न करते. ही संयुक्त घर कल्पना पुरुष मंडळीच्या विरोधाला न जुमानता, समजावून ती राबवतात. यात आणखी कुलदीप राठोड, वनिता वाघमारे, महेश माने, शोभा बोलाडे, कबीर बनसोडे सारखे कार्यकर्ते आहेत. या सगळ्यांची माहिती वाचताना लक्षात येते, गावपातळीवर करण्यासारखी किती कामे आहेत. आणि ही कामे करणारी माणसे सुद्धा किती साधी, तरी किती मोठी आहेत. लेखकाने चांगल्याप्रकारे त्यांची ओळख करून दिलेली आहे. एक वेगळे पुस्तक वाचल्याचा आनंद हे पुस्तक देते.

झेप घेणारे पंख धारदार नखे असलेले पंजेही होऊ शकतात, ही सतीश भावसारांची कल्पना आकर्षक, त्यामुळे मुखपृष्ठही आकर्षक झाले आहे.

**मूल्य २०० रु. • सवलतीत १२० रु.**

## ग्रंथपान

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी होत असलेल्या लेखनाशी वाचक म्हणून आपण बरेचसे परिचित आहोत. एक व्यक्ती म्हणून असलेले बाबासाहेब, समाजधुरीण म्हणून असलेले बाबासाहेब, राजकारण–सामाजिकीकरण आणि वैश्विक विचारकारण म्हणून असलेले बाबसाहेब, असे अनेक पैलू असलेल्या बाबासाहेबांना महामानव का म्हटले जाते, यांचा परिचय आपणास होतो, तो याच लेखनातून. हा परिचय होत असताना अनेक नवे संदर्भ देखील नव्याने आपल्यासमोर उलगडलेले दिसतात. धनंजय कीर, डॉ. नरेंद्र जाधव यांच्यासारख्या अनेक सिद्धहस्त लेखकांचे त्यात असलेले योगदान मोठे आहे. त्यांच्याच पंक्तीला आणखी एक लेखक आहे, योगीराज बागूल. त्यांचे 'आठवणीतले बाबासाहेब' हे पुस्तक आपण या पूर्वीच वाचलेले आहे. त्यात त्यांनी एक वेगळा दृष्टिकोन समोर ठेवला होता, निवडक व्यक्तींच्या अनुभवांचा, ज्या व्यक्तींना प्रत्यक्ष बाबासाहेबांचा दीर्घकाळ सहवास लाभलेला होता. आता बागूल यांनी पुढचे पाऊल टाकले आहे. ते अशाच व्यक्तींचा परिचय आपल्याला करून देत आहेत, ज्यांनी बाबासाहेबांच्या सोबत दीर्घकाळ एकत्रित राहून त्यांचे कार्य पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. निष्ठा, ध्येय आणि दृष्टिकोन या दृष्टीने सगळ्याच व्यक्ती बाबासाहेबांच्या कार्याशी एकजीव होत्या, मात्र त्या दलितेतर होत्या. या सगळ्यांचे संदर्भ शोधणे, मिळेल तिथून ते प्राप्त करणे, संबंधितांच्या कुटुंबियांशी संपर्क करून त्यांच्या मुलाखती मिळवणे, मोठ्या कष्टाचे परंतु तितकेच मौलिक काम बागूल यांनी केले. त्यातून हा ग्रंथ साकारला गेला, ज्याचे नाव आहे, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे दलितेतर सहकारी.'

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे दलितेतर सहकारी**
**योगीराज बागूल**




रावबहादूर सीताराम केशव बोले, हे भंडारी समाजातील, मुंबई प्रांताच्या नवीन विधिमंडळात निवडून गेलेले. दलित समाजाची शोचनीय अवस्था दूर व्हावी म्हणून त्यांनी क्रंतीची ठिणगी ठरावी असा ठराव या विधिमंडळात मांडला; सरकारी पाणवठे, विहिरी, धर्मशाळा, न्यायालये, कचेऱ्या, दवाखाने इ. ठिकाणी दलित वर्गाला मुक्त प्रवेश मिळावा. तो दिवस होता, ४ ऑगस्ट १९२३. गणेशोत्सवात गणेशमूर्तीची पूजा करण्याचा मान दलितांनाही मिळाला पाहिजे म्हणून दादरच्या मंडळाच्या मंडपात ठाण मांडले, नव्हे तो मान मिळविला. या सत्याग्रहात बाबासाहेबांच्या सोबत अनेक नेते होते, त्यात बोले हे एक होते.

नारायण मल्हार जोशी हे तर त्याकाळचे कामगारांचे मोठे नेते. परंतु त्याचवेळी ते बाबासाहेबांचे शिक्षक. सोशल सर्व्हिस लीगचे काम अनेक पातळ्यांवर सुरू होते. ब्रिटिश सरकारच्या मध्यवर्ती सरकारमध्ये दोघेही होते. कामगार परिषदेच्या गव्हर्निंग कौन्सिलवर दलित कामगार प्रतिनिधी असावा या प्रयत्नाला यश आले, ते या दोघांच्या प्रयत्नांमुळे.

देवराव विष्णू नाईक हे ब्राह्मण तरीही बाबासाहेबांच्या आणि दलित समाजाविषयी आस्था असलेले. 'समता' पाक्षिकाची त्यांनी नुसतीच धुरा सांभाळली नाही, तर या चळवळीचा, मोर्च्याचा, सत्याग्रहाचा वृत्तांत आणि बाबासाहेबांच्या बातम्या व भाषणे यातून देण्यावर त्यांचा भर असायचा.'बहिष्कृत भारत' चे संपादकत्व त्यांनी भूषविले. त्यांची तळमळ पाहून बाबासाहेब लिहितात, 'माझ्या भावनांशी, जनतेच्या सुखदुःखांशी व त्यांच्या आकांक्षाशी तुम्ही इतके समरस व एकजीव होऊन गेला आहात की तुम्ही आमच्याप्रमाणे जन्मजातीने दलित नाहीत एवढीच तुमच्यात काय ती आमच्यापेक्षा भिन्नता.'

गंगाधर नीळकंठ सहस्त्रबुद्धे यांचा मोठेपणा असा, मनुस्मृतीचे जाहीर दहन करताना, तिचे एकेक पान फाडून अग्नीच्या मुखात सोडताना जे स्वाहाऽचे श्लोक म्हणायचे ते त्यांनी म्हटले होते.

अनंतराव चित्रे यांच्यासोबत त्यांच्या पत्नी इंदिराबाई याही महारवाड्यात स्वयंपाकासाठी गेल्या म्हणून त्यांच्या हातची दिवाळीच्या फराळाची ताटे स्वधर्मीयांनी परत केली. हे असे कटू अनुभवही अनेकांच्या वाट्याला आले. परंतु कुणी आपल्या कार्यापासून फारकत घेतली नाही.

यात एकूण अकरा सहकाऱ्यांचा परिचय आहे. हे सहकारी केवळ बाबासाहेबांचे सहकारी होते, म्हणून तेवढाच परिचय करून दिलेला नाही. तर ते त्यांच्या कार्याने कसे श्रेष्ठ होते, त्यांची कौटुंबिक परिस्थिती कशी होती, नंतरच्या राजकारणात ते कसे आणि कुठे राहिले, अशी संपूर्ण माहिती लेखकाने वाचकांच्या समोर ठेवलेली आहे. बाबासाहेबांचे कार्य अनेक पातळीवर चालत असे. त्या सगळ्या पातळ्यांवर हे सहकारी प्रसंगी कसे सहभागी असत, याची माहिती मिळते तशी ते प्रसंग कसे घडले, यांचीही माहिती यात दिलेली आहे. या प्रसंगांना स्थळ आणि दिनांकांची जोड दिल्याने त्यांचे संदर्भमूल्य वृद्धिंगत झाले आहे. बाबासाहेबांचे चरित्र, त्यांचे कार्य आणि या सर्व सहकाऱ्यांचे कार्य व चरित्र अशी सुरेख सांगड लेखकाने घातलेली आहे, तीही तितक्याच चांगल्या ओघवत्या शैलीत.

योगीराज बागूल यांनी नमूद केल्याप्रमाणे हा पहिला खंड आहे. दुसऱ्या खंडाची उत्सुकता लावणारा हा खंड आहे. मुखपृष्ठाची कल्पना त्यांचीच आहे, तरी तिला सजवण्याचे सतीश भावसारांचे कौशल्य तितकेच सुंदर आहे. त्या फोटोत कोणकोण सहकारी आहेत, त्यांची नावे आतल्या पृष्ठावर दिलेली आहेत. त्यावरूनच सहकाऱ्यांच्या सहभागाची कल्पना स्पष्ट होते.

**मूल्य ३०० रु. • सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

चांगदेव काळे

संपर्क : ९८६९२०७४०३

महाराष्ट्र शासनाच्या वाङ्मयीन पुरस्कारांची यादी वर्तमानपत्रात वाचत असताना, एका नावाशी थांबलोच. हे नाव नुसतेच परिचयाचेच नाही तर त्यांची पुस्तके देखील वाचलेली होती. आणि जे पुस्तक मनापासून भावले होते, त्यालाच पारितोषिक जाहीर झालेले होते. असा जिव्हाळा निर्माण करणारा प्रसंग समोर आला की मन कसे फुलून येते. तसे या पुरस्काराने झाले. ते पुस्तक होते, 'सावन बरसे' आणि त्याच्या लेखिका आहेत स्मिता भागवत. तानसेनवरील त्या पुस्तकाने बरेच भारावून टाकले होते. त्याची दखल घेतली गेली याचा आनंद मोठा होता. त्यात योगायोग असा की त्यांचे दुसरे पुस्तक 'जगा'वेगळे' हे त्यावेळी टेबलावर समोरच वाचनासाठी ठेवलेले होते. त्याच्याकडे पाहून मुद्दाम म्हटले, 'मित्रा, बघ आपल्या एका मित्राने शासनाच्या सन्मानाला गवसणी घातली. आता तुझी पाळी.'




स्मिता भागवत यांची ग्रंथसंपदा विपुल म्हणावी, इतकी नक्कीच आहे. मराठी सोबतच गुजराती, इंग्रजी, हिंदी मध्येही त्यांनी लेखन केलेले आहे. आणि त्यांच्या या संपदेची संख्या ३० हून अधिक आहे. त्यातला कौतुकाचा भाग असा की, अनेक वर्षांपासून परदेशात वास्तव्य असूनही देशी भाषांची नाळ कायम जपलेली आहे. भाषांमध्ये असलेला लडिवाळपणा सन्मानपूर्वक जोपासला आहे. त्यामुळे लेखन विपुल असूनही दर्जेदार असल्याची पावती त्याला मिळत आहे. 'जगा'वेगळे' हे पुस्तक त्याला अपवाद नाही.

'जगावेगळे' या शब्दातील 'वेगळे' या शब्दाला सुंदर श्लेष आहे. यात ज्या लेखांचा समावेश करण्यात आलेला आहे, आणि ज्यांच्या जीवनावर, घटनांवर हे लेख आधारित आहेत, ते सारेच जीवन जगावेगळे जगणारे आहेत. आपल्या चाकोरीबद्ध आयुष्यात काहींनी जाणीवपूर्वक वेगळे करण्याचा ध्यास घेतला तर, काही अन्य प्रसंगामुळे जीवनाच्या वेगळ्या पटलावर ठसा उमटवणारे निघाले. या सगळ्यांच्या या ध्यासाचा आणि प्रवासाचा वेध म्हणजे हे 'जगा'वेगळे' हे पुस्तक. यातले काही लेख यापूर्वी वेगवेगळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत. तशी नोंद त्या लेखांच्या शेवटी केलेली आहे.

'पैशाचे झाड' या लेखात अहमदाबादच्या नगीनदास शाह आणि जशुभाई यांच्यावरील एक लेख निशा नावाच्या तेरा वर्षाच्या मुलीच्या वाचनात येतो. हे दोघेजण गरजू रुग्णांना आर्थिक मदत करण्यासाठी 'दर्दी राहत फंड' जमा करण्याची योजना हाती घेतात. खिशात केवळ दहा रुपये असलेले हे दोघेजण अठ्ठावीस लाखाचा फंड जमा करतात. त्यांच्या या कार्याने प्रभावित होऊन निशा वडिलांना सांगते, 'पपा, मी असं पैशांचं झाड लावणार. त्याची फळं-फुलं गरजूंच्या ओंजळीत ओतणार!' नवसारीची ही निशा लहानपणीच जादूचे खेळ करण्यात तरबेज आणि अभ्यासात गुणवत्ता यादीत झळकणारी. तिने या बळावर 'निशा राहत निधी' हा ट्रस्ट स्थापन केला. त्याचाच पुढे वटवृक्ष झाला. 'पैशांचे झाड'. तीच गोष्ट मफतलाल मोहनलाल महेता, या हिरे व्यापाऱ्याची. त्यांच्या 'दि.मो. महेता चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून होणाऱ्या मदतीचा ओघ पाहिला, तर आश्चर्याने डोळे विस्फरतात. तरीही त्यांना यात समाधान नाही. ही दानदीपाची माळ त्यांना आणखी वाढवायची आहे. क्लॅरा आणि जेम्स हॅझल हे नवदाम्पत्य अमेरिकेहून मुंबईपर्यंत सायकलने प्रवास करण्याचे आव्हान स्वीकारतात. त्यांचा हा हनिमून किती खडतर आणि जिवावर बेतणारा असूनही ते त्याचा आनंद कसा घेतात, ही एक रोमांचकारीच नव्हे तर विस्मयकारी कथा 'किस्सा दुचाकी मधुचंद्राचा' या लेखात मांडली आहे. डॉ. जॅक केवोर्कीन हा पॅथालॉजिस्ट डॉक्टर. परंतु तो जीवनदाता ठरला तो वेगळ्या कारणाने. त्याने असह्य यातना सहन करणाऱ्या असंख्य रुग्णांना यातनामुक्त केले, ते त्यांना मरणाच्या वाटेवर जाण्यास मदत करून. त्याने केलेली मदत मुलखावेगळी असल्याने त्याची ओळख डॉ. डेथ अशी झाली. त्याची कथा 'मुलखावेगळा डॉक्टर!' या लेखात वाचायला मिळते. तसा आणखी एक डॉ. किम, ज्याने लिंग परिवर्तन करण्याचे उपचार केले, ते करण्याची कायदेशीर परवानगी देखील मिळविली. त्याच्या उपचाराची आणि स्वतःहून उपचार करवून घेणाऱ्या लोकांची माहिती 'निसर्गावर मात' या लेखात दिलेली आहे.

सिद्धहस्त लेखक एच.जी वेल्स, ओ हेन्री, नाटककार मोलियर, विल्यम शेक्सपीयर, मार्क ट्वेन, वाल्ट डिस्ने, आपल्याकडील आर्य चाणक्य, रामशास्त्री प्रभुणे, यांच्या जीवनातल्या काही प्रसंगांच्या नोंदी 'समस्या शाप नव्हे' या लेखात दिलेल्या आहेत. हे प्रसंग शाप म्हणून त्यांच्या जीवनात आले, परंतु तेच प्रसंग वरदान म्हणून सिद्ध झालेत, त्यांचे वेगळेपण या लेखातून वाचायला मिळते. याशिवाय 'कलंदर कलाकार', 'विश्वपटावर सप्तपदी', 'पेरणी झाली कागदावर' असे इतर लेख आहेत, ज्यातून चित्रकला, लेखन, विवाह यांच्यातले वेगळेपण उलगडून दाखविलेले आहे.

वाचन, प्रवास आणि मुलाखती यातून जे वेगळेपण जाणवले, जे इतरांनाही वेगळे वाटेल असे वाटले, ते या लेखांतून मांडले आहे. वाचल्यानंतर हे वेगळेपण नक्कीच अधोरेखित होते. सतीश खानविलकार यांनीही मुखपृष्ठावर वेगळेपण जपले आहे.

**मूल्य १५० रु. ● सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान




कंथा रणमें जाय के, कांई जुअे छे साथ
तारा साथी तीन है; हैयुं कटारी अने हाथ

(हे वीरा, रणंगणावर जाताना तुला सोबतीची गरजच काय? तुझी जिगर, तुझं मनगट आणि तुझी कट्यार हे सच्चे तीन साथी तर तुझ्यापाशी आहेतच!)

जन्मजात राजपूत असलेल्या आणि जन्मभर धैर्य, शौर्य, शस्त्र वागवणाऱ्या डी.सी.पी. जुवानसिंह जाडेजांना जीवनसंग्रमात हे तीन साथीदार लाभले आणि शीर्षकाच्या रुपानं त्यांच्या जीवनकहाणीलाही!

पोलीसखात्यातील ३८ वर्षांच्या कारकिर्दीची गाथा स्वतः जुवानसिंह जाडेजा यांनी वाचकांच्या समोर ठेवली आहे, ती त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. अरुणा यांच्या आग्रहामुळे. पोलीस खात्यात अत्यंत सचोटीने, धैर्याने आणि शौर्याने सेवा बजावलेल्या जुवानसिंहांच्या कारकीर्दीत अनेक प्रसंग आहेत, ज्यात त्यांच्या चाणाक्षपणाचे, शौर्याचे आणि धैर्याचे कसब पणाला लागले आहे. ते सारे ग्रंथरुपाने संग्रहित व्हावे, त्याचा उपयोग त्यांच्या वारसांना पुढे व्हावा, किमान वारसाला तो माहीत व्हावा, त्यांनी तो जतन करावा, यासाठी सौ. अरुणा यांनी आग्रह धरला. आणि त्यातून जुवानसिंहाची गाथा आकाराला आली, ती गुजरातीमधून 'हैयुं कटारी अने हाथ' या शीर्षकाने. तीही वयाच्या ८२व्या वर्षी. तिचा अनुवाद केला आहे, सुषमा शाळिग्राम यांनी.

जुवानसिंह यांनी १९५१ साली गुजरात पोलीस दलात प्रवेश केला तो पोलीस सबइन्स्पेक्टर म्हणून. ते १९८८ साली निवृत्त झाले त्यावेळी त्यांचा हुद्दा होता डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस. हा संपूर्ण काळ आहे गुजरात राज्यातील वेगवेगळ्या भागांचा. ज्याची सुरुवात होते, कच्छच्या अंजार, भूज आणि पेटलादपासून. इथेच मोकाजीभाई जाडेजा, फौजदार, हे गुरू म्हणून लाभले. त्यांनी एक मंत्र दिला, 'खून, आत्महत्या,अपघात असेल तिथे इतरांचे ऐकू नये, स्वतःचा आत्मा सांगेल तेच ऐकावे. लूट, चोरी, विश्वासघात, लबाडी, फसवाफसवी, धाड, मालमत्ता-पैसाअडक्याचा गुन्हा असेल, गुन्हेगाराकडून कधीही पैसे घेऊ नये. संपूर्ण तपास केल्यानंतरच गुन्हेगाराला पकडावे, निर्दोष माणसाला मुद्दाम पकडू नये. खरोखर गुन्हेगार नसणाऱ्या कोणाही बाईमाणसाशी नेहमी चांगलीच वर्तणूक ठेवावी. खोटी वचने देऊ नयेत आणि कोणाचाही विश्वासघात करू नये.' आपल्या गुरुचा हा मंत्र कायम जपला. त्यामुळेच अनेक गुन्हा यांचा शोध लावताना, आपल्या आतल्या आवाजावर विश्वास ठेवला. धाडसाने पाऊल टाकले. अनेक सराईत गुन्हेगारांना धडा शिकवला. गुन्हेगारी जमातींना अटकाव केला. आपल्याच खात्यात असलेले आपले सहकारी संशयास्पद वाटले तेव्हा त्यांच्या विरुद्ध कारवाई केली. इतकेच नव्हे तर, एका प्रकरणात असे लक्षात आले, ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट स्वतः गुंतलेले असून त्यांनी इन्स्पेक्टरला सामील करून घेतले आहे. तेव्हा त्या मॅजिस्ट्रेटला समक्ष भेटून त्यांच्या संबंधाची स्पष्ट कल्पना दिली. तेव्हा राजीनामा देण्याशिवाय मॅजिस्ट्रेटसमोर दुसरा पर्याय उरला नाही. पोलिसांचे राजकारण्याशी संबंध असतात किंवा ते त्यांच्या ताटाखालचे मांजर असतात, असा समज दृढ आहे. परंतु आमदारालाही अटक करण्याचे धाडस त्यांनी दाखवलेले आहे.

बंदोबस्त, जातीय दंगली या काळात पोलीस-खात्याची कसोटी पाहणारे क्षण येतात. परंतु जाडेजा अशा प्रसंगांना सामोरे जाताना कधी डगमगले नाहीत, की त्यांच्या मनाची चलबिचल झाली नाही. इंदिरा गांधींचा गुजरात दौरा, लालकृष्ण अडवाणी यांची रथयात्रा, यावेळचे त्यांचे अनुभव त्यांच्या कायम स्मरणात राहावेत, असे आहेत. अनेक प्रकरणात कोर्टात जबानी-साक्षीसाठी हजर राहावे लागले. परंतु जाण्यापूर्वी स्वतः सगळी तयारी करून जात, त्यामुळे हातात कुठला कागद न घेता संबंधितांची आडनावांसहित संपूर्ण नावे, दिनांक, ठिकाण यांचा तपशील ते सहजपणे सांगत, पाठांतर केल्यासारखे, ज्यामुळे न्यायालय देखील थक्क होत.

गुन्हेगारांकडून गुन्हा कबूल करून घेण्यासाठी थर्ड डिग्रीचा वापर करावा या मताशी ते ठाम आहेत. तसे केल्याने गुन्हेगारीला वचक बसतो. त्यांचे प्रमाण वाढण्यावर मर्यादा येतात. तसे केले नाही तर, गुन्ह्यांची उकल होण्यावर परिणाम होतो आणि पोलिसांचे गुन्हेगारांशी लागेबांधे आहेत, असा संदेश जनतेत पसरतो, असे त्यांचे मत आहे.

हे आत्मकथन म्हणजे एका पोलीस अधिकाऱ्याची कहाणी आहे. जे गुन्हे घडले, त्यांची उकल होईपर्यंतचा तपशील त्यांनी दिलेला आहे. यात सराईत गुन्हेगारांची नावे दिलेली आहे, तशी ज्यांचे सहकार्य लाभले, त्या खात्यांतील सहकाऱ्यांचीही नावे जशीच्या तशी आलेली आहेत. अनावश्यक वाटले तिथे नावे टाळलेली आहेत. प्रादेशिक भाग हा गुजरात असल्याने जाती-जमाती, प्रदेश, गुन्हेगार-पोलीस संबंध, गुन्ह्याच्या शोधाच्या पद्धती यांचे वर्णन ओघाने आले आहे. यात पोलीस आणि गुन्हेगार यांच्या मानसिकतेचेही दर्शन त्यांनी करून दिलेले आहे. आत्मकथन असूनही स्वतःचे कर्तृत्व,मोठेपण वा फुशारकीचा कोठे लवलेश नाही. एक प्रांजळ असे कथन आहे. त्याचा अनुवादही रसाळ पद्धतीने केलेला आहे. सतीश भावसार यांनी सजवलेले मुखपृष्ठही छान झाले आहे.

**मूल्य १५० रु. ● सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान

'पुरुष असो वा बाई, प्रत्येकानं आपलं आभाळ शोधावं आणि आपल्या जोडीदाराच्या आभाळावर हक्क दाखवण्यापेक्षा त्याचं त्याला द्यावं.'

'बाप्ये शोधतात रोज नवा व्हायरस बायांच्या फाईल्समध्ये सोडण्यासाठी. बायांना आता करावी लागेल त्यांच्या जगण्याची चौकट व्हायरस फ्री आणि जमलंच तर बदलूनही टाकावी लागेल हार्डडिस्क बाप्यांनी तयार केलेली त्यांच्यासाठी.'

'जगण्याच्या तळाशी शिरलेल्या माणसाला कोणत्याही प्रकारचं सेन्सेशनल विधान करण्याची गरज भासत नाही. कारण त्यानं केलेलं प्रत्येक विधान हे अखिल मानवजातीच्या जगण्याला भिडणारं विधान असतं.'




ही अशी भाष्य करणारी चिंतनशील विधाने आहेत 'शब्दारण्य' या लेखसंग्रहातील. आणि त्याच्या लेखिका आहेत नीरजा. आजच्या आघाडीच्या कवयित्रींपैकी एक नाव. 'निरन्वय', 'वेणा', 'स्त्रीगणेशा', आणि 'निरर्थकाचे पक्षी ' हे त्यांचे प्रकाशित कवितासंग्रह. कथालेखिका म्हणूनही त्यांचा लौकिक आहे. 'जे दर्पणी बिंबले', 'ओल हरवलेली माती' आणि 'पावसात सूर्य शोधणारी माणसं' हे त्यांचे कथासंग्रह प्रकाशित आहेत. शिवाय 'बदलत्या चौकटी' व 'चिंतनशलाका' असे दोन लेखसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. आणि आता ग्रंथालीने प्रकाशित केलेला हा 'शब्दारण्य' हा त्यांचा तिसरा लेखसंग्रह होय. या संग्रहातील लेख लोकसत्ता आणि मेनकामधून प्रसिद्ध झालेले आहेत. नीरजा या कसदार लेखन करणाऱ्या लेखिका म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा अनुभव त्यांचे लेखन वाचताना नेहमीच आलेला आहे. तोच अनुभव पुन्हा येतो तो हा 'शब्दारण्य' लेखसंग्रह वाचताना. चिंतन आणि चौफेर विचारांचा ठामपणा, सूक्ष्म निरीक्षण, नाते संबंधाबाबतच्या सजग जाणिवा, लेखक म्हणून 'स्व'पासून सार्वत्रिकतेकडे केलेला प्रवास, अभ्यास यामुळे त्यांच्या लेखनातले वेगळेपण अधोरेखित झाले आहे. त्याचाही प्रत्यय हा लेखसंग्रह वाचताना येतो.

या लेखांची साधारणपणे दोन भागात विभागणी होते. त्यापैकी एक आहे साहित्यिक विश्व. लेखक, त्याचे साहित्य, साहित्यातील दर्जेदारपणा व निरसपणा वाचक, साहित्यविषयक घडामोडी, मान्यवर साहित्यिकांनी व्यक्त केलेली मते, वेगळ्या धाटणीचे व वेगळ्या विषयांवरील लेखन, टीव्हीवरील मालिकांचे लेखन, नाटक अशा विविध विषयांवरील लेखांचा यात समावेश आहे. लेखांचे स्वरुप हे साधारणपणे तात्कालिक स्वरुपाचे सममजले जाते, विशेषतः वृत्तपत्रीय लेखांचे. परंतु या संग्रहातील लेख हे जरी वृत्तपत्रातून प्रकाशित झालेले आहेत, तरी त्यांचे स्वरूप वरवरचे वा तात्कालिक जाणवत नाहीत, याची प्रचिती वाचल्यानंतर येते. अगदीच उदाहरण घ्यायचे झाले तर लेखकाला लेखक करणाऱ्या मार्गदर्शनाचा विषय घेता येईल. अशा मागदर्शनाची निकड आहे की नाही, हा ज्याच्या त्याच्या वकुबावर अवलंबून असलेला प्रश्न असू शकतो. परंतु निकड नाही, असे कुणीही ठामपणे म्हणू शकणार नाही. अडचण आहे ती मार्गदर्शन मागायचे ते कुणाकडे? आणि मिळेल ते समाधान देणारे असेल का? परंतु ती अडचण लेखिकेने सहजपणे आणि तितकीच सोप्या पद्धतीने दूर केली आहे. सर्जनशील लेखकाने सर्जनाच्या साऱ्या शक्यता पडताळून पाहताना केवळ स्वमग्न आणि आपल्याच जगण्याच्या अनुभवाशी केंद्रित न राहता, केवळ एकाच भूमिकेच्या परिघात न राहता आत्मनिष्ठतेकडून भवतालाकडे आणि स्वअनुभवविश्वातून सार्वत्रिकतेकडे विस्तारले पाहिजे, याची जाणीव 'लेखकाचा भवताल' या लेखात करून दिलेली आहे. लेखकाने आजूबाजूच्या घडामोडींवर लक्ष ठेवून, त्यांचा अन्वयार्थ लावून, त्याच्या चांगल्यावाईट बाजू लोकांसमोर आणल्या तर ती त्याची महत्त्वाची कृती ठरेल, असा विश्वास 'लेखकानं जागल्या असावं' या लेखात व्यक्त केला आहे. साहित्यकृती केवळ आपल्या मनाप्रमाणे लिहून चालत नाही, ती महत्त्वाची ठरली पाहिजे, वाचकाला आपले प्रतिबिंब तिच्यात सापडले पाहिजे, वाचनाचे समाधान त्याला लाभले पाहिजे, हे सारे लेखकाकडून अपेक्षित असते. ती अपेक्षा पूर्ण करायची तर, लेखकाने किमान कोणते भान जपले पाहिजे याची ओळख हे लेख करून देतात. वाचक हा सुद्धा एक महत्त्वाचा घटक आहे. आजच्या गुंतागुंतीच्या काळात तो काय वाचतो, त्याला काय आवडतं, कोणते लेखक त्याला आवडतात, की वाचण्याची त्याची सवयच तुटली आहे? की वाचकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात लेखक कमी पडत आहे? शोध घेतला पाहिजे असे प्रश्न त्यांनी 'सर्जनशील साहित्याचा वाचक कमी झाला आहे का?' व 'काय अन् कुठं चुकतंय?' या लेखांमधून आपल्या समोर ठेवलेले आहेत. जी.ए. कुलकर्णी हे नाव ओलांडून मराठी साहित्याच्या वाचकाला/अभ्यासकाला आणि लेखकाला पुढे पाऊल टाकता येत नाही. त्यांच्यावरील लेखाचे शीर्षकच सर्व काही सांगून जाते, 'जीए नावाचा हँगओव्हर'.

दुसरा भाग आहे, स्त्री आणि पुरुष यांचे नातेसंबंध, लिंगभेद, पुरुषी अहंपणा, त्यांचा दांभिकपणा, मानसिकता, स्त्रीदमन, संस्कार, रूढी, परंपरा विवाह यांच्या चौकटीत स्त्रीला चिणून ठोकताना स्वतःचे श्रेष्ठत्व मिरवणे, स्त्रीला शरीर आहे तसे त्याचे आवाज आहेत, भावना आणि प्रेरणाही आहेत, मन आहे याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करणे, तिला तिचे स्वातंत्र्य, मोकळेपण का असू नये? या व अशा अनेक प्रश्नांना भिडणारे लेख या संग्रहात आहेत. 'जरा मोकळेपणाने बोलू या', 'ऑनर किलिंग'सारखे इतरही अनेक उत्तम लेख यात आहेत, जे वाचकाला अंतर्मुख होऊन विचार करायला प्रवृत्त करतात. लेखांची मांडणी मुद्देसूद आणि नेमकेपणाने केलेली आहे. सतीश भावसारांची मुखपृष्ठावरील सजावट शब्दांच्या अरण्यात वाचकाला अलगद नेऊन सोडते.

**मूल्य २०० रु. ● सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

पॉप्युलरची स्थापना १९२५ रोजी झाली आणि मराठी विभाग सुरू झाला तो १९५२ साली. पुस्तक विक्री आणि इंग्रजी पुस्तकांच्या प्रकाशनाने आतंरराष्ट्रीय स्तरावर पॉप्युलरचा लौकिक पोहोचला. मराठी विभागाने मराठी साहित्य विश्वात स्वतःचे स्थान निर्माण केले, तसा दबदबाही. याची अनेक कारणे आहेत, ज्यांमुळे आजचे हे वैभव उभे आहे, आणि त्यामुळेच या संस्थेच्या अंतरंगाविषयी प्रत्येकाच्या मनात कुतूहल आहे.

प्रकाशन संस्था म्हटली की तिच्यात अनेक घटक कार्यरत असतात. पुस्तक निवडीपासून ते पुस्तक बाजारात विक्री करण्यापर्यंत या घटकांची साखळी असते. आणि त्यांना जोडणारा, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारा एक प्रमुख असतो, त्याचे नाव प्रकाशक/संपादक. पॉप्युलरपुरते बोलायचे तर तिथे एकच नाव आहे, रामदास भटकळ. त्यांनी हा मराठी विभाग सुरू केला आणि त्याचा आज वटवृक्षच उभा आहे. यामागे त्यांची साठ वर्षांची तपश्चर्या आहे. एक प्रकाशक म्हणून हा व्याप सांभाळताना किती आघाडचांवर व्यवधाने सांभाळावी लागतात, आणि त्यात कसा कस लागतो, याची माहिती या ग्रंथातून मिळते. पण त्याच वेळी आपले हे वैभव ज्या स्वत्वाच्या-तत्त्वांच्या खांबांवर उभे आहे, त्यांचे मर्मही त्यांनी उघड केले आहे. 'कोणतंही पुस्तक स्वीकारताना ते पुस्तक किवा तो लेखक हा निदान पुढील दोन पिढ्यांत टिकून राहील, त्याचं महत्त्व निव्वळ तात्कालिक राहणार नाही याची काळजी घेण्याचा प्रयत्न असतो. लेखकाशी चर्चा करताना आपण पहिले रसिक वाचक ही भूमिका कायम ठेवली. लेखकावर आपलं मत लादायचं नाही, किंबहुना त्यांचे निर्णय त्यांनीच घ्यायला हवेत. लेखकाकडून पैसे घेऊन पुस्तक प्रकाशित करायची पद्धत निषिद्ध मानली, तशी केवळ पुस्तक प्रकाशित झालं, यावरच समाधान मानायचं, हाही प्रकार निषिद्ध मानला. लेखक-प्रकाशक यांचा पुस्तकातील रस कायम राहावा यासाठी विक्रीशी संलग्न अशा मानधनाची पद्धत सुरू केली. पुस्तकावर ब्लर्ब ही पद्धत सुरू केली. पुस्तकातली कलात्मकता एका वेगळ्या माध्यमातून वाचकांपुढे साकार व्हावी आणि पुस्तक हातात घेतल्याबरोबर वाचकाची मनोवृत्ती ते वाचायला योग्य व्हावी या दृष्टीने चित्रकारांची निवड केली. आणि महत्त्वाचे म्हणजे, साहित्यप्रकाराचा स्वतंत्र विचार न करता फक्त उत्कृष्ट साहित्याचा ध्यास धरला.

पॉप्युलरची सुरुवात गाडगीळ, गोखले यांच्या कथासंग्रहांनी झाली. पुढे साहित्याचे सर्व प्रकार पॉप्युलरने प्रकाशित केले. उत्तम साहित्याचा मागोवा घेतला. प्रसिद्ध लेखकाचा एक साहित्यप्रकार आवडला, तो प्रसिद्ध केला, दुसरा साहित्य प्रकार नापसंत वाटला, त्याला दूर ठेवण्याचे धाडस दाखविले. यासाठी वसंत कानेटकरांचे उदाहरण आहे. उलट लेखक नवोदित असूनही त्यांच्यांतल्या प्रतिभेला आवर्जून साद घातली. आजच्या आघाडीच्या कृष्णात खोतसारख्या कादंबरीकाराचे उदाहरण आहेच. परंतु नवे कवी, नवी कविता यातून कितीतरी कवींच्या कवितांचे संग्रह प्रकाशित केले आहेत. त्यामुळे या ग्रंथात अनेक मान्यवर साहित्यिकांची यादी ही पॉप्युलरचे साहित्यिक म्हणून आपणास पाहावयास मिळते. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, वसंत कानेटकर, ना. धों. महानोर, ग्रेस, प्रकाश होळकर, वा.ल. कुलकर्णी, भालचंद्र नेमाडे, कमल देसाई, जी.ए. कुलकर्णी अशी कितीतरी मोठी ही यादी आहे. आणि नुसतीच यादी नाही, तर त्यांचे फोटोही सोबत दिलेले आहेत. हे फोटो केवळ ग्रंथाची शोभा वाढवतात असे नाही, तर त्या काळाचे संदर्भ जागे करतात.

**पॉप्युलरचं अंतरंग**

संकलक : किशोर आरस




रामदास भटकळ आणि पॉप्युलर अशी दोन नावे दिसत असली तरी ती व्यावहारिक पातळीवरील आहेत. प्रत्यक्ष नाणे एकच आहे. रामदास यांनी त्यांचे काही अनुभव जिगसॉ, जिव्हाळामधून वाचकांच्या समोर मांडलेले आहेत. परंतु 'पॉप्युलरचं अंतरंग' वाचकांच्या हाती देताना विशिष्ट हेतू ठेवला आहे. ते आत्मनिवेदन होऊ नये, तर संपादकीय धोरण, त्यासाठी करावं लागलेलं पथ्यपाणी आणि त्या निमित्ताने आलेले अनुभव, अशी मर्यादा इथे घातली आहे. परंतु हा ग्रंथ वाचत असताना असे लक्षात येते, त्यांनी अंतरंगच मोकळे केले, स्वतःचे आणि संस्थेचे सुद्धा. तेही अगदी मोकळेपणाने, कुठलाही आडपडदा न ठेवता. बॉम्बे बुक डेपोचे कुमठा यांच्या चरित्राने पॉप्युलर आणि भटकळ यांच्याविषयी बराच तपशील दिलेला आहे. परंतु खरे समाधान पावले ते 'पॉप्युलरचं अंतरंग'ने.

या ग्रंथाची तीन भागात विभागणी केलेली आहे. 'चिरंतनाच्या मागावर'मध्ये रामदास स्वतः पॉप्युलर विषयी सांगतात. 'मार्गक्रमण' या दुसऱ्या भागात पॉप्युलर - रामदाससोबत ज्यांनी सहकारी म्हणून, रामदासइतकेच पॉप्युलर आपलं आहे, या निष्ठेने आणि विश्वासाने काम केले, त्या रघुनाथ गोकर्ण, मृदुला जोशी, अंजली कीर्तने, शुभांगी पांगे आणि अस्मिता मोहिते यांचे पॉप्युलर आणि रामदास यांच्याविषयीची मते आणि अनुभव आहेत. तर 'उत्तरपक्ष' या भागात रंगनाथ पठारे, अरुणा दुभाषी, सुधा जोशी, रत्नाकर मतकरी, वसंत पाटणकर, अरुण टिकेकर, वसंत सरवटे यांच्यासारख्या नामवंतांनी मुलाखतींद्वारे रामदास यांच्या अनुभवांना अक्षरबद्ध केले आहे.

एका साक्षेपी ग्रंथाचे संकलन करणे तसे अवघड काम, परंतु किशोर आरस यांनी ते उत्तमपणे पेलले आहे. सतीश भावसारांची मांडणी आणि राजू देशपांडे/शेखर गोडबोले यांचे मुखपृष्ठ पॉप्युलरच्या अंतरंगावर उत्तम साज चढवते.

**मूल्य ४०० रु. ● सवलतीत २४० रु.**

ग्रंथाली

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**‘अ**मेरिकेतील एक कोटी वीस लाख निग्रोंनो, स्वतःची लाज वाटू देऊ नका. तुम्ही एकेकाळच्या गुलामांची लेकरे आहात याबद्दल खंत करू नका. लाज तर वाटताच कामा नये. लाज जर कोणाला वाटायची असेल तर ती त्या काळच्या गुलामांच्या गोऱ्या मालकांच्या आजच्या पिढीतील लोकांना, ज्यांच्या पूर्वजांनी गुलाम विकत घेतले होते, ज्यांनी त्यांना अमानुष रीतीने वागवले. लाज तुम्हाला नाही, त्यांना वाटायला हवी आहे. भूतकाळ विसरा. सत्य हे नेहमी पवित्र असते.’

समान नागरी हक्काच्या चळवळीच्या काळात अमेरिकेतील निग्रोंना , काळ्या लोकांना हा संदेश पाठविला होता म. गांधींनी, १९२९ साली. आणि ज्याने पुढे ही नागरी समान हक्काची चळवळ समर्थपणे पुढे नेली, त्या मार्टिन ल्युथर किंगचा जन्म आहे १९२९ सालचा. या किंगने या समान नागरी हक्कासाठी जो अभूतपूर्व लढा दिला आणि आपल्या ध्येयाच्या समीप चळवळीला आणून उभे केले, त्यापाठी जी शिकवण आचरणात आणली, ती म.गांधींच्या प्रेरणेतून मिळालेली होती, तिचे नाव आहे, अंहिसा. किंग स्वतः नमूद करतात, ‘जिझसने प्रेरणा दिली आणि गांधींनी मार्ग दाखविला.’

**माझे स्वप्न**

डॉ. मार्टिन ल्युथर किंग, ज्युनियर

प्रभाकर जोशी




मार्टिन ल्युथर किंगचा जन्म १९२९चा आणि मृत्यु १९६८चा. उणेपुरे मिळालेले आयुष्य ३९ वर्षांचे. त्यांच्या वाट्याला आलेल्या अवघ्या ३९ वर्षांच्या आयुष्यात त्याने उभी केलेली चळवळ ही समान नागरी हक्काच्या इतिहासात कायमची नोंद कोरून गेली आहे. अमेरिकेच्या दक्षिण भागातील निग्रोंची अवस्था बिकट आणि दयनीय या शब्दांना लाज वाटावी इतक्या हीन पातळीची होती. गुलाम म्हणून जगणे म्हणजे विकत घेतलेल्या पशूंपेक्षा वरच्या पातळीवरचे कधीच नव्हते. बसमध्ये शेवटच्या रांगेत बसायचे. गोरा प्रवासी आला आणि त्याला बसायला जागा नसेल तर काळ्यांनी उठून त्याला जागा द्यायची. स्वतः उभ्याने प्रवास करायचा. शाळा, कॉलेज, ग्रंथालय, हॉटेल, रेल्वे-बस स्थानके, रेल्वे डबे, स्वच्छतागृहे येथे समान वागणूक नाही. काळे-गोरे अशी वेगवेगळी व्यवस्था. शिवाय अपमानाची वागणूक.

वास्तविक अब्राहम लिंकन यांनी अमेरिकेचे प्रेसिडेंट झाल्यानंतर १८६३ मध्ये अध्यादेश जारी केला होता की, १८६३च्या जानेवारीपासून अमेरिकेतील सर्व राज्यांतील गुलाम स्वतंत्र झाले आहेत. आज १ जानेवारी १८६३ पासून गुलाम पद्धत कायद्याने बंद केलेली आहे. परंतु त्यानंतर एकाच आठवड्यात त्यांची गोळ्या घालून हत्या झाली. त्यातून एक झाले, स्वातंत्र्य मिळाले, गुलामगिरी नष्ट झाली, परंतु समान नागरी हक्कापासून निग्रो कायमचे वंचित राहिले. ते मिळवियासाठी किंगने पहिला अहिसेंचा मार्ग हाताळला, बस वाहतुकीवर बहिष्कार घालण्याचा. असा बहिष्कार सगळ्यांसाठी नवीन होता. त्याविरोधात जुलूम सहन करावा लागला. परंतु शेवटी त्यात यश मिळाले. पुढचा लढा होता, मतदार नोंदणी आणि मतदानाचा हक्क. जो हक्क घटनेने दिलेला आहे परंतु त्याची अंमलबजावणी कधी झाली नव्हती. त्यानंतरचा लढा होता, सर्व ठिकाणी वर्णभेद बंद झाला पाहिजे. नोकरीत स्थान मिळाले पाहिजे. व्यवस्थापनात सहभाग असला पाहिजे. लढा देण्यासाठी किंगने अथक प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नामुळे सगळे कृष्णवर्णीय स्वातंत्र्याच्या सावलीत आले. परंतु त्यासाठी किंगना अनेक संकटांशी झुंज द्यावी लागली. अनेकदा तुरुंगवास सहन करावा लागला. घरावर बॉम्बफेक झाली. पोटात सुरा भोसकून हत्या करण्याच्या प्रसंगाला सामोरे जावे लागले आणि शेवटी बंदुकीच्या गोळीला शरण जावे लागले. गांधीजींच्या शिकवणुकीप्रमाणे अहिंसेच्या मार्गाने लढाई देणारे शेवटी गांधीजींच्या प्रमाणेच बंदुकीच्या गोळीचे शिकार झाले. त्यांच्या या कार्याची नोंद नोबेलने घेतली, तीही वयाच्या पस्तीशीत. इतक्या कमी वयात हे पारितोषिक प्राप्त करणारे किंग हे पहिलेच. त्यांनी याच काळात तीन पुस्तके लिहिली, ‘व्हाय वुई कान्ट वेट’, ‘ स्ट्राईक टुवर्डस् फ्रिडम’, आणि ‘स्ट्रेन्थ टू लव’.

मार्टिन ल्युथर किंग, ज्युनिअर यांचे चरित्र सादर करताना लेखक म्हणून प्रभाकर जोशी यांना बरेच कष्ट घ्यावे लागलेले आहेत. त्याविषयी त्यांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत नमूद केले आहे. जगप्रसिद्ध व्यक्तीचे व्यक्तिचित्रण करणे हे लेखकासाठी आव्हान असते. परंतु ते जोशी यांनी समर्थपणे पेलले आहे. यातली अमेरिकन ग्रंथालयाची जमेची बाब नमूद करण्यासारखी म्हणजे, विशिष्ट पुस्तक हवे असेल व ते त्या ग्रंथालयात नसेल, तर तेथील ग्रंथपाल ते पुस्तक दुसरीकडून मागवून देत. दुसरी बाब म्हणजे, लेखनाचे सादरीकरण, ज्याला आपण फॉर्म म्हणतो. साधारणपणे चरित्र म्हटले की ते प्रथमपुरुषी संवादात्मक अथवा तृतीयपुरुषी निवेदनात्मक असू शकते. परंतु इथे लेखकाने संवादात्मक पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. मार्टिन ल्युथर किंग यांचे कुटुंबीय, आप्त, मित्र, सहकारी, ज्यांचा जवळचा संबध आहे, त्या प्रत्येकाने स्वतंत्रपणे हे कथानक स्वतःच्या संवादातून पुढे नेलेले आहे. त्यामुळे कथानकाचा ओघ प्रवाही राहण्यास मदत झाली आहे. केवळ हे किंग यांचे चरित्र न राहता ही एक निग्रो-काळ्या व गोऱ्या लोकांच्या संघर्षाची कहाणी आहे, हेही समग्रपणे वाचकांसमोर यावे, याची लेखकाने प्रयत्नपूर्वक योजना केलेली आहे. किंग सभेपुढे भाषण करताना आणि त्यासाठी जमलेला हजारोंचा लढाऊ समुदाय यांचा फोटो देऊन मुखपृष्ठ सजवलेले आहे. ही सतीश भावसारांची सजावट स्वप्नाला आकार देणारी म्हणावी लागेल.

**मूल्य २०० रु. ● सवलतीत १२० रु.**

ग्रंथाली

# ग्रंथपान

**'जि**हाद' हा शब्द अलीकडे अंगावर येणारा शब्द ठरला आहे. या शब्दाचीही एक दहशत निर्माण झाली आहे. केलेल्या कुठल्याही विध्वंसक कृत्याला हे गोंडस लेबल लावले की त्याच्या पाठीमागे असणाऱ्या शक्तीचे उदात्तीकरण सुरू होते. आणि त्यातही अहमहमिका लागलेली. त्यामुळे आता केवळ एक देश किंवा राष्ट्र इतकीच या शब्दाची व्याप्ती राहिलेली नाही. संपूर्ण जग त्याच्या पंज्यात सापडले आहे, आणि त्याचे पुरावे दररोज प्रसिद्धीमाध्यमांच्या द्वारे आपल्या द्वारांवर धडका देत आहेत. एक वेगळे मळभ जग अनुभवते आहे. आणि तोच विषय घेऊन उमेश कदम यांनी एक कादंबरी वाचकांच्या हाती सोपविली आहे, त्याच नावाने.




'जिहाद' ही हॉलंडमधील एका तरुणाची कहाणी आहे, रेमंड नावाच्या. अल्पशिक्षित आणि घरची परिस्थिती म्हणून तो लहानमोठी कामे करू लागतो. त्यातला एक असतो कुरियरचा. त्यात अंमली पदार्थांची ने आण करण्याच्या नावाखाली त्याला तुरुंगाची हवा खावी लागते. त्यानंतर हाणामारीच्या कारणास्तव पुन्हा तुरुंगात जावे लागते. तुरुंगात सिराज नावाच्या मुस्लिम तरुणाशी त्याचा परिचय होतो, त्याच्याकडून इस्लामविषयीच्या माहिती व पुस्तकांनी तो प्रभावित होतो, आणि त्यातून त्या धर्माचा स्वीकार करतो, रेहमान या नावाने. मदरशाची तत्त्वप्रणाली तिथे जाऊन त्याने शिकून घेतली. एका 'हथीत' मध्ये असेही म्हटले आहे की, आपल्या धर्मावर कुणी आक्रमण करण्याचा प्रयत्न केला तर तो थोपवून ठेवण्याची क्षमता आपल्यात असावी. याचा अर्थ असा, आपल्या धर्मावरील आक्रमण थोपविण्यासाठी जे जे करायला हवे ते ते आपण करणे आवश्यक आहे. मग त्यासाठी शत्रूविरोधी शस्त्र उगारायची वेळ आली तर त्यात वावगे काही नाही, असे इस्लाम म्हणतो, या तत्त्वाला अनुसरून शस्त्रास्त्राचे शिक्षणही तो आत्मसात करतो. धर्मासाठी वाटेल तो त्याग करायला राजी होतो. आणि ती संधी त्याच्यासमोर उभी राहिली. ७ ऑक्टोबर २००१ रोजी अमेरिकेने अफगाणिस्तानमधील तालिबान सरकारला सत्तेवरून हटविण्यासाठी त्या देशावर बॉम्बहल्ले सुरू केले. त्यात अमेरिकेचे मित्रराष्ट्रही सहभागी झाले. परिणामी मुस्लीम जगतातील धर्मगुरू आणि नेते खवळून उठले. त्यांनी फर्मान जारी केले, 'अमेरिकेच्या मुस्लीम जगताविरोधी पुकारलेल्या लढ्याला प्रत्युत्यर द्यायला पाहिजे. त्याशिवाय अमेरिकेची धिटाई काबूत येणार नाही. आपला धर्म धोक्यात आला आहे, त्याला वाचविण्यासाठी एकच पर्याय, धर्मयुद्ध–जिहाद!'

अमेरिकेने २०मार्च २००३ या दिवशी इराकवर हल्ला केला. रेमंड उर्फ रेहमान हिरीरीने या जिहादमध्ये सहभागी झाला. दोन्ही नावांनी तो जगतात वावरला. बॉम्बस्फोटासारख्या कारवायांत सहभागी झाला. अमेरिकन सरकारच्या गुप्त हालचालींची माहिती काढून अल् कायदा सारख्या संघटनांच्या हस्तकांना पुरविल्या. परिणामी अमेरिकन आणि मित्र राष्ट्रांच्या फौजांना जेरीस आणले. त्याचे चातुर्य आणि क्षमता पाहून अनेक मोठमोठ्या जबाबदाऱ्या त्याच्यावर सोपविण्यात आल्या. आणि त्या विश्वासाला तो खरा उतरला देखील. परंतु अमेरिकन दूतावासातील प्रतिनिधी मि. फ्लोरेन्स्टाईन यांचे अपहरण आणि त्याचा शिरच्छेद, बॉम्बस्फोटामुळे अनेक मृत्यु आणि जखमांनी विव्हळणारे लोक त्याने पाहिले, आणि त्यालाच पश्चाताप होऊ लागला, निरपराध लोकांना मारण्यात कुठला आला आहे जिहाद? शेवटी तो या मार्गावरून माघार घेतो आणि मि. मिल्टनबर्ग या गुप्तहेर संस्थेच्या प्रमुखाला सांगतो, 'गेल्या काही वर्षात मी काही जिहादी कारवायांमध्ये भाग घेतला आहे. पण आता माझे डोळे उघडले असून इस्लामच्या नावाखाली निरपराध लोकांची हत्या थोपविण्यासाठी पाश्चात्य देशांनी जी आघाडी उघडली आहे, तिला मदत करू इच्छितो.'

जिहादी संघटनेचा सर्वोच्च शेख – अन्वर अल् अवलाकी याच्याशी जुळलेले उत्तम संबंध कायम ठेवून 'जिस' ही गुप्तहेर संघटना आणि तिचे पदाधिकारी यांच्याशी सहकार्य करायचे, अशी दुहेरी कसरत रेमंड उर्फ रेहमान करीत राहतो. त्यात अनेकदा दोन्ही बाजूंनी संशयाचे वारे वाहते, अनेक कारवाया करताना ठरलेले बेत उधळले जातात. तणावाचे वातावरण निर्माण होते. परंतु शेवटी 'जिस' संघटनेला अपेक्षित यश मिळत जाते. त्यात रेमंडचा वाटा मोलाचा असतो. परंतु अशा व्यक्ती या दोन्ही संघटनांपासून फारकत घेऊन निवांत जीवन जगण्याची इच्छा व्यक्त करतात, तेव्हा ती सफल होणे सोपे नसते हेही रेमंडच्या लक्षात येते. आपल्यात कुणी भेदी जिवंत असणे किती धोकेदायक आणि निंदनीय असते, याचाही अनुभव समोर येतो.

कुठल्याही रहस्यमय व गुन्हेगारी जगताशी साम्य सांगणारी ही कादंबरी. इथे ती अमेरिका आणि इस्लाम अशा दोन किनाऱ्यांच्या मध्ये प्रवाहित आहे. यात रेमंडची आई, मैत्रीण, पत्नी, मुले, इस्लामच्या मार्गावर आणून उभा करण्यास मदत करणारे तुरुंगातील सहकारी, जो अमेरिकेच्या २६/११ च्या हल्ल्यात संशयित समजला जात होता तो अवलाकी, जी अवलाकीशी शादी करू इच्छिते ती जोहरा, 'जिस'चे अधिकारी, अशा अनेक व्यक्तिरेखा या कादंबरीत आलेल्या आहेत, ज्यांची ठळकपणे नोंद लेखकाने घेतलेली आहे. तसेच या कादंबरीचा प्रवास अनेक देशांतून होतो, तिथली भौगोलिक आणि स्थळांची वर्णने तपशिलाने दिलेली आहेत. अशा कादंबऱ्यांमध्ये एक गती राखावी लागते, ती इथे कायम राखलेली आहे. 'जिहाद' नावाचा बुरखा घालून जी कृत्ये घडविली जातात, त्या कृत्यांचा म्होरक्या मुखपृष्ठावर दाखवताना त्याचे रोखलेले डोळे आपलाच वेध घेत आहेत, असा भास होतो. सतीश खानविलकर यांचे हे मुखपृष्ठ नजरेसमोर कायम राहते.

**मूल्य २०० रु. • सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

**‘आ**फ्रिकी आतषबाजी’ हा उमेश कदम यांचा नवीन कथासंग्रह. आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस मध्ये वरिष्ठ पदावर कार्यरत असल्याने अनेक देशांमध्ये त्यांचं वास्तव्य झालेले आहे. त्यामुळे त्यांच्या पुस्तकांचे विषय हे नेहमीच इतरांहून वेगळे राहिलेले आहेत. या कथा त्याला अपवाद नाहीत.

तुरुंगाच्या ताब्यात असलेल्या जागेचा उपयोग फळझाडे व बागांसाठी केला तर तुरुंगातील कैद्यांना कामही मिळेल आणि त्यांच्यासाठी या बागांचा उपयोग होऊ शकेल, ही कथेची मध्यवर्ती कल्पना. परंतु प्रत्यक्षात ती योजना चांगली फलद्रूप झाली तेव्हा नवीन समस्या निर्माण झाली. कैद्यांच्या आहारात फळांचा वापर वाढल्याने त्यांच्या आरोग्यातच फरक पडला असे नाही, तर तुरुंगातील कैदी शिक्षा संपल्यानंतर तुरुंगाबाहेर जाण्याच्या कल्पनेने उदास होऊ लागले, तर काही तुरुंगात जाण्यासाठी वेगळीच शक्कल लढवू लागले. याचे वर्णन म्हणजे ‘माझे इथिओपियन तुरुंगातील दिवस. कोणत्याही नवख्या व्यक्तीशी परिचय दिल्यानंतर तो स्वतः, त्याचे कुटुंब, मुलं-बाळं, घरातील वडीलधारी मंडळी कशी आहे, याची परस्परांनी आस्थेवाईकपणे चौकशी करणे हा तिकडच्या संस्कृतीचा भाग आहे. त्याप्रमाणे वागण्याचा सल्ला मिळाला. तशी चौकशी केल्यानंतर कळले, बहुतेकांची मुले पॅरिस, लंडन, शिकागो, कोपनहेगन, जिनिव्हा, फ्रँकफुट येथे शिकायला आहेत. वास्तविक ही मुले पालकांनी रितसर तिकडच्या शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळवून पाठविलेली नसतात. तर तिकडच्या विमानतळावर निराधार सोडून हे परत येतात. मग तिथले सरकार निराधार मुले म्हणून यांचा सांभाळ करते आणि शिक्षणही देते. ही युक्तिबाज गंमत आहे ‘हिरुत हिथ्रोवर हरवली’ या कथेत. आणि ही युक्ती कशासाठी, असा प्रश्न विचारला, तर त्याचे उत्तर भलतेच भन्नाटः ‘पाश्चात्यांनी शेकडो वर्षे आफ्रिकेत वसाहती करून सारे लुटले, आम्हाला गुलाम म्हणून वागवले. आता त्यांनी आमच्या मुलांवर थोडाफार पैसा खर्च केला तर त्यात अनैतिकता कसली आलीय?’




आपल्याकडे कांद्याची टंचाई आणि महागाई काही नवीन नाही. तिच्यावर मात करण्यासाठी इथिओपियाहून पुण्याला येताना लेखक सोबत कांदे विकत घेऊन येतात. विमानतळावर उतरल्यानंतर कस्टमवाले लक्षात आणून देतात, ‘भारतात परदेशातून कोणतीही वनस्पती, रोप, फळं, भाज्या किंवा बियाणं आणण्यावर निर्बंध आहेत. अशा गोष्टींसोबत विषारी जीवाणू भारतात येऊन त्यांचा फैलाव होऊ शकतो. त्यामुळे अशा वस्तू आणणे बेकायदा आहे. याला प्लांट क्वारंटाईन कायदा म्हणतात.’ कस्टमवाले हे कांदे सीलबंद पाकिटात जमा करून तपासणीसाठी पाठविण्याकरिता ठेवून घेतात. आणि सायंकाळी या कस्टमवाल्यांच्या वस्तीत कांद्यांच्या पदार्थांचा खमंग वास दरवळत राहतो. ही गंमत ‘इथिओपियन कांद्यांची गोष्ट’ या कथेत वाचायला मिळते.

आफ्रिकी पंचवीस राष्ट्रप्रमुख शिखर परिषदेच्या निमित्ताने आदिस अबाबा येथे एकत्र येतात. ‘आफ्रिकी एकता मंडळ’ची स्थापना होऊन त्याचे विभागीय संघटनेचे कार्यालय, आदिस अबाबा वा नैरोबी येथे असावे यावर मतदान घेण्यात येते. वास्तविक, नैरोबीत सर्व सुविधा उपलब्ध आहेत. तर आदिस अबाबा अतिशय गैरसोयीचे. सगळ्यांच्या चर्चेत विरोधही असतो. परंतु आदिस अबाबालाच बहुमत मिळते, ते गुप्त मतदानातून. हे आश्चर्य कसे? या साठी ‘आफ्रिकी युती (की युक्ती?)’ ही कथाच वाचायला हवी. तीच गंमत ‘तुम्ही खूप भयानक आहात!’ ‘अपहरण (होऊ घातलेल्या) बायकोचे!’ ‘थोकोलेशे, इम्पुंदुलू आणि मोम्लाम्बो’ आणि ‘कथा (आणि व्यथा) आफ्रिकी मैत्रिणीची!’ या कथांमध्ये वाचायला मिळते.

‘आफ्रिकी आतषबाजी’मधील कथा हलक्या-फुलक्या आणि गमतीशीर आहेत. मात्र त्या विनोदी या सदरात मोडणाऱ्या नाहीत. परदेशात वास्तव्य आणि प्रवासादरम्यान तिथले राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन जवळून पाहण्याचा योग लेखकाला लाभला. राहणीमान, समस्या, आशा-आकांक्षा याबद्दलची माहिती मिळाली. त्याविषयी अधिक चौकसपणा दाखविला. त्यातून जी कथाबिजे मिळाली, त्यांच्या या कथा आहेत. नैरोबी, इथिओपिया, आदिस अबाबा सारखी अनेक नावे या कथांमध्ये आलेली आहेत. तशीच जोमो केन्याटा, रॉबर्ट मुईगाई, थोकोलेशे, इम्पुदुलू, बिर्हानू, एम्बाया, इरुंगा अशी कितीतरी नावे यात आलेली आहेत, ज्यांचा उच्चार करणेही आपल्यासाठी अवघड व्हावे. तशीच तिकडची भौगोलिक वर्णने, आणि राजकीय माहिती कथानकाच्या ओघाने आलेली आहे. त्यांची वेषभूषा, चालीरीती, आहार यांचा वाचकांना जवळून परिचय होतो. या कथांची मांडणी देखील काहीशी वेगळी म्हणता येईल अशी आहे. त्या एक होता राजा आणि एक होती राणी... अशा नेहमीच्या पठडीतल्या नाहीत. त्या वाचत असताना आपण एखादे प्रवास वर्णन वाचत आहोत अशा थाटाच्या भासतात. असे असले तरी वाचत असलेली कथा संपेपर्यंत तिच्यातले कुतूहल कायम ठेवण्यात लेखकाचे यश सामावलेले आहे.

आफ्रिकी देशातली यादवी हा विषय कायमचाच असल्याने तिथे असणारे शस्त्रांचे आवाज, हे दिवाळीच्या फटाक्यांसारखे भासतात. त्या आतषबाजीची कथा या संग्रहात आहे, तिचेच नाव संग्रहाला दिलेले आहे. आणि सतीश खानविलकर यांनी मुखपृष्ठावर बंदुकांचा तोच धागा छानपणे कायम ठेवलेला आहे.

**मूल्य २५० रु. ● सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

कुठलेही कार्य तडीस न्यायचे असेल तर त्यात अनेकांचा हातभार असावा लागतो. अनेकांनी मनापासून त्यात सहभागी व्हावे लागते. आणि अशी अनेक हातांची मोट बांधली गेली तर त्यातून साध्य असलेले पाणी वर आल्याशिवाय राहात नाही. तीच गोष्ट परंपरा, चालीरीति आणि संस्कृतीची. तीचे संगोपन करायचे तर ही एकमेकाच्या हातांची गुंफलेली गोफण कधी सैल होता कामा नये. हे सांगायचे कारण म्हणजे विश्वासाने एकमेकांच्या हातांवर हात रचलेल्या उतरंडीचे चित्र. जे चित्रकार पुडलिक वझे यांच्या कल्पनेतून साकारले आहे. या चित्राने आपले स्थान शोधलेले आहे ते ‘सोल्जर इन मी ’ या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर. यातला सोल्जर हा शब्द पाहिला, आणि त्यांच्या निष्ठा, वृत्ती आणि भक्ती यांची असीम गुंफण पाहिली, तर आपसातले नाते किती जवळचे आहे , याची कल्पना यावी.




शिल्पा खेर यांचे हे पुस्तक म्हणजे त्यांच्या याच नावाने ग्रंथालीने प्रकाशित केलेल्या कादंबरीचा दुसरा खंड आहे. कादंबरीचा आवाका म्हणून, आणि वाचकांची सोय गृहित धरून म्हणा, अशा द्विखंडात्मक कादंबऱ्या अनेक आहेत. अगदी अलीकडचे उदाहरण द्यायचे तर, श्री.ना. पेंडसे यांच्या ‘तुबांडचे खोत’, चे देता येईल. शिल्पा खेर यांनी मात्र दुसरा खंड का, याचा खुलासा त्यांच्या मनोगतात केला आहे. पहिल्या खंडात कॅ. भास्करने सुरू केलेल्या ‘जिद्द ’या संस्थेचे कार्य त्याच्या मृत्युमुळे थांबले होते. इतर सहकाऱ्यांना ते कार्य पुढे न्याचे आहे, परंतु कॅ. भास्करकडे असलेली क्षमता त्यांच्यात नाही. परंतु एका व्यक्तीच्या जाण्याने संस्थात्मक कार्य खुंटून राहावे हे योग्य नाही. ते पुढे चालू राहिले पाहिजे. तसेच त्या खंडात असलेल्या व्यक्तीरेखा, रूपा, अदिती आणि अद्वैत यांच्या मनात जिद्द या संस्थेचे कार्य पुढे नेण्याची बिजे रूजलेली आहेत. त्यांच्या विचारानुसार हे कार्य पूर्णत्वाकडे नेता येईल, असे वाटत होते. त्यातून हा दुसरा खंड आकाराला आला आहे.

पहिल्या खंडात असलेल्या व्यक्तिरेखा तशाच ठेवून ही कादंबरी पुढे सुरू होते. त्यात एका महत्त्वाच्या व्यक्तिरेखेची योजना लेखिकेने केली आहे, ती म्हणजे ॲना. एक पत्रकार, लेखिका आणि अभ्यास, अशी विदुषी. जी भारताची संस्कृती, निसर्ग, परंपरा, चालीरीति यांच्याविषयीच्या वाचनातून भारताकडे आकर्षित होते. तिच्या मनात ही बिजे रूजविण्याचे श्रेय अद्वैतचे. दोघेही एकमेकांच्या अंतरिक जिव्हाळ्याने एकत्र येतात ती त्यांच्या लेखनामुळे. सगळे आयुष्य पचवलेली प्रौढा, ॲना मायदेशाची ओढ असलेल्या तरुण अद्वैत सोबत भारतात येते. तिला संपूर्ण भारत दर्शन करण्याची, तिची ओढ ज्यात आहे, त्याचे दर्शन घडवण्याची जबाबदारी अर्थातच अद्वैत, अदिती, रूपा यांच्याकडे येते. त्यातून संपूर्ण भारत, भारतीयत्व, निसर्ग, किल्ले, आदिवासी भाग, शिक्षण, थोर व्यक्ती यांचे दर्शन तर होतेच. शिवाय जिद्द या संस्थेच्या कार्यालाही आकार येताना दिसतो.

कादंबरीमध्ये किंवा कुठल्याही साहित्यकृतीत लेखकाचा एक दृष्टिकोन असतो. त्याला अनुसरून लेखनाची योजना केली जाते. त्यातून सामाजिक कार्याला समोर ठेवून लेखन होते, तेव्हा त्यात उन्नयन आणि उदात्तीकरण यांच्या मोहाचे जाळे लेखकाला आपल्यात कवेत घेण्याची शक्यता अधिक असते. परंतु शिल्पा खेर यांची नजर आपल्या लक्ष्याकडे असल्याने हे मोहाचे जाळे त्यांनी यशस्वीपणे तोडून लक्ष्य गाठले आहे. त्यांची लेखनाची शैलीही वास्तवाला घट्ट कवेत घेतलेली दिसते. ‘ बी कॉनफिडण्ट! जसं आयुष्य समोर येईल तसं ते सवीकारत जा. कुठल्या परिस्थितीला, व्यक्तीला,घटनेला स्वतःपेक्षा जास्त महत्त्व देऊ नकोस.’ ‘ खरं सौंदर्य कशात आहे, माहीत आहे? ते आहे परमेश्वरावर किंवा त्या अनामिक शक्तीवर पूर्ण विश्वास ठेवून जगण्यात. जो असं विश्वास ठेवून जगतो, त्याला सगळं जग सुंदरच दिसतं.’ अशी वाक्ये त्या सहजपणे लिहून जातात. तीच बाब निसर्ग सौंदर्य आणि प्रसगांच्या वर्णनाची. त्यामुळे लेखनाचा प्रवाह वाचकाला आपल्यासोबत घेऊन चालत राहतो.

या पुस्तकाचे भाग्य असे की त्याला दोन मान्यवरांच्या प्रस्तावना लाभलेल्या आहेत. ‘सामाजिक भान आणि कार्याचा वारसा नव्या पिढीकडे जाताना दिसतो. मुख्य म्हणजे प्रगल्भ जाणिवा जागवत ही कादंबरी स्वतःचं कर्तव्य करणं, यातच आयुष्याची सार्थकता आहे याचं भान व्यक्त करते, तीही प्रचारकी व्याख्यानबाजी न करता ’, अशी प्रशंसा अविनाश धर्माधिकारी व्यक्त करतात. तर कॅ. सुरेश वंजारी लिहितात, ‘एखाद्या कुशल विणकराने वेगवेगळ्या रंगाच्या सुतांचे विणकाम करून एक अप्रतिम रंग संगतीचं वस्त्र समोर ठेवावं, इतक्या नजाकतीने शिल्पा खेर यांनी अनेक व्यक्तिरेखा या कादंबरीत साकारल्या आहेत.’

**मूल्य २५० रु. ● सवलतीत १५० रु.**

## ग्रंथपान

चांगदेव काळे

संपर्क : ९८६९२०७४०३

‘ऐ मेरे वतन के लोगों, जरा आँखमें भरलो पानी’ हे गाणं कुठेही ऐकू यायला लागले की ऐकणारा हळवा होतो, भावुक होऊन स्तब्ध उभा राहतो. त्या गाण्यातील बोल आणि लताच्या आवाजातील आर्तता आपले सारे अस्तित्वच व्यापून टाकतात. व्याकुळ मनाला गोठवून टाकणारे अंगभर शहारे आणि शहारेच फुलून येतात. यापाठी असलेला चीनशी झालेल्या युद्धाचा इतिहास नजरेसमोर उभा राहतो. त्या युद्धात शहीद झालेल्या शूरवीरांच्या बलिदानाने अंतःकरण हेलावून जाते. ही आपली प्रतिक्रिया असते एक नागरिक म्हणून. परंतु जो सैनिक आहे, त्याला काय वाटतं? डोळ्यात पाणी येणे, ही कल्पना त्याला कधीही रूचत नाही. ना हाती शस्त्र घेतलेल्या सैनिकाला, ना शहीद झालेल्या सैनिकाला. देश, देशप्रेम, शिस्त आणि कर्तव्य यासाठी काहीही करायची तयारी असलेल्या सैनिकाला आपले बलिदान म्हणजे सर्वोच्च सन्मान वाटतो. तो कडक गणवेशात असो, वा नागरी पातळीवर, त्याच्यातला सैनिक सदैव जागरूक असतो. आपले कर्तव्य हेच त्याचे सर्वस्व असते, कुठल्याही परिस्थितीत असला तरी. अशाच एका सैनिकाची ही गाथा आपल्या हाती दिली आहे, शिल्पा खेर यांनी, तिचे शीर्षक आहे, ‘ए मेरे वतन के लोगों.’




या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहे मिहीर. ज्याचे एकच ध्येय आहे, ‘एनडीए’मध्ये जॉईन होण्याचे, एक सैनिक म्हणून देशसेवा करण्याचे. ‘एनडीए’ ही ना त्याच्या प्रकृतीला झेपणारी ना त्याच्या आप्त–मित्रांच्या पसंतीची. तिथले खडतर आणि रुक्ष जीवन ही त्यापाठची कारणे. परंतु माणसाचा ध्यास ही एक गोष्ट असते, ती प्राप्त करण्यासाठी तो कुठलीही किंमत मोजण्यास तयार असतो. मिहीर ती सगळी किंमत मोजतो. अगदी आयुष्यभराची. एका चकमकीत जखमी होतो, आणि कायमचा जखडला जातो व्हिलचेअरशी कॅप्टन मिहीर म्हणून. तरीही त्याच्यातला सैनिक त्याला स्वस्थ बसू देत नाही. तो तरुणांसाठी नेमबाजीचे शिक्षण देतो. नेमबाजीत स्वतः कौशल्य दाखवून प्रशंसा मिळवतो, आंतरराष्ट्रीय स्तरावर. एका मोठ्या संकटातून अनेकांची सुटका करतो, एक सैनिक म्हणून.

एक सैनिक कसा असू शकतो आणि त्याची मानसिकता काय असते, हे या कादंबरीचे मुख्य सूत्र आहे. त्याला गुंफताना नागरी जीवनातील सुखाच्या कल्पना, स्वतः आणि स्वतःभोवतीच्या जगाला स्वर्ग समजण्याचा स्वार्थीपणा, संकटात सापडल्यानंतर हवालदिल होण्याची आणि हार पत्करण्याची प्रवृत्ती, यासारख्या विरोधी सूत्रांच्या धाग्यांचा लेखिकेने कुशलपणे वापर केला आहे. त्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तिरेखा म्हणजे मकरंद, पार्थ, रीना, समीरा, अक्षय, निधान आणि इतरजण. परंतु त्याचवेळी सुलेमान, एलिना, मि. स्मिथ, मिसेस कटारिया सारखी आडवा छेद देणारी काही मंडळी आपले आपले धागे घेऊन येतात. आणि त्यातून साकारली जाते एक सुरेख अशी वीण असलेली कलाकृती.

वास्तविक हे कथानक बऱ्याचशा अंशी सत्य घटनेवर आधारित आहे. एका सैनिकाने स्वतःचे सांगितलेले हे अनुभव आहेत. परंतु लेखिका केवळ एवढ्याच भांडवलावर थांबलेल्या नाहीत. वास्तवाला समोर ठेवताना त्यातल्या सर्व पैलूंचे आकलन झाले पाहिजे म्हणून त्यांनी अनेक सैनिकांशी संवाद साधला. ‘सैनिक’ आणि ‘एनडीए’ या शब्दांभोवती असलेले वातावरण आणि त्यातला गूढपणा समजून घेतला. जसे ऐकले, उमगले त्याचा एक कलाकृती म्हणून कसा उपयोग करता येईल, याचे चित्र कल्पकतेने मनाशी चितारले. त्यातून ही कादंबरी आकाराला आली. शिस्त, कर्तव्य, देशप्रेम आणि सैनिक यांचे परस्पर नाते कसे आहे, याची महती सांगणारी कितीतरी वाक्ये त्यातून आलेली आहेत, अगदी उत्स्फूर्तपणे.

‘शौर्य म्हणजे काय असतं? ते सगळं असतं ऑनेस्टी, ड्युटी, डिसिप्लिन या गुणांनी मिळून तयार झालेलं.’

‘एका अतिरेक्याला पकडताना काय रक्ताचं पाणी करावं लागतं ना सैनिकांना ते पेपर वाचून नाही कळणार. त्यासाठी तिथं सैनिक म्हणूनच उभं असावं लागतं.’

यात सहजपणा आहे, तरीही काही सांगून जाणे आहे, हे या कादंबरीचे यश आहे, असे म्हणता येईल. या कादंबरीसाठी खास कॅ. मधुकर देसाई यांनी प्रस्तावना दिली आहे. ते लिहितात, ‘सैनिकाच्या डोळ्यांसमोर एकच लक्ष्य असते, मी विजयी होणार. एक आत्मविश्वास असतो, एकच भावना असते, हे माझे बलिदान माझ्या मातृभूमीच्या रक्षणासाठी आहे आणि हे माझं परम कर्तव्य आहे. आपल्या देशबांधवांसाठी ‘‘आम्ही आमचा आज तुमच्या उद्यासाठी अर्पण केला.’’

अविनाश धमाधिकारी लिहितात, ‘‘माणूस जगतो त्याची संहिता होते. त्या संहितेला शब्दरूपात सांगितलं की साहित्य तयार होतं. पण काही साहित्य फक्त वास्तव मांडतं, काही त्या पलीकडे जाऊन वास्तवाचा अन्वयार्थ सांगतं, तर त्याच्याही वर उठणारं साहित्य जगण्यातली प्रेरणा सांगतं. ‘ए मेरे वतन के लोगों’ ही कादंबरी या वर्गातली आहे.’’

या प्रस्तावना म्हणजे कादंबरीच्या शिरपेचाला मोत्याचा तुरा लावल्यासारख्या आहेत.

चित्रकार पुंडलिक वझे यांनी मुखपृष्ठ साकारले आहे. सैनिक आणि त्यांचे अंतरंग, यांच्या छावणीशी आपण उभे आहोत, असाच त्याकडे पाहून भास होतो.

**मूल्य ३०० रु. ● सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान




चार्ली हे नाव सगळ्यांनाच ठाऊक आहे, त्याची प्रतिमाच नजरेसमोर उभी राहते, नुसते नाव उच्चारले तरी. परंतु चेकपॉईन्ट ही काय भानगड आहे, हा शब्द त्याच्याशी जोडलेला कसा, कुतूहल वाटावे असाच प्रकार. शीर्षक ठेवताना अशा रम्य कल्पनांचा उपयोग केला जातो, वाचकांना आकर्षित करण्यासाठी. तसे प्रथम दर्शनी हे पुस्तक हातात घेताना वाटले देखील. परंतु वाचत गेलो आणि पृष्ठ १०४ वर संदर्भाचा शिलालेख सापडला : चेकपॉइन्ट चार्ली म्हणजे बर्लिनची भिंत अधिकृतरीत्या ओलांडण्याची जागा. नाटोने अशी तीन ठिकाणे ठेवली होती, अलफा, ब्राव्हो, चार्ली. लोकांना आणि टूरिस्टना पूर्व बर्लिनमध्ये जाण्यासाठी चेकपॉईन्ट चार्लीमधून जावे लागे. याचे वर्णन आणि त्याला अनुसरून मांडलेला विचार लेखिकेने मांडला आहे तो असा, 'दृश्य आणि अदृश्य कुंकवाच्या भिंती स्त्रियांच्या मनाभोवती उभारलेल्या असाव्यात. सगळ्या आपापल्या परीने त्यात एखादं दार सापडतंय का पलीकडे जायला, असं शोधत असतील. आमचा हा युरोप प्रवास म्हणजे त्या भिंतीत आम्हाला सापडलेलं किंवा आम्ही निर्माण केलेलं दार म्हणायला हरकत नाही.'

यावरून लक्षात यायला हरकत नाही, की हे पुस्तक प्रवासवर्णनाचा साज घेऊन आलेले आहे. दोन मैत्रिणी नेहा आणि वैदेही या नावाच्या. त्यांनी सुरू केलेल्या युरोप प्रवासाचा वृत्तांत यात आहे. एक भारतातील तर दुसरी अमेरिकेहून निघालेली. दोघीच. प्रवासही मस्तपैकी कारनेच. त्यामुळे जे काही करायचे, पाहायचे ते आपल्या मनाप्रमाणने, मर्जीने. कुठेही थांबा, पाहा, पुढे चला. असा प्रवास. प्रवासवर्णन म्हटले की साधारणपणे नजरेखाली आलेल्या स्थळांची माहिती, वर्णन, आलेले अनुभव, असा ठराविक साचा ठरलेला. परंतु इथे या समजाला चांगलाच धक्का बसतो. यात हे सारे आहेच, पण त्यातच इतिश्री नाही. त्याहीपलीकडचे सौंदर्य अनुभवायला मिळते, कल्पकता आणि मानसिकतेचे सौंदर्य. अगदी ठासून भरलेले. नदी, घरे, प्रसाधनगृहे, निसर्ग, मतिमंद मुले, चुंबन–अलिंगन, लग्न–लिव्ह इन रिलेशनशीप, घटस्फोट, शारीरिक भूक आणि नैतिकता असे कितीतरी विषय आहेत, ज्यांच्याशी आपली आणि त्यांची अशी तुलना, साम्य आणि विरोधाभासाचे तपशील विचारांच्या पातळीवर वाचकांच्या समोर ठेवलेले आहेत. ते वाचत असताना वाचक म्हणून आपण भूप्रदेशाच्या प्रवासात रममाण होतोच. परंतु या प्रवासाला निघालेल्या नेहा आणि वैदेहीच्या वैयक्तिक जीवनाच्या प्रवासाचाही उलगडा आपल्यासमोर होत जाताना आपण अनुभवतो. दोघीही सुविद्य आहेत, वृत्तीने स्वतंत्र आहेत. मुक्त आणि मिळवत्या आहेत. एक संसारी, एक लिव्हइन रिलेशनशिपमध्ये राहिलेली. त्यामुळे विचारातील प्रगल्भता आणि पाहण्याचा दृष्टिकोन यात स्थापित होतो तो उच्चस्तरीय. एक समांतर प्रवासाचा अनुभव येत राहतो, शारीरिक आणि मानसिक स्तरावरचा. त्यामुळे हे केवळ प्रवासवर्णन न राहता, त्या ढाच्यात बसवलेली कादंबरी होते. आनंदप्रवासाची कादंबरी!

तसा या प्रवासवर्णनात हिटलर वारंवार भेटत राहतो, वेगवेगळ्या संदर्भातून. त्याची मानसिकता, युद्ध, वैयक्तिक जीवन आणि इव्हा ब्राऊन, चार्ली चॅप्लिन आणि हिटलर, चेक, बर्लिन, भिंत, हा सगळा इतिहासाचा भागही यात आलेला आहे, आणि तो मांडलाही आहे तितकाच रंजकतेने. संपूर्ण लेखनाचा बाज आहे तोच मुळी रंजक स्वरुपाचा. संवादात्मक पद्धतीने मांडणी केलेली असल्याने आणि प्रकरणे लहान लहान असल्याने, सुरुवातीला यात बाधा येते खरी. परंतु पात्रांशी मनाची जुळणी झाली की आपण त्यांच्या सोबतीने प्रवास करीत आहोत, असे वाटत राहते. लेखनात सहजता आहे, विचारांचा ठाशीवपणा आहे आणि त्याला मानसिकतेचे मोठे पाठबळ आहे. त्यामुळे त्याचा जीव लहान असला तरी आवाका मात्र कवेपलीकडचा आहे.

मुखपृष्ठ संजय पाटील यांनी साकारले आहे. भिंतीला असलेल्या दरवाजाचे. त्याची संकल्पना लेखिकेची आहे, हा दरवाजा पार करून जाण्याची. 'स्त्रियांच्या भोवती उभारल्या गेलेल्या भिंती अनेक प्रकारच्या असतात– रूढीच्या, परंपरेच्या, अपेक्षांच्या, उपेक्षेच्या, तडजोडीच्या... त्या भिंती पार करून पलीकडे आनंदाच्या दिशेने जाण्याचा मार्ग म्हणजे हा दरवाजा, चेकपॉईंट चार्ली!'

**मूल्य २५० रु. ● सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान




काही पुस्तके ही देव्हाऱ्यातील तेवणाऱ्या समईसारखी वाटतात, एका लयीत तेवत राहणारी. देव्हाऱ्याचा नव्हे तर मनाचा कोपरा उजळणारा प्रकाश देणारी, मंद, प्रसन्न. तसा अनुभव देणारे पुस्तक वाचनात आले, त्याचे नाव आहे, 'प्रेमाचं ऋण'. ऋण अनेक प्रकारचे असू शकतं, परंतु प्रेमाचं ऋण हे काही वेगळेच. नात्यातले धागे अलगद उलगडून पाहणारे, माणसातल्या माणुसकीला साद घालणारे, कठोरपणाला करुणेची झालर लावणारे, वैशाखात श्रावणाचा गारवा देणारे, स्मरणाच्या, आरोग्याच्या हिंदोळ्यावर झुलायला लावणारे, आपल्यातून बाहेर पडायला भाग पाडणारे... अशा कितीतरी रंगांचे इंद्रधनुष्य म्हणजे 'प्रेमाचं ऋण'!

'प्रेमाचं ऋण' हे पुस्तक म्हणजे लेखसंग्रहाचे पुस्तक. यातले बरेचसे लेख लोकसत्तेच्या पुरवणीत प्रसिद्ध झालेले आहेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झालेला मजकूर हा दुसऱ्या दिवशी शिळा समजला जातो. परंतु सगळ्याच मजकुराला ही कसोटी लावता येत नाही. फुले सुकली तरी त्यांचा सुगंध कायमच असतो. तसे या लेखांबाबत म्हणता येईल. प्रेमाचं ऋण हा लेख मानसिक आरोग्य, नामस्मरण आणि सामाजिक स्वास्थ्य यांना अनुसरून पूज्य बेलसरे यांच्या शिकवणीचे माहात्म्य सांगणारा आहे. त्यांच्या रसाळ विद्वत् वाणीतून झरणारा सल्ला हा अलौकिकाचा आनंद देणारा श्रावणवर्षाव आहे, जो लेखिकेच्या जीवनबागेला संजीवनी देऊन जातो– चांगल्या माणसांचा शोध घे. पाहा मनाला उमेद येते की नाही. मनाला उमेद आली की आजाराचं दुःख कमी होतं. मोलकरणीचे नाते तसे कामापुरते, गरजेपुरते. परंतु ते तेवढेच नाही. लागलेला लळा, आणि कठीणप्रसंगी दिलेली सोबत हे मोलकरणीच्या 'प्रेमाचे कर्ज' असू शकते. फक्त ते समजून घ्यायला मन लागते, लेखिकेसारखे. मुलीच्या मृत्यूनंतर तिची लहानगी मुलगी दत्तक देताना जावई आनंदी होतो, चांगल्या घरात गेली म्हणून आणि आपली सुटका झाली म्हणून. परंतु तिचा सांभाळ करणाऱ्या आजीला काय वाटत असेल, याचा विचार किती अंतर्मुख करणारा असू शकतो, याचा अनुभव 'अनोखं कन्यादान' या लेखातून येतो. मुलीचे कन्यादान आणि तिच्या मुलीचेही कन्यादान या विषयी लिहिताना लेखिकेने किती भावनिक वास्तवाला हात घातला आहे, याची कल्पना हा लेख वाचत असताना येते. त्या लिहितात, 'सुमानं या मुलीऐवजी मुलाला जन्म दिला असता तर जावयांनी त्याला इतक्या सहजासहजी दत्तक दिला असता का? आणि समजा, जावयांचा आधी मृत्यू झाला असता तर सुमानं आपली मुलगी अशी दत्तक दिली असती का?' मातृवियोग ऐवजी भातृवियोग असा म चा भ करणारा अनुभव तर विलक्षणच म्हणायला हवा. तानापिहिनिपाजा, नदीकिनारी, सावली, कशीही असली तरी, सुटका, असाल तिथून परत या! हे लेख तर उल्लेखनीय म्हणायला हवेत. या लेखांतून अनेक व्यक्ती, त्यांचे अनुभव, जगणे लेखिकेने आपल्यासमोर ठेवलेले आहेत.

'नदी आपल्या आजूबाजूचा परिसर सुपीक करीत जाते, तसं आपल्या जीवनाचा प्रवाह पुढे जात असताना, आपल्या आजूबाजूच्या माणसांना आपल्याला निरपेक्ष प्रेम देता आले पाहिजे.'

'प्रेमाचा कधी व्यवहार करायचा नसतो. आपल्या मुलांवर जिवापाड प्रेम करताना, तसंच प्रेम मुलांकडून मिळेल ही अपेक्षा केली तर प्रेमाची किंमत शून्य!'

'विवाह हे स्त्रीच्या जीवनाप्रवासातील अवघड वळण. जागोजागी रस्त्यात असलेले अडथळे चुकवून तिला हा प्रवास करण्यासाठी यू टर्न घ्यावा लागतो.' अशी कितीतरी वाक्ये जागोजागी आली आहेत, जी जीवनाच्या प्रत्येक पायरीवर कोरलेली असतात. त्याचप्रमाणे कबीर, तुकाराम, रामदास, ज्ञानेश्वर यांची अवतरणेसुद्धा अनेक ठिकाणी दिलेली आहेत. त्यांचा चपखलपणा हा लेखांचा सौंदर्यालंकार होय. त्याचप्रमाणे लेखिकेने जसा चित्रकलेचा प्रयोग केला, गायनाचा केला, तसा कवितांचाही केलेला आहे. त्याही मधूनमधून वाचकांच्या भेटीला येतात. शब्दमर्यादा असूनही त्यांच्यातील बांधेसूदपणा कुठे सैल झालेला नाही. भाषेला डौल आहे. 'सुटका' हा लेख तर थेट वाचकांशी संवाद साधतो. इतरांच्या अनुभवांशी जोडून घेताना लेखिकेला स्वतःच्या जीवनानुभवांना टाळून पुढे जाता आलेले नाही. त्यामुळे त्यातून त्यांचे चरित्रही उलगडत जाते.

निलेश जाधव यांचे मुखपृष्ठ हे पुस्तकात सामावलेल्या लेखांचे आपलेपण, जिव्हाळा, हळवे क्षण यांच्या स्पंदनांना टिपणारे आहे, चातकाने दवबिंदू चोचीने टिपावेत तसे. सुंदर!

**मूल्य १५० रु. ● सवलतीत ९० रु.**

एक संपन्न आणि समृद्ध वैवाहिक जीवनाचा प्रवास होतो तो दोघांच्या साथसंगतीने. हा प्रवास कधी आडवळणे घेतो, कधी खडतर होतो, परंतु जिद्द मनाशी असेल तर इच्छित स्थळी नेऊन पोहोचवतो. इच्छित स्थळी पोहोचल्याचे समाधान नेहमीच वाट्याला येते असे नाही, हे ज्याच्या त्याच्या वैयक्तिक आशा-आकांक्षांच्या ऊन-सावलीवर अवलंबून असू शकते. पण झालेला प्रवास आणि परस्परांनी एकमेकांना दिलेली साथसंगत ही नक्कीच समाधान देणारी असते. तिचे सिंहावलोकन म्हणजे आपण आपलेच अंतर्मुख होऊन केलेले आत्मपरीक्षण होय. अशा एका जीवन प्रवासाचे वर्णन करणारे आशा राणे या लेखिकेचे पुस्तक हाती आले, त्याचे नाव आहे ‘साथसंगत’.




‘तुमचे प्रेमबीम सारे ठीक आहे पण तुमची आमच्याकडून काय अपेक्षा आहे?’

‘मला तुमची मुलगी आणि तुमचा आशीर्वाद द्या’ अशा तऱ्हेने साथसंगतीचा निर्णय घेतलेले हे उभयंता, आशा आणि मधुकर ऊर्फ जगन्नाथ. स्वतःच्या पायावर उभे राहून हिंमतीने संसाराची नौका या प्रचंड धकाधकीच्या अथांग सागरात उतरवून जीवनप्रवासाला सुरुवात करतात. दोघेही बुद्धीने कुशाग्र, उच्च शिक्षित. आपापल्या क्षेत्रात भरारी घेणारे. जिद्दीने सर्व परिस्थितीवर मात करणारे, सतत पुढेच जाण्याचा ध्यास घेतलेले. त्यामुळे एक प्रथितयश समाजशास्त्रज्ञ म्हणून आशा राणे यांनी स्वतःची ओळख निर्माण केली. महाराष्ट्र शासनाचा समाजकल्याण विभाग, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स, एसएनडीटी, पुणे विद्यापीठ, युनिसेफ अशा विविध मान्यवर संस्थांमध्ये स्वतःचे स्थान निर्माण केले. सामाजिक कार्यातही अग्रेसर राहिल्या. रस्त्यावरील मुलांसोबत काम करणारी संस्था ‘हमारा फाउंडेशन’ स्थापन झाली ती त्यांच्या प्रयत्नातून. गेली पंचवीस वर्षे त्या ही संस्था समर्थपणे चालवत आहेत. त्यांच्या या एकूणचा सामाजिक कार्यासाठी त्यांचा गौरव करणारे ‘प्रियदर्शनी कर्तृत्त्व गौरव पुरस्कार, भास्कर कर्वे पुरस्कार, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार’ यांसारखे अनेक पुरस्कारही लाभलेले आहेत. तर मधुकर राणे यांनी, राष्ट्रीय मिल मजदूर संघ, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, कोकण प्रादेशिक निवड मंडळ, महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळ, अशा विविध ठिकाणी उच्च पदावर स्वतःच्या कर्तृत्वाची मोहर उमटवली. परंतु तेवढेच नाही, सामाजिक कार्यातही आपल्या पूर्ण क्षमतेचा पूरेपूर उपयोग केला. सहकारी गृहनिर्माण संस्था, कोकण कृषी विद्यापीठ, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या टिळक भवनातील ‘ग्रामीण विकास विभाग’ आणि सगळ्यात महत्त्वाचे आणि आज दिमाखात उभे उसलेले छेडानगर, चेंबूरचे ‘छेडानगर एज्युकेशन सोसायटीचे अद्ययावत विद्यालय.’ अशा या कर्तृत्ववान दाम्पत्याची आपसातली एकमेकांना साथ देण्याची, एकमेकांना समजून घेण्याची वृत्तीही तितकीच उदात्त आणि भावपूर्ण आहे, एकमेकांचा पूर्ण आदर राखून. त्यामुळेच त्यांच्या कार्याचा आलेख उंचावत गेलेला दिसतो.

आपल्या जीवनप्रवासाबाबत लिहीत असताना अनेकदा आत्मप्रौढी, स्वकेंद्रितपण डोकावण्याची दाट शक्यता असते. परंतु या लेखनात त्याचा कुठेही लवलेश नाही. उलट हे सारे करीत असताना आपण काही वेगळे करतो आहोत आणि त्यासाठी सारे आयुष्य झोकून दिले आहे, असा डौल न दाखविता, जीवन आनंदाने कसे जगलो, देश विदेशाचे प्रवास कसे केले, त्याचेही वर्णन यात आलेले आहे. पी के सावंत, त्याकाळचे राज्याचे गृहमंत्री, विजय टिपणीस, माजी लोकायुक्त व निवृत्त न्यायाधीश, श्रीमती पार्वती परिहार यांच्यासारख्या अनेकांचे लाभलेले सहकार्य, त्यांचा आदराने उल्लेख केला आहे. असलेल्या व्याधींविषयीसुद्धा तपशीलाने आणि तितक्याच मनमोकळेपणाने लिहिले आहे.

पुस्तकाची कल्पना चरित्रात्मक आहे, परंतु त्यात केवळ आपल्याच मतांना प्राधान्य न देता, आपल्यासोबतच्या इतरांना आपल्याविषयी काय वाटते, त्यांच्या भावना, मते, विचार यांना यात आवर्जून स्थान देण्यात आले आहे. प्रदीर्घ असा साथसंगतीचा प्रवास असला तरी त्याचे वर्णन अतिशय मोजकेपणाने केलेले आहे. ते करीत असताना त्यातला साधेपणा आणि सच्चेपणाही जपलेला आहे. सोबत अनेक रंगीत फोटो दिलेले आहेत.

साथसंगतीच्या हळूवारपणाला साजेसे मुखपृष्ठ सतीश खानविलकर यांनी सजविलेले आहे. त्यांची मुखपृष्ठावरील कलाकृती पाहत राहावी इतकी सुंदर आहे.

**मूल्य १५० रु. ● सवलतीत ९० रु.**




# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

अकरा कथा असलेला 'मृगतृष्णा' हा लक्षमीकांत देशमुख यांचा कथासंग्रह नुकताच वाचून बाजूला ठेवला. एक वावटळ सभोवती फेर धरून नाचते आहे, तिच्यात आजूबाजूचा पालापाचोळा सामावला जातो आहे, वर भिरकावला जातो आहे आणि तसाच तो वरवर जातो आहे, असे चित्र दिसू लागले. आपले अस्तित्व आहे, ही स्पष्ट करणारी वावटळ, जी नशीब, समाज, जात, राजकारण, परंपरा या नावाने अजूनही अस्तित्वात आहे. तर, भिरकावणे हे आपल्या होणाऱ्या ससेहोलपटीचे, कमकुवत मनाचे, दुभंगून टाकणाऱ्या प्रवृत्तीचे, शोषणाचे प्रतीक. आपल्याला काय वाटते याला किंमत नाही, जे घडणार आहे, ते घडत जाणार आहे. आणि तसे घडवणारी व्यवस्था आपल्याभोवती तिचे पाश पसरून सजग आहे. 'ब्रह्मास्त्र' या कथेतील सईला सरपंच व्हायचं आहे. शासनाने महिलांसाठी राखीव जागा ठेवलेल्या आहेत. शरद आणि नीताच्या पाठिंब्याने ती सरपंच होतेदेखील. पण.. पण अनेक वर्षे तिथे सरपंच म्हणून संस्थानिक झालेला रोकडे तिचे प्राक्तन म्हणून तिथे हजर आहे, राहूसारखा. तो जे 'ब्रम्हास्त्र' फेकतो, त्याने केवळ सईचे सरपंचपद जात नाही, तिचे सर्वस्वच उद्ध्वस्त होते. इथे का, कसं? असे प्रश्न उपयोगी ठरत नाहीत. इतकेच नव्हे तर उच्चशिक्षित आणि उच्च पदाधिकारी असलेले शरद, नीताही हतबल ठरू शकतात. पालापाचोळा म्हणून कुणी असावं, याला संकेत नााहीत. 'प्रत्येक स्त्रीने लक्ष्मी, सरस्वती दुर्गा व्हावं. सरस्वती म्हणजे साक्षर, सुशिक्षित व विचारी होणं. लक्ष्मी म्हणजे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणं. आणि दुर्गा होणं म्हणजे अन्यायाविरुद्ध कणखरपणे लढणे...' हे फक्त भाषणासाठी उत्तम!




प्रेम हा शब्द जीवनदान देतो की जहर? किती निर्मळ आणि कोमल भावना दडलेली आहे या शब्दात. 'मेरे सरदार'मधील शामल किती निरागस आहे. तितकाच तिचा सुखा. प्रेमासाठी तो पंजाबातून महाराष्ट्रात येतो. तिच्या आग्रहाखातर पारंपरिक दाढीमिशा काढून तिच्या स्वप्नातला राजकुमार होतो. सुखाने संसार सुरू असताना आईबापाला भेटण्यासाठी पंजाबला जायला निघतो. तेव्हा तीच त्याला दाढीमिशा राखण्याचा आग्रह धरते. पण त्याचा परिणाम? इंदिरा गाधींचा खून याच दरम्यान होतो. त्याला जबाबदार असतो शीख तरुण. एवढेच निमित्त पुरे होते. एक समाज दुसऱ्या समाजाची शिकार करू लागतो. त्यात सुखाची आहुती जाते. सुखाने सुरू असलेला प्रेमाचा संसार.. कारण ठरते ती शामलच. 'जात नाही ती जात' या कथेतील शीतल आणि रमेश यांचे प्रेम असेच, निरामय, निखळ. पण जातीचा अहंकार आडवा येतो तेव्हा हे प्रेम कुठल्या कुठे भिरकावले जाते. सुरू होते ते सूडाचे राजकारण. यात होरपळणारे जीव ना स्वतः सुखाला ओंजळीत घेऊ शकत ना कुणाच्या ओंज्ळीत प्रेम ओतू शकत. मग आप्पा – अण्णा हे निमित्तमात्र ठरतात. 'मृगतृष्णा' कथेतील सविता आणि तो, यांच्यातला भावपिसारा तर अप्रतिम. संवादरूपाने तरलपणे थरथर करीत नाचत असलेला आणि तसाच थरथर करीत कातर होत गेलेला. आपापल्या जागी आपले असणे हे परंपरेचे आहे, ते पाळले पाहिजे. तरी त्यात एक निखळ ओढदेखील आहे. निर्मळ ओढ. हा संयतपणा म्हटले तर दोघेही दाखवू शकतात, स्वतःवर पूर्ण विश्वास मात्र हवा.

भविष्य / ज्योतिष्य यावर कुणी किती विश्वास ठेवायचा, हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न. परंतु या भविष्याचे कुतूहल आणि त्यातून निर्माण होणारे पेच, हे केवळ ज्यांनी ते ऐकण्याची आग्रही भूमिका घेतली तेच समजू शकतात. भविष्य कधीही सुखाने जगू देत नाही, ते ऐकले तसेच घडणार, या विश्वासाने सारे आयुष्यच नासवून टाकते. हा अनुभव 'तळहातावरील रेषा' या कथेतील किरण आणि अनिरुद्ध यांच्या वाट्याला येतो, तोही विदारकपणे. यात विश्वासही ओढला गेलेला आहे. एकमेकांवर विश्वास आणि एकमेकांवरील अविश्वास याचा हा वास्तववादी पुरावा या कथेत सापडतो. तीच तऱ्हा 'कृष्णार्पण वस्तू' या कथेत आहे. प्रेम, जीवापाड प्रेम आणि ज्योतिष यात अडकलेले नचिकेत, गार्गी हे जोडपे. एकमेकांसाठी किती त्यागाची भावना. पण भविष्य...

स्त्री आणि पुरुष यांच्या नात्याला अनेक पदर आहेत. सारे विश्व याच पदराने विणलेले आहे. कितीही उलगडले तरी त्याचा थांग न लागलेले. लक्ष्मीकांत देखमुख यांनी या नात्याचा शोध घेण्याचा प्रयत्न या कथांमधून केलेला आहे. अगदी असोशीने. मानसशास्त्रीय अंगाने देखील तो झालेला दिसतो. 'निळे डोळे' हे त्याचे उत्तम उदाहरण होय. कथेचा आत्मा म्हणजे लहानसे बीज, परंतु कथा फुलत जाते, तिच्यातली उत्कंठादेखील वाढत जाते. यासाठी लेखकाकडे जी सिद्धता असावी लागते, ती देखमुखांकडे आहे, हे प्रकर्षाने जाणवत राहते. पुंडलिक वझे यांचे सुंदर मुखपृष्ठ या संग्रहाला लाभले आहे. तृष्णा भागत नाही ती मृगतृष्णा. हाताशी आहे, परंतु ते गवसत नाही. भासातच सारे विरत जाते. स्त्रीपुरुषाचे नाते असेच तर असते, कधी जवळ, कधी जवळ असूनही अनेक योजने दूर. उरतात फक्त खुणा सुंदर! मुखपृष्ठ!

**मूल्य २५० रु. ● सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

‘खरं तर ‘गॉडफादर’ नावाचा शब्द ही सर्वस्वी पुजो यांच्या कल्पनाशक्तीची कमाल आहे. कारण त्यांच्यापूर्वी असा शब्द कोणीही माफियांसाठी वापरलेला नव्हता. अगदी खाजगीतही नाही.’ मुळातच गॉडफादर या सिनेमाविषयी प्रचंड कुतूहल. त्यात हे नावीन्य. एक वेगळाच आनंद, एका शब्दाचा जनक सापडल्याचा. तशी ऑस्कर विजेत्या सिनेमांचे कुतूहल प्रत्येक सिनेमाप्रेमीलाच असते. त्यामागे अनेक कारणे असतात. त्यात काहीतरी विशेष असणार हे नक्कीच. तरीही महत्त्वाचा प्रश्न असतो, ऑस्कर मिळाले ते का, कशासाठी? त्या कुतूहलाचा वेग संथ होण्यासाठी उपयोगी ठरावे असे पुस्तक वाचनात आले, आणि एक वेगळीच आनंददायी प्रेरणा मनात दीर्घकाळ रुणझुणत राहिली. गॉडफादर, टायटॅनिक, गॉन विथ द विंड, बेनहर, गांधी, स्लमडॉग यांसारखे ऑस्कर विजेते काही सिनेमे आपण पाहिलेले आहेत, काहींच्या नावांशी आपला परिचय बऱ्याप्रमाणात आहे. तरीही मिळलेले विजेतेपण का, कशासाठी, याचे नेमके आकलन झालेले होतेच, असे नाही, ते या पुस्तकाने झाले, असे म्हणता येईल. अर्थात त्यासाठी अपर्णा पाटील यांनी घेतलेले परिश्रम, शोध, केलेले विश्लेषण आणि त्यापाठी असलेला त्यांचा दृष्टिकोन हे कारणीभूत आहेत, आणि ते सत्कारणी लागले, असे निश्चितपणे म्हणता येईल. ज्यांनी सिनेमे पाहिलेले आहेत, त्यांना काही वेगळे सापडल्याचा आनंद मिळेल, तर ज्यांनी हे सिनेमे पाहिलेले नाहीत, त्यांना ते पाहण्याचे कुतूहल नक्कीच जाणवेल.




या पुस्तकात दहा ऑस्कर विजेत्या सिनेमांचा ऊहापोह झालेला आहे. सिनेमा हे माध्यम करमणुकीसाठीचे साधन. परंतु त्याची निर्मिती करीत असताना त्यापाठी निर्माता, दिग्दर्शक यांची काही ठाम भूमिका असू शकते, ते या ऑस्कर मानांकित सिनेमांच्या निर्मितीतून दिसून येते. त्याचा मागोवा लेखिकेने घेतलेला आहे. त्याची उदाहरणे म्हणून ‘शिंडलर्स लिस्ट’ व ‘टायटॅनिक’ची देता येतील. ‘मी क्राकोव्हमधल्या केवळ आठ ज्यूंचा विचार करू शकत नाही. तर साठ लाख निरपराधांचा बळी ज्या संहारात झाला आणि जे हजारो लोक वाचले त्यांचं प्रतिनिधित्व करण्याच्या विचारातून हा सिनेमा करायला हवा.’ ‘शिंडलर्स लिस्ट’ हा सिनेमा करण्यामागची स्पिलबर्ग या दिग्दर्शकाची भूमिका स्पष्ट करणारा हा ठाम विचार. ‘टायटॅनिक’ ही प्रेमकथा आहे. पण कॅमरून हे स्वतःच ‘टायटॅनिक’ या जहाजाच्या प्रेमात पडले. मग अशा दुर्घटनेच्या वेळी प्रिय व्यक्तीचं दुरावणं जगण्यासाठी कसं खंबीर बनवतं, अशा विचारातून त्यांनी ही प्रेमकथा पडद्यावर मांडायचं ठरवलं, असं लेखिका नमूद करतात. प्रत्येक सिनेमाच्या बाबतीत आपल्याला एक वेगळी भूमिका दिसून येते.

सिनेमा तयार करताना अनेक आघाड्यांवर कसरत करावी लागते. त्यात कथेतील व्यक्तिरेखांना न्याय देणारे कलावंत निवडणे, हे सगळ्यात अवघड काम. अशाच कलावंतांपैकी आपल्या परिचयाचा असलेला एक प्रसिद्ध कलावंत म्हणजे, सिल्वेस्टर स्टॅलोन. रॉकी, रॅम्बो, द एक्सपॅंडेबलमधून आपण त्याला पाहिलेला आहे. त्याच्या भूमिकाही आपल्याला आवडलेल्या आहेत. आणि म्हणूनच त्याच्या एकूण या सृष्टीतील प्रवेशाविषयी, त्याच्या व्यक्तिमत्त्वाविषयी आपल्याला उत्सुकता वाटणे स्वाभाविक ठरते. या कलावंताची संपूर्ण ओळख आपल्याला या पुस्तकातून होते. तशीच ओळख गांधी सिनेमातील बेन किंग्जली, रिचर्ड ॲटनबरो, टायटॅनिकमधील केट विन्सलेट, लिओनार्दो द कॅप्रियो, गॉडफादरमधील मार्लन ब्रँडो अशा अनेक कलावंताचा परिचय आपल्याला या पुस्तकातून होतो. इतकेच नाही, दिग्दर्शक, पटकथाकार, तंत्रज्ञ, कॅमेरामन,संगीतकार अशा ज्या अनेकांचा आवश्यक सहभाग सिनेमासाठी असतो, त्यांचा परिचय करून देण्यात आलेला आहे.

कथा हा सिनेमाचा मूळ गाभा असतो. तिची निवड, तिच्याबरहुकूम सिनेमा प्रदर्शित होण्यापर्यंतचा प्रवास प्रत्येक ऑस्कर विजेत्या सिनेमाने कसा पूर्ण केलेला आहे, त्याची वर्णने थक्क करणारी आहेत. बेनहर, टायटॅनिक, गॉडफादर, रॉकी, शिंडलर्स लिस्ट ही त्यांची उत्तम उदाहरणे म्हणून सांगता येतील. ऑस्करचा इतिहास, निवड करण्याची पद्धती, कॉपीराईट, तंत्र यांचीही माहिती या पुस्तकात दिलेली आहे. लेखिका अपर्णा पाटील यांचे लेखन प्रवाही, आनंददायी आणि वाचकाला सोबत घेऊन चालणारे आहे. सगळ्या ऑस्कर विजेत्या सिनेमांची ओढ लावणारे आहे. त्यांना त्यासाठी नक्कीच शुभेच्छा द्यायला हव्यात. अशोक दाभाडे यांचे मुखपृष्ठ सिनेमाइतकेच उत्कृष्ठ झालेले आहे.

**मूल्य २५० रु. ● सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

श्रम ही एकच गोष्ट अशी आहे, जिच्यासाठी कुठला अपवाद असत नाही. असू शकते ते वेगवेगळे श्रमाचे स्वरूप. असतो काही श्रमांना जन्मजात वारसा लाभलेला, तर काहींना विद्यापीठीय प्रमाणपत्रांचा आधार. तरी शेवटी ते श्रमच, शारीरिक, कौशल्याचे, कुशलतेचे, अकुशलतेचे, बुद्धीचे, मेहनतीचे. प्रतिष्ठेचे, अप्रतिष्ठेचे, दखल घेणारे, अदखल असलेले...प्रत्येकाला बांधून ठेवलेले आहे ते या श्रमाच्या रजूंनी. काही रेशमी तर काही कठोर. तरीही आनंदाने त्याचा स्वीकार केलेला, त्यांच्याशी समरस झालेला प्रत्येकजण. काही खुषीने तर काही अपरिहार्यतेने. कारण या सगळ्यात सामावलेले असते जीवन, आणि त्याला सावरण्यासाठी, आकार देण्यासाठी सुरू असते स्पर्धा श्रमाची. या श्रमिकांमध्ये ज्यांची कधी गणना केली जात नाही, ना दखल, अशांची मोठी संख्या आपल्या अवतीभोवती आहे, ज्यांच्याशी आपला दैनंदिन व्यवहारात सतत संपर्क येतो, तरीही दखल घेतोच असे नाही. परंतु त्यांची नोंद घेण्याचे डोळस काम केले आहे संदीप राऊत यांनी, आपल्या 'श्रमिकाख्यान' या पुस्तकात.




संदीप राऊत यांचे हे लेखन वृत्तांतवजा असून ते 'लोकमत' या दैनिकातून प्रसिद्ध झालेले आहे. परंतु वृत्तपत्रीय लेखनासारखे या लेखांना 'शिळा' या सदरात टाकता येत नाही. त्याचे कारण त्यांची लालित्यपूर्ण शैली. या शैलीला प्रवाहीपणाचे वरदान आहे. तिच्यात कथानक आहे, नाट्याचा बाज आहे आणि रचनेचे कौशल्य आहे. त्यामुळे कुठलेही पान उघडले तरी त्यातला आशय आपणास आपलासा केल्याशिवाय राहत नाही. त्यातली व्यक्तिरेखा आपल्या जवळची परिचयाचीच नव्हे तर आपली वाटू लागते. कारण या प्रत्येकाशी कधीना कधी, कुठेना कुठे आपला संबंध आलेला असतो, जोडलेला असतो. काहींशी तर दररोजचा. गंमत म्हणजे संबंध असूनही आपण त्यांच्यापासून इतके दिवस दूर होतो, हा अपराधी भावही त्या आपलेपणाच्या मुळाशी आपोआप येऊन उभा राहतो.

वर्तमानपत्राला दररोज घरपोच आणून देणारा पेपरवाला, रस्त्याच्या कडेला दुकान थाटून चहा विकणारा, वडापाव –इडली विकणारा, केळी विकणारी, सलूनवाला, तेलमालिशवाला, कानातला मळ काढणारा, रसवंती चालवणारा, सोन्याला झळाळी आणणारा, बँड – बँजोवाले, किल्ली बनवणारे, रेतीकाम, विटाकाम करणारे असे असंख्य कष्टकरी आपल्यासभोवती वावरत असतात. या सगळ्यांची म्हणजे सुमारे एक्यांऐशी जणांची नोंद लेखकाने घेतलेली आहे. नुसतीच माहिती दिलेली नाही, त्यामागचा इतिहास, वृतांत, कथानक, तळमळ, कौशल्य, काळ–काम–वेग , आर्थिक गणित अशा अनेक अंगांनी त्या व्यक्ती आणि त्यांच्या भोवताचे वास्तव लेखांतून उभे केलेले आहे. सोबत त्यांच्या भाषेचा लहेजाही जसाच्या तसा दिलेला आहे. भाषेतला गोडवा आणि डौल यामुळे या व्यक्तिरेखा वाचकांशी संवाद साधतात. उदा. बँडवाला म्हणतो : 'इतवारा अंद्रू कोतीनशा घरशा वराडात कमरेया काटा ढिला जाला वाजवून.' बारबाला : 'तूम क्या समझते, उपोषण करनेसे लेडीज बार बंद हो जायेंगे?' नंदीबैलवाला : 'म्हंजे आमच्यावर श्रद्धा तुमा शिकलेल्या माणसांची हाये, मग आमची श्रद्धा मात्र आंद्श्रद्धा कशी ओ ठरते?' ते करीत असलेल्या व्यवसायाची एक भाषा असते, तसे तिथले काही सांकेतिक शब्द असतात, त्यांचाही परिचय होतो. वीटभट्टीशी संबंधित शब्द पहा, 'पातला' – माती पातळ द्रवरूप करणारा खड्डा. 'रगडी'–मातीचे मिश्रण पाण्याने पूर्ण ओले करून मजुराच्या पायाने रगडणे. 'भटकर' – विटांची भट्टी कौशल्याने रचणारा. 'आधला' – भट्टी तयार करताना प्रथम रांगेत विटा रचणे. 'कव' – मासेमारी, असे कितीतरी शब्द आपल्याला नव्याने भेटीला येतात. .

आयुष्याला अनेक रंग असतात. त्यातला काळा रंग. त्याची काळी बाजू, तिच्याआड असलेले जग कुणाच्या खिजगणीत नसते. त्याचा वापर मुखपृष्ठावर केलेला आहे. आणि चढावर ढकलत घेऊन जाणारे अवजड ओझे, नव्हे आयुष्यच, स्वतःच स्वतःला ढकलत नेण्यासारखे दाखवले आहे. ही श्रमिकाची बूज राखणारी सतीश खानविलकर यांची कल्पकता वाखाणण्यासारखी आहे. व्यक्तिरेखांना आणि वास्तवाला उठाव देणाऱ्या रेखाटनांनी सारेच चित्र नजरेसमोर उभे राहते. बालाजी भांगे, किरण पष्टे, अनिल रासम यांची ही रेखाटने लेखांवर उत्तम साज चढवितात.

**मूल्य २०० रु. • सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

‘पाय ठेवण्याएवढीही सुरक्षित अशी जमीन नाही. एका बाजूला अफाट वेगात वाहणारी नदी, दुसऱ्या बाजूला आता कोसळत असलेला डोंगर, रस्त्याच्या पलीकडे नदीचंच वळसा घालून जाणारं पात्र. जेमतेम शंभर मीटरच्या जागेत सगळी माणसं एकत्र आली होती. तीही सामानसुमानासकट. त्यात वरून कोसळणारा अनिर्बंध पाऊस. सगळ्यांचेच चेहरे रडवेले झाले होते. जीव वाचवण्यासाठी केविलवणी धडपड करत म्हणण्यापेक्षा त्या ईश्वराची करुणा भाकत जीव मुठीत घेऊन आम्ही उभे होतो.’

‘...आणि तो आनंदाचा क्षण आला. आम्ही १८३६० फूट उंच अशा खारदुंगला पासवर यशस्वी चढाई केली होती. आमचं उद्दिष्ट सफल झालं होतं. ‘भारतमाता की जय’ म्हणत आम्ही एकमेकांना मिठ्या मारल्या.

लडाख ...प्रवास अजून सुरू आहे

आत्माराम परब, नरेन्द्र प्रभू




आत्माराम परब, नरेंद्र पाटील, अनिल जगदाळे, परेश समजीसकर, विलास राणे, विनायक सराफ आणि पराग या मित्रांनी मोटारसायकलवरून मुंबई ते लेह – लडाख असा जो अविश्वसनीय वाटावा असा प्रवास केला, त्याचे वर्णन म्हणजे हे पुस्तक, ‘लडाख... प्रवास अजून सुरू आहे.’ प्रवासाची हौस असणे आणि ती वेगवेगळ्या कल्पना अमलात आणून पूर्ण करणे, यात अनेकदा साहस असते, आनंद असतो आणि जीवावर बेतणारा खेळही असतो, याचा अनुभव हे प्रवासवर्णन वाचताना येतो, अगदी पावलोपावली. परंतु हेही खरेच, इच्छा असेल, जिद्द असेल तर केवळ मार्ग सापडत नाही, तो मुक्कामी घेऊन जातो. या मित्रांनी मुंबई सोडली तेव्हा त्यांच्या मोटारसायकलींचा वेध होता लेह, लडाखचा, नजरेत जिद्द होती, ठरलेल्या कालावधीत प्रवास पूर्ण करायचा. परंतु सगळे मनासारखे ठरलेल्याप्रमाणे पार पडले, तर त्यातील सगळे अनुभव सांगण्यासारखे असतील असे नाही. जेव्हा सगळेच आपल्या मनाच्या विरुद्ध घडत जाते, तेव्हा सारेच अनुभव जिवंत होतात, कायम सोबत करतात, उत्साहाने भरभरून सांगायला भाग पाडतात, खूप काही शिकवून जातात. आणि ते सारे स्वप्नवत वाटावेत इतके उत्कट, जीवघेणे, सर्व दोर कापलेल्या अवस्थेत घुसळून काढलेले, मनस्तापाच्या खाईत ढकलून माघारी परतण्याच्या निर्णयावर आणून सोडणारे आणि शेवटी हार न मानता पुढेच पाऊल टाकलेले अनुभव या मित्रांनी पचवले, परतवले, स्मृती म्हणून प्रतिपाळ करण्यास स्वतःहून होकार दिलेले अनुभव, याला म्हणतात प्रवास. तो या मित्रांनी केला, पाहिला, अनुभवला, मनालीच्या प्रवासापासून पुढे. हिमदंश, ढगफुटी, डोंगर कोसळणे, पाहता पाहता नदीचे पात्र बदलणे, माणसे आता होती, आता नाहीत, हे सारे नंतर आपण केदारनाथ आणि लेहच्या ढगफुटीच्या प्रलयाचे चित्रण टीव्हीवर पाहिले, घरबसल्या. परंतु ज्यांच्यावर बेतली, त्यांचे काय? हा अनुभव या मित्रांनी घेतला. त्यातून सुखरूप बाहेर पडलो. आणि आपण ज्या स्वर्गभूमीच्या अनुभूतीसाठी घराबाहेर पडलो, तिचे सुंदर दर्शन घेतले. आपला विविधतेने नटलेला देश, निसर्ग याचि देही याची डोळा पाहिला. सारे श्रम सार्थकी लागले.

या प्रवासात अनेक अडचणी जशा आल्या, तशी अनेक सहृदयी माणसेही भेटत गेली. पैसे न घेता जेवण, मुक्काम, हॉटेल, प्रवासात देवदूत झाली. माणूस खरा कळतो तो अशाच प्रसंगी, त्यांच्या माणुसकीचे दर्शन विलोभनीय आहे. स्वच्छ बर्फाचे उंच कडे, कधीही न पाहिलेले निळे निळे आकाश, क्षणाक्षणाला बदलत जाणारे हवामान आणि वळणावळणावर निसर्गाचे रूप, हे सारे पाहताना, अनुभवताना या मित्रांना केवढी समृद्धी लाभली! मिलिटरीचे जवान, त्यांचे जगणे, शिस्त, माणूसपण हेही जवळून पाहता आले. त्याच्याजोडीला प्रवासात भेटलेले कारगील, द्रास, १९६२च्या युद्धाची भूमी, त्यांचा इतिहास, मेजर सैतानसिंहाची कहाणी, हे सारेच आपल्याला, त्यांच्यासोबत असल्याचा आनंद देतात.

लेह–लडाखला कसे जावे, केव्हा जावे याची माहिती आपल्याला या पुस्तकातून मिळते. नव्हे, या प्रवासासाठी हे पुस्तक उत्तम मार्गदर्शक ठरू शकते. लेखकाने स्वतःची इशा टूर स्थापन केली, ती या प्रदेशांच्या प्रेमातून, त्यामुळे या प्रदेशाची सफर ही त्यांच्यासाठी कायमची सफर ठरून गेली आहे. प्रवासाइतकीच लेखनपद्धतीही जिवंत, प्रवाही आणि वाचकाला सोबत घेऊन प्रत्ययाचा अनुभव देणारी आहे. प्रेरणादायी असे हे पुस्तक प्रत्येक प्रवास करू इच्छिणाऱ्याने आवर्जून वाचायला हवे. पुस्तकात अनेक फोटो दिलेले आहेत. मुखपृष्ठाची मांडणीही हा त्या अनुभवांचा एक भाग आहे. अतिशय छान!

**मूल्य २५० रु. ● सवलतीत १५० रु.**

## ग्रंथपान

गीत, गजल आणि कविता हा प्रांत काबीज करणारी कर्तृत्ववान सुभेदारांची मोठी फौज सध्या मराठीच्या दरबारात मानाच्या आसनावर अधिष्ठित आहे. त्यातले बिनीचे आणि ज्यांच्या प्रतिभेवर रसिक वाचक रयतेची भिस्त आहे, असे त्यात मोजकेच म्हणता येतील. त्यात एक नाव आहे, सदानंद डबीर. 'लेहरा', 'तिने दिलेले फूल', 'खयाल', 'आनंदभैरवी' आणि 'काळीजगुंफा' हे पाच प्रकाशित संग्रह त्यांच्या नावावर आहेत. अनुवाद आणि संपादित साहित्य त्यांच्या नावावर आहे. 'प्रीतराणी मी', 'नमो आदिरूपा' 'कैफियत' यासारखी अनेक गीते आणि गजलांच्या ध्वनिफिती आणि सीडीज त्यांच्या नावावर आहेत. आजचे आघाडीचे सर्वच संगीतकार आणि गायक यांचा स्वर आणि संगीतसाज त्यांच्या गीतांना लाभलेला आहे. अशा या सदानंद डबीरांचा हा दुसरा संग्रह आहे, ज्याच्या संपादनासाठी डॉ. राम पंडित यांचा सृजनस्पर्श लाभलेला आहे. पहिला,'मराठी गजल- सदानंद डबीर' (२००७) आणि आता दुसरा, 'छांदस' (२०१६)

डॉ. राम पंडित हे स्वतः उत्तम कवि आहेत, गजलकार आहेत. गजलचे अभ्यासक आहेत आणि उर्दू या विषयात डॉक्टरेट संपादन केलेले आहेत. उर्दूमधील जवळपास सगळ्याच गजलकारांच्या मैफिलीत त्यांचे स्थान अग्रभागी असते. अशा सृजनशील आणि तितकेच चिकित्सक असलेले पंडित यांच्या संपादनाखालून एखादी कलाकृती आकाराला येते, तेव्हा ती परीसस्पर्श लाभलेली कलाकृती आहे, असे समजण्यास पर्याय नाही. आणि ते भाग्य डबीरांच्या वाट्याला दोन वेळेस यावे, हा तर ज्ञानपीठ मिळाल्यासमान योग म्हणावा लागेल. परंतु त्याचवेळी हेही मान्य करायला हवे, राजेपद भूषविण्यासाठी त्या कुळात जन्माला यावे लागते. डबीरांची साहित्यिक निर्मिती आणि त्यातले त्यांचे उजवेपण कुणालाही हेवा वाटावा, असेच आहे. त्यासाठी डॉ.राम पंडित यांनी या संग्रहाला लिहिलेली प्रस्तावना जरूर वाचावी. ते लिहितात, 'साहित्य असो वा अन्य कोणतीही कला असो, त्यात सृजनकर्त्याच्या प्रतिभेचा एक उत्कर्षबिंदू निहित असतो. लेखक जेव्हा एकाच फॉर्ममध्ये आपल्या समग्र प्रतिभेचा विनियोग करतो तेव्हा त्या उत्कर्षबिंदूनंतर उतार लागणे क्रमप्राप्त आहे. डबीरांनी हे सत्य जाणले व त्यामुळे त्यांनी आपली सृजनप्रक्रिया एकसुरी होऊ दिली नाही. विधावैविध्य, विषयवैविध्य व विचारवैविध्य ही त्यांच्या पद्यरचनेची त्रिपुटी म्हणता येईल.'

छांदस या संग्रहात डबीरांच्या पाचही संग्रहातील निवडक पद्यरचनांचा समावेश करण्यात आला आहे. प्रत्येक रचनेच्या तळाला, ती कोणत्या संग्रहातून निवडली आहे आणि तो संग्रह कोणत्या साली प्रकाशित झाला आहे, त्याची नोंद दिलेली आहे. त्याचप्रमाणे गीतांच्या तळाला त्याचे गायक आणि संगीतकार यांची नावे दिलेली आहेत. संग्रहाचा ताल आणि तोल कायम राहावा म्हणून गजल, कविता आणि गीत अशी तीन भागात संग्रहाची मांडणी केलेली आहे. काही अप्रकाशित 'शब्दशलाकां'चाही यात समावेश आहे. अर्थातच यात गजलांची संख्या अधिक आहे, आणि त्या साऱ्याच वाचकाला भावतील, अशाच आहेत. डबीर आणि डॉ. पंडित यांचा पिंड गजलकारांचा असल्याने त्यांनी हे झुकते माप गजलच्या पारड्यात टाकलेले असावे. परंतु एकूण मांडणी पाहता, कवीची समग्र सृजनक्षमता अधोरेखित करण्याचा उद्देश संपादन करताना नजरेसमोर ठेवलेला यातून दिसून येतो.

**छांदस : सदानंद डबीर**

संपादन : डॉ. राम पंडित




डबीरांच्या काव्यात गेयता आहे, वाचकाला भुरळ पडावी अशी शब्दरचना, कल्पनांचा आविष्कार आहे, तशी काळजाचा पटकन ठाव घेण्याची उत्कटता आहे. सावल्या या गजलमधला हा एक शेर,

सांजयात्रेला निघाल्या लांबणाऱ्या सावल्या
थांबलेल्या माणसांच्या हालणाऱ्या सावल्या.

एकूण रचनांचा वेध घेतला तर त्यात कुठे उदास, निराशा वा कवटाळलेले दुःख यांच्या अंधारलेल्या घागरींचे सागर केलेले दिसून येत नाहीत. उलट जगण्यातली उत्कटता, आनंद यासारख्या हृदयात सूर्य ठेवणाऱ्या आशादायी प्रकाशाचे वर्णन करतात,

अंधारलेल्या मनाला सांगायला हवे
हृदयात सूर्य आता ठेवून बघ जरा.

कवी जणू वाचकांशी संवाद करीत आहेत, अशा तऱ्हेने मनातले गुपित उघड करतात,

मी उन्हाचे शब्द केले सावल्यांचे सूर केले
गीत माझे गाउनी मी दुःख माझे दूर केले

'छांदस': 'लालित्यपूर्ण काव्ययात्रा' असे या संग्रहाचे नामकरण डॉ. पंडित यांनी केलेले आहे, ते सार्थ असल्याचा आनंद हा संग्रह देतो. तळातून ध्वनिलहरींसारखा उचंबळत येणारा मुखपृष्ठावरील रंगांचा अलवारपणा संगीतकार मिलिंद जोशी यांनी सुंदरपणे साकारला आहे.

**मूल्य २०० रु. • सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

तरल, निखळ आणि सहजसुंदर आविष्काराचे रूप कसे असू शकते, त्याचे उदाहरण म्हणून दाखवायचे झाले तर 'राधेचा पाऊस' या अरुण शेवते यांच्या कवितासंग्रहाचे नाव पुढे करता येईल. प्रीतीचा अलवार हुंकार, स्नेहाची आर्द्र रिमझिम, मैत्रीचा अतूट धागा आणि मनामनात कोसळणारा पाऊस, साद घालणारा निसर्ग, पानाफुलांची जवळीक, अशा कितीतरी जाणिवांचे, भावनांचे, वास्तवाचे, अस्तित्वाचे पडसाद कवितांच्या ओळींतून उमटत जातात आणि त्या वाचत असताना आपल्याच मनात त्यांच्या अंकुरांचे हुंकार सजग होऊ लागतात. हा पाऊस राधेचा नसून प्रत्येकाच्या मनातला पाऊस होतो. 'ज्याच्या मनात असते राधा, पाऊस कुठेही भेटतो त्यांना.'




अरुण शेवते यांची ओळख, 'ऋतुरंग' पलीकडे गेलेली आहे. रसिकमान्यतेची मोहर उमटलेल्या कवितांचे पंधरा संग्रह त्यांच्या नावावर आहेत. मालिका – कविता या काव्यप्रकारावर स्वतःची मुद्रा कोरलेल्या या कवीचा 'राधेचा पाऊस' हा संग्रह त्यापैकी दहावा आहे. सुप्रसिद्ध साहित्यिका विजया राजाध्यक्षांची या संग्रहाला प्रस्तावना लाभली आहे. त्या नमूद करतात, 'मराठी मालिका–कवितांना थोडीफार परंपरा आहेच, पण तुम्ही या रूपबंधाला दशकपूर्तीपर्यंत अधिक सश्रद्ध करत गेला आहात.' स्वतः शेवते या विषयी लिहितात, 'मालिका कवितेचं रूप माझ्या मनात असतं. फुलपाखरू जसं आपल्याबरोबर रंग घेऊन फिरत असतं, तसं मनाचं फुलपाखरूही रंगात न्हाहत असतं. एका कवितेने दुसऱ्या कवितेशी साधलेला संवाद असतो. एक कविता दुसऱ्या कवितेला हाक मारत असते.' आणि आपण या कविता वाचत असताना तोच अनुभव येतो. एक कविता पूर्ण होत असताना ती दुसऱ्या कवितेचा हात हाती घेते, हातात हात घेत साखळी केलेल्या मुलींसारखी. त्यामुळे या कवितांना शीर्षक नाहीत, अनुक्रमणिका नाही. आहे ती कविता, पावसाची कविता, राधेच्या पावसाची कविता. पाऊस, अनेक रूपात भेटलेला पाऊस, पावसात चिंब होणे, त्याचे गात्रागात्रात उतरणे, प्रवाह, समुद्र, पावसात उभी असणारी झाडे, झाडांवर असलेले पक्षी, पक्ष्यांची घरटी, छत्री, रात्र, मृगनक्षत्र, अशी ही मालिका आणि त्यात स्वतःचे चिंब होणे. किती तरल, किती हळूवार!

'राधेचा पाऊस कवीला हिंडून आणतो सगळीकडे. तो वेडावून टाकतो. दिवसाचं सारं विसरायला लावणारा रात्रीचा पाऊस कवीला आवडतो, कुशीत घेऊन बसलेला. राधेच्या पावसाला कधीच अंत नाही. परंतु हा राधेचा पाऊस सगळ्यांच्या नशिबात नसतो. तो असतो, ज्याच्या कपाळावर मोरपिसाची जन्मखूण असलेल्याच्या नशिबात. मात्र...असेही आहे, ज्यांच्या मनात असते राधा, पाऊस कुठेही भेटतो त्यांना.

'छत्री मिटून राहते घराच्या कोनाड्यात शिंपल्यात मोती असावा तशी.' 'छत्रीला न्हाणं येतं.. वर्षभर ती कुमारिकाच असते.. अल्लड अल्लड..' तशीच दुसरी सुंदर कल्पना पहा, ' पाऊस लपतो झाडाच्या कुशीत. फांद्या, पानं, फुलं पावासाची ओटी भरतात. पाऊस सवाष्ण असतो झाडांसाठी...' आणि प्रखर वास्तवाची जाणीव कवी करून देतात, ' पाऊस थांबल्यावर आपणही थांबतो, मृत्युपत्र लिहायला त्याच दिवशी सुरुवात होते.'

राधा आणि पाऊस, पाऊस आणि राधा, राधा आणि कवी, कवी आणि पाऊस. असा हा सुंदर मिलाफ आहे. त्यातली तरलता मोहवून टाकणारी आहे. त्यातल्या हळूवार कल्पना आनंदाच्या सरी कोसळवणाऱ्या आहेत. राधा स्वतः पावसात भिजायला जात नाही, कृष्णच तिच्यासाठी पाऊस आहे, किती मनोरम कल्पना! पाऊस येणार हे पाखरांना अगोदर कळते. कारण त्यांच्यातले नातेच तसे असते. मनातल्या कविता राधेच्या होतात, राधा कविता होते या नात्यासारखे. यातला भाव किती परिचित किती अपरिचित, ही नाजूक वीण वाचून झाल्यावरही मनापासून दूर होत नाही. कवी म्हणतात, 'राधा, राधिका, राधे..तिची सगळी नावं मी गोंदवून घेतली स्वप्नात माझ्या.' कवितासंग्रह वाचून झाल्यानंतर वाचक म्हणून आपलीही तशीच अवस्था होते, राधा आणि तिचा पाऊस आपल्या मनावर गोंदला गेला आहे, असे वाटत राहते.

या संग्रहाला कवी गुलजार यांच्या शाबासकीचा पाऊस लाभलेला आहे. या संग्रहाचा लेखनप्रवास अवघ्या वीस दिवसांचा आहे. यावरून लक्षात यावे, कवी राधेच्या पावसात किती चिंब ओंथबून गेलेले आहेत. हेच ओथंबणे आणि मनाचा विभोर झालेला मोर मुखपृष्ठावर नाचतो आहे. हळव्या रंगातले सतीश भावसारांचे हे मुखपृष्ठ मनाला चिंब करणारे आहे.

**मूल्य ८० रु. ● सवलतीत ५० रु.**

# ग्रंथपान

आरस्पानी चित्राचे खुलणारे रंग पाहिले की नजर समाधानाच्या रंगात चिंब होते. येणाऱ्या सरी जशा निरागस तसा त्यांना झेलण्याचा सोहळाही निरागसच. चिंब होताना जणू आपणच आरस्पानी होत जातो. तसा अनुभव एखादं लेखन वाचत असताना येतो, क्वचितच. तो अनुभव देणारे लेखन खूप दिवसांनी हातात आले, ते म्हणजे उषा मेहता यांचा कवितासंग्रह, 'काटेसावर'. काय आहे ही काटेसावर? 'अशीही येते कविता, जशी दुःखितांच्या ह्दयातील शलाका, आणि कधी येते बोचकारत, काटेरी फांदी जणू ओरबाडते, फाडतेही दांभिकांचे मुखवटे, आणि मग हीच बया फुलवते क्रांतीचा अंगार...'




या संग्रहाला विजया राजाध्यक्ष यांची मर्मग्राही प्रस्तावना लाभलेली आहे. कवितेविषयी किती कसदारपणे सांगता येते, तेही मोजक्या शब्दात, याचे उदाहरण म्हणजे ही प्रस्तावना. ती वाचून झाल्यानंतर एक स्तब्धता येते, गुहेत शिरण्यापूर्वी जाणवते तशी. आत प्रवेश केल्यानंतर मात्र जाणवते, ही तर लेणी आहेत, इसवीसनापूर्वी निर्माण झालेली, दररोज याच वाटेवरून प्रवास करूनही आपल्याला अज्ञात राहिलेली. होय, तसेच म्हणावे लागेल. आज आपल्याभोवतीचे एकूण वातावरण आणि परिस्थितीचे अवलोकन करा, डोळे उघडे ठेवून, पुढे पाऊल टाकण्याची हिंमत होणार नाही, मन संवेदनाक्षम असेल तर. क्रूर, भयप्रद, हिंसाचारी, ओरबाडणारे, मूल्यांचे विघटन करणारे, संवेदना हरवलेले, असे भयानक वातावरण. ज्याकडे पाहणे कुणाला शक्य आहे? फुटपाथवर उद्ध्वस्त होऊन बसलेली बाई माझी कोण लागते? असा प्रश्न कवयित्री उपस्थित करीत नाहीत, आपल्या बोथट संवेदनांचे फक्त एक टोक उघड करून दाखवतात. दुःखाह्नबिःखी या कवितेत कवयित्री म्हणतात, 'नजरच मारली प्रयत्नपूर्वक की झालं मग!' ए चाईल्ड गिव्हज बर्थ टू मदर या कवितेत त्या म्हणतात, 'चालू लागतात आया पुन्हा बाया बनून अगतिकतेच्या रस्त्यावरून.' यातून या भेसूर अगतिकतेचे दर्शन होते. परंतु त्याचवेळी यावर उपाय काय, याचे उत्तर त्या मी घाबरते दुःखाना, या कवितेतून देतात, 'काढीनही मी माझा नख्या पंजाबाहेर, चवताळलेल्या मांजरीसारखी खेळवीन असल्या हलकटांना, कुरतडणारे उंदीर मेले, प्राणांतिक जखमा करीन त्यांच्या नरड्यांना...' हे केवळ बाईपणाचे स्त्रीवादी लेखन नाही. वास्तववादी लेखन आहे. जगण्याचं चिंध्या उडवणारं वास्तव, सिमेंटच्या असह्य धुळीसारखं भुळभुळत आंधळं करत जाणारं वास्तव.

संग्रहातील कवितांचा एकूण आवाका पाहिला तर तो खूप मोठा आहे. निराशेला गाडून टाकणारा आशावाद आहे. कसेही वाहत गेलो तरी कुठेतरी किनारा लागेल याचा विश्वास आहे. सिग्नल तोडणाऱ्याला अडवणारा सभ्यपणा आहे. जीवन संपवू पाहणाऱ्यांना नंदनवनात उतरवणारी गाडी आहे. रडून तरी काय होतं? गाण्यातून जगण फुलतं, हे आश्वासन आहे. अनेक कवितांमधून हुबेहूब चित्र कॅनव्हासवर उतरवली आहेत. हे चित्र मानवाचे, मनाचे, क्रूरतेचे, निसर्गाचे, दिसणाऱ्या दृष्याचे, भयाचे, सतारियाचे, ज्येष्ठांचे, समुद्र किनारी आलेल्या आमेन या मृत बालकाचे. आणि माधव मनोहर यांच्यासोबत केलेल्या भ्रमणाचे. 'सुमधुर किलबिलाट, बहुतेक, फांद्याफाद्यांवर मंगेशकर भावंडं गप्पा मारायला आलेली!' कवितेविषयी आहे, लिखानाविषयी आहे, स्वःच स्वतःशी केलेला संवाद आहे. भास– आभासाचे अनुभव आहेत. त्यामुळे या सगळ्या कविता लिहिल्या आहेत, असे वाटण्याऐवजी त्या अनुभवल्या आहेत, त्यांच्या भावना, संवेदना आणि एकूण मनाच्या व्यापाराशी त्या एकरूप झालेल्या आहेत. त्या आपल्यासमोर जशाच्या तशा उभ्या राहतात. त्यामुळेच त्या केवळ कवयित्रीच्या न राहता, आपल्या होतात. आपणही कधी हे सारे अनुभवले आहे, पाहिले आहे, त्या स्मृती जाग्या होतात. आणि हेही जाणवते, त्यावेळी आपण इतके बधीर का होतो?

या कवितांमध्ये काही अप्रूप वाटावीत अशा शब्दकळांची गुंफण झालेली आहे, नक्षीदार वेलबुट्टीवर चांदण्याची फुले उमलावीत तशी. 'शोषणभुक्त, खिल्लीदार,' 'शून्यभकास डोळ्यांची', 'चिरफाळलेल्या जमिनीवर', 'हळदिवं ऊन', 'ओला शुभ्रगार अंधार', 'काळगंगेतून बाहेर'. हा उषा मेहतांचा सहावा कवितासंग्रह. वाचक याचे नक्कीच स्वागत करतील. या संग्रहाचे मुखपृष्ठ हे काटेसावरचेच आहे. त्यातला अंगावर काटा आणणारा काटेरीपणा ठळकपणे लक्षात येतो. त्यावरील उमललेली फूले निसर्गाकडे, कोमलतेकडे घेऊन जाणारी आहेत. त्यामुळे संग्रहाचे शीर्षक आणि त्यासाठी चितारलेले चित्र आतल्या आशयाचे प्रतिबिंब म्हणता येईल. आत कवितांना अनुरूप अशी रेखाटने आहेत. हीसुद्धा कवितेच्या आशयाला उठाव देतात, गीताला संगीत उठाव देते तशी. त्यासाठी मिलिंद मुळीक यांचे अभिनंदन!

**मूल्य १२५ रु. ● सवलतीत ७५ रु.**

## ग्रंथपान

‘जाडजूड पुस्तकांखाली लांब लांब भाषणात काहीतरी हरवतंय- संपतंय.

पुराव्याचं कलेवर हातात घेऊन भोकड पसरणाऱ्या मला हे सर्व चुकून

‘ऑनरेबल’ ‘ऑनरेबल’ का म्हणतोहत?
‘डिसेबल’ ‘अनेबल ’ असताना!’

शहाण्या माणसाने न्यायालयाची पायरी चढू नये म्हणतात. ही सूचना अनुभवावर आधारित असलेली. ही सूचना केवळ पक्षकारांसाठी नसून ती अवघ्या सुज्ञांसाठी लागू आहे, अगदी न्यायाधीश महोदयांपर्यंत, असे म्हटले तर ते अन्याय्य होणार नाही. न्यायालयाच्या दगडी भिंतीशी जोडलेले ‘न्याय’ नावाचे नाते किती निष्ठूर असते, दगडासारखे, हे कळण्यासाठी फार शहाणे असण्याची गरज नाही. अशा दगडांच्यासोबत आलेले सगळेच दगड नसतात, हेही तितकेच सत्य. अन्यथा न्यायदानाचे पवित्र दान हाती असलेल्या व्यक्तीला आपण कुठल्या सिंहासनावर आहोत, मस्तकावर धारण केलेला मुकुट कसा आभूषित आहे, याचे भान इतरांना करून देण्याची आवश्यकता भासती ना.




मृदुला भाटकर, न्यायमूर्ती यांचा ‘कविता मनातल्या कविता कोर्टातल्या’ हा कवितासंग्रह नुकताच ग्रंथालीच्या वतीने प्रकाशित झालेला. तसा आकाराने लहानसा. सहज म्हणून वाचायला घेतला. साधारणपणे कविता मनाची सगळी स्पंदनेच टिपत असते, व्यक्त करीत असते. मग मनातल्या कविता, हा काय प्रकार आहे, तसेच कोर्ट हा विषय कवितांमधून कसा अवतरला असेल, कावळ्याच्या घरट्यातून कोकिळीची बाळे जन्माला यावीत तशी, हे कुतूहल यापाठी होते. कवितासंग्रहाची विभागणी शीर्षकाप्रमाणे दोन भागात केलेली आहे. त्यामुळे सरमिसळीला वाव राहिला नाही, हे बरे वाटले. काही कविता तशा लहान लहान. एक भाव टिपणाऱ्या. परंतु सगळ्या भावनेला कवेत घेणाऱ्या. हेमिंग्वेच्या सहा शब्दांची कथा, या प्रकाराचे स्मरण करून देणाऱ्या. आठवण, सोप्पं, डोळेभेट, संकेत, बंद, बाळमूठ या कविता या कुळातल्या म्हणता येतील. वाचकाला स्वतःच्या अनुभवांचे शालूशेले उलगडायला लावणाऱ्या. हळूवार आणि तितक्याच अलवार. कविता वाचत गेलो, नाही, अनुभवत गेलो. मनांच्या कवितांमधून एकेक स्पंदन अलगद असे अवतरत आले, किरणांची कोवळी पाखरे अंगणात यावीत, कवडसे टिपीत तसे. नकळत त्यांच्या नितळ कोवळेपणाशी एकरूप होत गेलो. संकेत या कवितेत ‘जशी दिवसाला रातीची शपथ होती, असण्याला तुझ्या नसण्याची माझ्या आण होती!’ ‘प्रेम’ या कवितेत ‘मन उभं जळतं कुठे? प्रेमाचं फूल सुकतं तिथे.’ साथ कवितेत ‘दिसल्या चेहऱ्यावर तुझ्या खुणा हद्दपारीच्या माझ्या, दुःख संपण्याचे नव्हते नाकारल्याचा घाव मोठा!’ ‘आई’ या कवितेत ‘वहीत पिंपळपान जपताना वहीच होते पिंपळपान!’ ‘बाळमूठ’ कवितेत ‘तुझ्या मुठीत डोकावलं तेव्हा सारं जग दिसलं!’ या अशा तरल आणि जाणिवाचे भावविश्व जाग्या करणाऱ्या पारदर्शी ओळी नकळत आपला ठाव घेत जातात. एकटेपणाचे असह्य होणारे घाव, नोटेच्या नौकेत विहार करणारे सुखाचे इमले, मरताना एक सुईदेखील घेऊन जाता येत नाही सोबत, तरी माणसाचा चाललेला हव्यासाचा क्रूरपणा, दांभिकपणा, वास्तवाचे सुटत चाललेले भान, अपेक्षा. या साऱ्या कल्पना केवळ स्वतःपुरत्या मर्यादित नाहीत. भोवतालचे जगणे, माणसाचे हरवत चाललेले माणूसपण, आशा-निराशेचा खेळ कवयित्रीने मनाच्या कवितांमधून वाचकांच्या समोर उलगडला आहे.

कोर्ट म्हटले की पक्षकार, वकील, साक्षीदार, न्यायाधीश, पट्टेवाला, पुरावे , कागदांचे गाठोडे, हे सर्वांना परिचित असलेले वातावरण. परंतु कवयित्री केवळ यांचे वर्णन करीत नाही, तर यांच्याआड दबलेली घुसमट, सत्यासाठी चाललेली धडपड, काळेकोट आणि पुराव्यांचे ओझे यांच्यातून झडणाऱ्या निरर्थक फैरी, तटस्थपणा, अपराधीपण, त्यांच्या संवेदनक्षम मनाला सतत सल देणारा भाव त्या व्यक्त करतात. साक्षीदार या कवितेत साक्षीदारांच्या ओठांचे निरीक्षण अस्वस्थ करणारे आहे. पुरावा या कवितेतील ‘श्री. पूर्वग्रह अन सौ. सहानुभूती’ हे सत्य न पचवता येणारे आहे. तारीख या कवितेतील वारंवार पडणाऱ्या तारखा म्हणजे ‘मी वाट पाहतो, ती वाट पाहते, सर्वजण वाट पाहतात. आजचा खेळ उद्या पुन्हा ..’ किती जीवघेणा असतो हा प्रवास? कागद हा सगळ्यात महत्त्वाचा दस्तऐवज. ‘कोर्ट बी कागूद अन न्याव बी कागूदच!’ हे सारं उघड्या डोळ्यांनी पाहत असलेले न्यायाधीश शेवटी हताशपणा व्यक्त करतात, ‘या प्रचंड कागदालयाखाली दबून दबून शोकगीत गात डिस्पोझलचं, बासष्टाव्या वर्षी एक प्रेत बाहेर येतंय न्यायमूर्तीचं, एक ‘ऑनरेबल डेडबॉडी’! थक्कच झालो. न्यायदान करणारा हाही शेवटी माणूस आहे. त्यालाही भावभावना, संवेदना असतात, याचा अनुभव देणारा हा संग्रह आहे. दगडीभिंतींच्या आड हळवा प्रवाह दडलेला आहे, कातळातून वाहणाऱ्या निर्झरासारखा. न्यायदानाचे प्रतीक असलेली ताजव्यांची श्यामल प्रतिकृती, तिला व्यक्त करणारी मऊ धवल पीसकलम, हळव्या मनाची नाजूक पुष्पे, यातून साकारलेले निलेश जाधव यांचे मुखपृष्ठ उत्तम. तशीच औचित्यपूर्ण रेखाटणे!

**मूल्य ६० रु. ● सवलतीत ३५ रु.**

# ग्रंथपान

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३

इंदिरेची स्मृतिकथा
इंदिराबाई वाडीकर



जगण्याविषयीच्या प्रत्येकाच्या कल्पना वेगवेगळ्या असू शकतात. पण, एक मुलगी आपल्या भावी संसाराविषयी जे चित्र कल्पनेने मनाशी रंगवते, ते कसे असेल, याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात असते. तिने केलेला संसार तिच्या कल्पनेप्रमाणेच होता का, ती त्याला कशी सामोरी गेली, जर कल्पनेप्रमाणे नसेल तर, त्या परिस्थितीत तिच्या वाट्याला जे आलेले ते सगळे सुसह्य होते का याचीही उत्कंठा सहज मनात निर्माण होते. इंदिराबाई वाडीकर यांचे 'इंदिरेची स्मृतिकथा' हे पुस्तक हातात आले तेव्हा मनात ही उत्कंठा नक्कीच होती. लक्ष्मीबाई टिळकांचे 'स्मृतिचित्रे' हे या उत्कंठेला कारण. त्या पुस्तकाचे सर्वांनीच चांगल्याप्रकारे स्वागत केले होते. काशीबाई कानिटकर, शीलवतीबाई केतकर, राधाबाई आपटे, कमलाताई काकोडकर अशा अनेकांची आत्मकथने वाचनात आली. त्यात अपेक्षांच्या ऊनसावलीचा तपशील आलेले आहेत. त्यांच्याशी तुलना म्हणून नव्हे, तर एक उत्सुकता म्हणून या पुस्तकाकडे पाहताना 'ती' मनात आपोआप उभी राहिली.

इंदिराबाईंचा एकूण कालखंड पाहिला, तर त्याचे दोन भाग होतात. एक स्वातंत्र्यपूर्व, दुसरा स्वातंत्र्योत्तर. इंदिराबाईंचा जन्म १९१० सालचा. त्यावरून ही कल्पना यावी. त्यामुळे मनात असूनही इंदिराबाईंना सहावीच्या पलीकडे जाता आले नाही. 'अग्गोबाई! ती मुलगी वाह्यात झाली. पुरुषांच्या बरोबरीने शिकायला लागली. तिला पुरुषांच्याबरोबर बोलायला काहीसुद्धा वाटत नाही. उगाच शिकून रंग-ढंग कशाला पाहिजेत?' मध्यमवर्गीयांची ही त्यावेळेची मानसिकता. शारदा बिल पास झालेले असल्यामुळे इंदिराबाईंचे लग्न झाले तेव्हा त्या होत्या अवघ्या पंधरा वर्षांच्या. लग्नाच्या वेळी मुलीचे वय चौदा पूर्ण झालेले असावे, ही अट या बिलामुळे आली होती. काहीही समज नसलेले मन, आणि कुठलीही जबाबदारी पेलण्यास समर्थ नसलेले शरीर. परंतु चालत आलेल्या रूढी आणि परंपरा. त्यांच्यापुढे मान तुकविणे आलेच. इंदिराबाईंना या दोन्ही अडसरांना ओलांडून जाण्याचे स्वातंत्र्य नव्हते.

इंदिराबाईंनी गरिबीतही आनंद मानला. 'स्वतःच्या' शिक्षणात साथ दिली. शिक्षणक्षेत्रातल्या कार्यात साथ दिली. आपला आनंदी स्वभाव, माहेरच्या संस्कारांनी संस्कारित झालेले मन, सासरकडे असलेले संस्कार, समाजाची जाण, आसपासची माणसे ओळखण्याची कला, प्रसंग पाहून वागण्याचे उपजत गुण, यामुळे संसार केला तो नेटका. आनंदाचा. समाधानाचा. यात चढउतार आले नाहीत असे नाही. परंतु त्यांचा कधी बाऊ केला नाही. आपले उणेपण दिसू दिले नाही. त्यामुळे चारचौघांत आपलेपण मिळाले. पती, मुले यांच्या सुखदुःखात, शिक्षणात, शाळेच्या स्थापनेत आपला आनंद मानला. गांधींजीनी चळवळ सुरू केली तेव्हा या स्वातंत्र्याच्या चळवळीत आपलाही सहभाग असावा म्हणून सूतकताई केली. स्वावलंबनाच्या कार्यात सहभाग घेतला. महिलांच्या सक्षमीकरणात भाग घेतला. सेवादलाचे काम पाहिले. मनाने घेतले तेव्हा, मनासारखेही वागून घेतले. कुणी त्यासाठी बोल लावण्याचा प्रयत्न केला तेव्हा धीटपणे सुनावले देखील, 'मला नावे ठेवू नका. मी काही वाईट कृत्याला गेले नव्हते. व्याख्यानाला किंवा गायनाला जाणे म्हणजे माझ्या मते वाईट काही नाही. मी गुन्हा केला नाही, की सिनेमाला गेले नाही. चांगले ज्ञान मिळवायला गेले होते. तेवढेच चांगले शब्द कानावर पडतील.'

धीटपणा इतकाच नाही, तर मागे लागलेल्या तरूणावर दगड फेकून आपला निषेध व्यक्त केला. तरुण विधवेला, पुन्हा लग्न करण्याविषयी सुचविले. मुलाला त्रास देणाऱ्या मुलाला भर रस्त्यात समजावले. 'स्वतः' चारचौघात मोठ्याने बोलणे केले, तर त्याविषयी घरी आल्यानंतर स्पष्टपणे मन मोकळे केले.

संसारिक स्त्री म्हणून जे जे अनुभव वाट्याला आले, त्यांचे टिपण इंदिराबाईंनी करून ठेवलेले आहे. माहेर, सासर, त्यातील व्यक्तिरेखा, त्यांचे संस्कार, आजूबाजूचा समाज, शेजारी, बदल्या, शिक्षण, स्वातंत्र्याची चळवळ, कुटुंब, वैयक्तिक आयुष्य, या सगळ्यांची ही टिपणे आहेत. प्रत्येकाला क्रमांक, शीर्षक आणि त्याच्या जोडीला सन दिलेले आहेत. त्यामुळे त्या त्या काळाचे भान स्पष्ट होते. लेखन आठवणींच्या स्वरूपातील आहे, परंतु त्यात व्यक्त झालेले विचार संस्कार आणि निकोप मनाचा साज ल्यायलेले आहेत. त्यात खोटेपणा, अहंकार नसून समाजमनाला समजून त्याप्रमाणे चालण्याचे अधिष्ठान आहे. जे जसे दिसले, भावले त्याचे चित्रण केले आहे. त्यांना आपल्या विचारांची किनार आहे. इतरांना समजून घेण्याची वृत्ती आहे. या लेखनाला स्वतःची अशी गती प्राप्त झाली आहे.

सदरच्या पुस्तकासाठी डॉ. अरुणा ढेरे आणि डॉ. नीलिमा गुंडी यांचे साक्षेपी परिशीलन लाभले आहे. त्यांनी या लेखनाचे रूप ठळकपणे मांडले आहे. शिवाय इंदिराबाईंच्या लेखनानंतरचा कालखंड दर्शविणारी दोन परिशिष्टे दिलेली आहेत. हे लेखन प्रकाशात आणणारे त्यांचे चिरंजीव अशोक वाडीकर यांचे मनोगत तर या आत्मकथनाचाच एक भाग वाटावा, इतके हृद्य आहे.

आत्मकथन वा स्मृतिकथा स्वरूपात आलेले लेखन हे भूतकाळाचे वर्तमानकाळात दिसणारे प्रतिबिंब असते. त्यात साकारलेला स्मृतीचा पक्षी जणू आपलेच रूप काळाच्या दर्पणात न्याहाळीत असतो. सतीश भावसार यांनी तोच स्मृतीगंधाचा भाव मुखपृष्ठावर चितारला आहे.

**मूल्य १८० रु. ● सवलतीत ११० रु.**

# ग्रंथपान

## ओळख सियाचेनची
अनुराधा गोरे



सियाचेन याचा अर्थ : जिथे गुलाब फुलतात ती जागा.

सियाचेन हा शब्द अनेकदा वाचनात आला तो चीनच्या घुसखोरीच्या संदर्भात आणि पाकिस्तानच्या अनाठायी औदार्याच्या कृष्णकृत्यामुळे. कारगीलचे युद्ध हा त्याचा अलिकडचा पुरावा. प्रत्यक्षात हा भाग किती दुर्गम आहे आणि तेथील भौगोलिक परिस्थिती किती बिकट आहे, याबाबतची आपली माहिती जुजबी वार्तांकनाच्या पलीकडची नाही. प्रत्यक्ष आमचे सैनिक जीवावर उदार होऊन आपल्या सीमा रक्षणाचे कर्तव्य किती खडतरपणे पार पाडीत आहेत, हे वास्तवदेखील आपल्यासाठी बरेच अपिचित असेच आहे. त्याचे कारण तेथे प्रत्यक्ष जाऊन पाहून आलेला आपल्या परिचयाचा नाही. त्यासंबंधात केलेले परिपूर्ण लेखन आपल्या वाचनात नाही. ज्यांनी काही खास निमित्ताने वा खास अभ्यासाची बाब म्हणून वाचले असावे अशांची संख्याही अपवादात्मक धरली तरी ती फार असेल असे संभवत नाही. त्यामुळे अनेक संदर्भ, वास्तवापासून आपण एक जागरूक नागरिक म्हणून दूर राहिलो आहोत ही मोठी उणीव म्हणायला हवी. देशाचा भूगोल प्रत्येकाला माहिति असायलाच हवा. तसा तो नसेल तर त्याची निर्भर्त्सना करण्याची जबाबदारी इतिहासाकडे येते. परंतु तशी वेळ येऊ नये, असे पुस्तक अनुराधा गोरे यांनी आपल्या हाती दिले आहे. त्याचे नाव आहे, 'ओळख सियाचेनची, जगातील सर्वात जास्त उंच, थंड व कठीण युद्धभूमी'.

आपल्या ज्ञानाला दुस्तर वाटावा असा माहितीचा पर्वत पिंजून या ग्रंथात ग्रंथित करण्याचे मोठे काम अनुराधा गोरे यांनी केले आहे. हा ग्रंथ म्हणजे केवळ भौगोलिक माहिती देतो, असे नाही. ती देणे हा तर उद्देश आहेच. परंतु त्यामागे दडलेला इतिहास किती कठोर आणि संभ्रमित करणारा आहे, त्याचीही पाने त्यांनी उलगडून आपल्यासमोर ठेवली आहेत. त्यातून कितीतरी ज्ञात-अज्ञात घटनांचे संदर्भ उलगडत जातात. आणि त्या वाचत असताना आपण अचंबित होत जातो. त्या सर्व संदर्भाच्या अनुषंगाने निखालसपणे सांगता येईल, असे मराठीतील या विषयावरील हे पहिलेच पुस्तक आहे. लेखिकाही त्याला दुजोरा देतात.

या पुस्तकाची मांडणी तीन विभागात केलेली आहे. पहिला भाग हा पूर्वइतिहास आणि भूगोलाचा आहे. त्याची सुरुवात इ.स. ११४८ पासून होते. काश्मीर, भोवतीचा हिमालय, त्याचे खोरे, त्याची हद्द, खिंडी, नद्या, प्रदेश, प्रदेशाची नावे, त्याकाळात होऊन गेलेले राज्यकर्ते यांची माहिती यात येते. यात महत्त्वाचा प्रदेश आहे तो सियाचेन. त्याची ओळख, जो सियाचेन ग्लेशियर नावाने ओळखला जातो. हिमनद, दऱ्या, पर्वतशिखरे, रांगा, नद्या आणि बर्फ याचा समुच्चय म्हणजे सियाचेन. परंतु यालाच जोडून असलेला मोठा प्रदेश, लाखो चौरस किलोमीटरचा, जो लेह, लडाख, कारगील, अक्साई चीन, अशा नांवांनी ओळखला जातो, त्यांची माहिती वाचत असताना आपण गोठून जातो.

दुसरा भाग आहे, सियाचेन सीमेवर आलं कसं आणि तिथे खेळल्या गेलेल्या लढाया. सियाचेनच्या शोधाचे टप्पे, याविषयीचा. अगोदर येऊन गेलेली आक्रमणे, काश्मीरमध्ये होऊन गेलेले राज्यकर्ते आणि काश्मीर, तो भारताचा भाग होण्यापूर्वी आणि नंतरचा, त्यातले राजकारण, असा मोठा इतिहास यात येतो. चीन आणि पाकिस्तान या राहू-केतूमुळे हा प्रदेश कायम कसा धगधगत राहिला, ते स्पष्टपणे दाखवले आहे. पाकिस्तानने हा भाग बळकावण्यासाठी अनेकदा केलेले प्रयत्न, त्याला प्रत्युत्तर देताना भारतीय सैनिकांनी दाखविलेले अचाट साहस आणि मिळविलेले विजय, हे सारे यात येते, अगदी कारगील युद्धापर्यंतचा सगळा तपशील. त्यात चीनने केलेली आक्रमणे. त्यांनी गिळंकृत केलेले तिबेट, अक्साई चीनवरील ताबा, काराकोरम भागात वाढविलेली वाहतूक आणि सीमारेषेला घातलेली मर्यादा. १९६२चे युद्ध, त्यानंतरची खेळी. आपण केलेले आंतरराष्ट्रीय करार, पंचशील करार, सिमला करार. यात आपण दाखविलेला बोटचेपेपणा आणि केलेला अक्षम्य अविवेकीपणा, या सगळ्यांचा तपशील यात आलेला आहे. आपल्या सैनिकांचे पराक्रम, दाखविलेली जिद्द ही कुणाही भारतीयास अभिमान वाटावा अशीच आहे.

तिसऱ्या भागात, प्रत्यक्ष युद्धभूमीवर राहून ज्यांनी देशाचे रक्षण केले आहे, त्या मोठ्या हुद्द्यावरील अधिकाऱ्यांचे थरारक अनुभव आहेत. आठवणींच्या गंधकोशी. हे सारे वाचत असताना संपूर्ण सियाचेन आपल्या नजरेसमोर उभा राहतो. दिलेला तपशील, इतिहास व भूगोलाचा, त्यासाठी नकाशे, फोटो यांची मदत घेतली आहे. त्यामुळे एक अवघड असलेला विषय सगळ्यांना परिचयाचा झाला आहे. हे लेखन कुठेही भावनेच्या आहारी न जाता, प्रचंड आवाका असूनही मर्यादेत सर्व सादर झाले आहे. त्यासाठी परिश्रम घेतले आहेत. प्रदेश पायाखाली घालण्याची पराकाष्ठा केली आहे. त्यामुळेच हे सकसपणे सादर झाले आहे. अशा दुर्गम ठिकाणी रक्षण करणाऱ्या सैनिकाचे औचित्य महत्त्वाचे. मुखपृष्ठ त्याचेच झाले हे उत्तम! सतीश खानविलकरांचे त्यासाठी खास कौतुक!

**मूल्य ४५० रु. ● सवलतीत २७० रु.**

# ग्रंथपान

## हृदयस्पर्शी माधवबाग

सुमेध रिसबूड वडावाला



'घाटकोपरला माझ्या क्लिनिकमध्ये सकाळी ७ ते १० या वेळेत भेटेन, हे लघु उत्तर आहे. पण ते परिपूर्ण नाही. 'माधवबाग'ची एकूण दीडशेच्यावर क्लिनिक आहेत. हॉस्पिटल वेगळी! इथल्या कोणत्याही डॉक्टरकडे गेलात, तरी तुम्ही डॉ. रोहित सानेकडेच जाल, भेटाल, हे त्याचे परिपूर्ण उत्तर आहे. म्हणजेच, चेहरा वेगळा असला तरी, माझ्याच मेंदूने निदान व उपचार करणारा डॉक्टरच तुम्हाला भेटेल.' हा आत्मविश्वास आहे डॉ. रोहित साने यांचा. ज्यांनी हे आरोग्याचे स्वतःचे आकाश निर्माण केले आहे, स्वतःच्या हिंमतीवर, कल्पकतेवर आणि परिश्रमातून. ज्यांच्या ठायी स्वतःचे जग निर्माण करण्याची क्षमता असते, त्यांच्या कृतीत आणि बोलण्यात आत्मविश्वासाचा वास असणारच. डॉ. रोहित हे त्याचे उदाहरण आहे. आणि अशा व्यक्तीला तशाच समविचारी आणि सर्वस्व झोकून देऊन काही निर्माण करण्याची जिद्द आहे, अशा सहकाऱ्याची साथ मिळाली तर जी अजोड निर्मिती होईल, तिला नुसती मान्यताच नाही, चिरंजीवित्वही प्राप्त होते, असे सहकारी आहेत किरण भिडे. या धुरंधरांनी उभे केलेले हे जग आज 'माधवबाग' या नावाने सर्वत्र मान्यता पावले आहे. त्याची ख्याती सर्वदूर पसरली आहे, नव्हे प्रत्येकाच्या हृदयात विराजमान झाले आहे. त्याची रसपूर्ण यशोगाथा आपल्या हाती आली आहे, ती 'हृदयस्पर्शी माधवबाग' या नावाने.

'माधव' अधिक 'बाग' बरोबर 'माधवबाग' अशी आहे या नावाची संधी. यातले माधव हे नाव आहे डॉ. माधव दत्तात्रय साने यांचे. ते जुन्या काळातील आयुर्वेदातील मास्टर्स डिग्री मिळवलेले निष्णात डॉक्टर, प्रख्यात आयुर्वेद औषध निर्माते आणि विद्यार्थीप्रिय प्राध्यापक होत. त्यांची आयुर्वेद उपचार पद्धती आणि त्यासाठी स्वतः केलेली औषध निर्मिती, हे संचित माधवबागेच्या मुळाशी खोलवर रूजलेले आहे.

डॉ. रोहित साने हे एमबीबीएस झालेले असूनही आपल्या वडिलांचा आयुर्वेदाचा वसा पुढे चालविण्यासाठी स्वतःला झोकून देतात. स्वतःची उपचार पद्धती शोधून काढतात, तिचा विकास करतात, ती आहे 'संपूर्ण हृदय शुद्धीकरण उपचार पद्धती.' स्नेहन, स्वेदन, हृदधारा व बस्ती ही तिची सूत्रपद्धती. यासाठी त्यांनी केलेले प्रयोग, पुढे त्याप्रमाणे करावयाची उपचार पद्धती, आहार, व्यायाम, योगासने, पंचकर्म, आदींचा काळजीपूर्वक आणि विचारांती केलेला उपयोग, ही सगळी त्यांची आणि त्यांचीच स्वतःची संशोधित प्रक्रिया आहे.

किरण भिडे हे स्वतः मॅकनिकल इंजिनिअर, एमबीए आहेत. परंतु यंत्रांशी नाते जुळण्याऐवजी ते जोडले औषध निर्मितीशी. स्वतःचा एक व्यवसाय म्हणून. ज्याची सुरुवात केली. ती 'तनुपुष्टी'पासून. नुसतीच औषध निर्मिती नाही, तर त्यासाठी क्लिनिकही सुरू केले. अविरत मेहनत, व्यवसायातला प्रामाणिकपणा, ध्येयाचे शिखर गाठण्याची जिद्द, औषधाची सर्वोत्तम गुणवत्ता, स्वतःचे इमान यावर यशाचे शिक्कामोर्तब केले. वैद्य साने आयुर्वेद लॅबचा पसारा वाढत गेला. सव्वाशेहून अधिक औषधांची निर्मिती सुरू झाली. निर्मिती, विक्री, प्रचार, सेवा अशा अनेक आघाड्यांवर स्वतः अनुभव घेतले. रुग्ण हा घटक मानून, त्याला त्याच्या जवळ सेवा सहज उपलब्ध झाली पाहिजे, हा ध्यास कायम नजरेसमोर ठेवला. त्यातून उद्योजकता सिद्ध झाली. याच ध्यासातून डॉ. रोहित व किरण ही जोडी एकाच पथावरून प्रगतीच्या टप्प्यांना पार करीत घोडदौड करू लागली. हॉस्पिटल्स, क्लिनिक, शाखा, फ्रॅंचेझी अशी साखळी उभी राहिली. माधवबाग ते महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सेस उर्फ 'हेल्थ युनिव्हर्सिटी' – असा लौकिकाचा आलेख वृद्धिंगत होत गेला.

ही यशेगाथा आहे उद्योजकता आणि आरोग्याची. सतत वेगवेगळे शोध, जिज्ञासा आणि चिकित्सा यांचा ध्यास. जे द्यायचे ते खणखणीत, चोख हा दृष्टिकोन. हे सारे या ग्रंथातून दिसून येते.

'जेत्यांचाच इतिहास लिहिला जात असेल तर 'माधवबाग'ने तो लिहायलाच हवा. कारण...आपल्यासाठी रुग्ण हाच नायक होता, आहे, राहील. आणि 'माधवबाग'मध्ये तो कायम जिंकतच आला आहे. 'माधवबाग'चा इतिहास म्हणजे 'रुग्ण' नावाच्या नायकाच्या विजयाचाही इतिहास आहे. हृद्‌रोगाविरुद्धचं युद्ध नायकानं कसं जिंकलं याचा आणि 'माधवबाग' ही त्या नायकाच्या बाजूनं कशी लढत आली, तत्पूर्वी कशी लढत आली, या पूर्णत्वाचा इतिहास आपण लिहायलाच हवा.'

सदरच्या लेखनाला लाभलेले शीर्षक : सर्वांना ठणठणीत करणारी अपूर्व उद्योगगाथा, हृदयस्पर्शी माधवबाग' सार्थ ठरवणारे डॉ. रोहित आणि किरण हे स्वतःचे अनुभव स्वतः सांगत आहेत. त्यासाठी निवेदनाची प्रथमपुरुषी पद्धती वापरली आहे. ग्रंथाचे लेखक सुमेध वडावाला आहेत परंतु त्यांनी त्यात स्वतःचे मीपण पूर्णपणे अलिप्त ठेवून नायकांच्या भूमिकेला पूरेपूर न्याय दिला आहे. लेखकासाठी ही मोठी कसोटी पाहणारी कला आहे. परंतु, स्वतः रिसबूड हे सिद्धहस्त लेखक आहेत. त्यांच्या लेखनाचा स्वतंत्र बाज आहे. त्यामुळे हा ग्रंथ उत्तमपणे वाचकांच्या हाती आला आहे.

निलेश जाधव यांनी हृदयाला तळहातांवर पेलणारे हृदयस्पर्शी मुखपृष्ट सजवलेले आहे. हृदयाला वेढा घालणाऱ्या व्याधीच्या असंख्य मुळ्या आहेत. परंतु आयुर्वेदाचे असंख्य हात पुढे आले तर त्यांचीच मुळे ही हृदयाची कवचकुंडले ठरू शकतात. हृदयाला जपण्याचे कार्य करू शकतात, हे यातून साकारलेले आहेच. परंतु अशा उपचार करणाऱ्या माधवबागेचा हा सर्वांना आपलेपणाने ठणठणीत करण्याचा विश्वास देणारा असंख्य हातांचा वृक्ष बहरात आला असून त्याची पाळेमुळे आता खोलपर्यंत रूजली आहेत, हेही यातून स्पष्ट केलेले आहे.

**मूल्य २५० रु. ● सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

'आर्त माझ्या बहु पोटी' हे पुस्तक हातात घेतले तेव्हा छाती दडपून गेली. ६०० पेक्षा अधिक पानांचे पुस्तक, बापरे! यापूर्वी दुर्दम्य, तुंबाडचे खोत, हिंदू अशा बृहतकादंबऱ्या वाचल्या होत्या. त्यांची स्मृती पुन्हा जागी करण्याचे काम या कादंबरीने केले.

'साकरंचं खाणार त्येला देव न्हाई, शासन देणार, आणि जबाबदरीचं करनार त्यो घासून मरनार!'

'वरून काटे असले तरी फणस आतून गोडच असतो. ज्याचा त्याचा दृष्टिकोन; आणि अनुभवातून आलेला असतो तो मितभाषीपणा?

'कंटाळा, आळस कधी येतो? काम आवडीचं नसलं की नि आपल्या पद्धतीनं आपल्याला ते करता नाही आलं की. पण कुठलंही काम आवडीनं करायचं, आपल्या पद्धतीनंच. पुरेपूर समाधानानं. त्याचा आनंद घेऊनच करायचं म्हटल्यावर कंटाळा यावाच कसा?'

**आर्त माझ्या बहु पोटी**

विजय शं. माळी



ही अशी अनेक वाक्ये वाचनाच्या वाटेवर भेटली, आतूरतेने उभी असल्यासारखी. ती आपला बडेजाव दाखवत नाहीत, दाखवतात ते फक्त अस्तित्व. जी परिस्थिती आणि अनुभवाच्या संघर्षातून जन्माला आली आहेत. परंतु, त्यापेक्षा वरचढ ठरते ते वास्तव. जे वास्तव, वरवर अतिशय संथ आहे, तलावाच्या पृष्ठभागाप्रमाणे, परंतु आतील कोलाहल हा त्सुनामीला लाज वाटावी असा आहे. या कोलाहलात पोहणारा आणि गूढ संथपणाला अंगावर पांघरणारा नायक आहे, उत्तम परशुराम अडसुळ.

उत्तम अडसुळ हा युवक फार्मासिस्टची परीक्षा पास झालेला आहे. मात्र नोकरी करतो ती कंपांउंडरची, सरकारी दवाखान्यातली. इथून संघर्षाला सुरुवात होते. नोकरी म्हटली की, तिच्यातले चढउतार ठरलेले असतात. तिथे तुम्ही किती हुषार आहात, तुम्ही किती चोखपणे काम करता,याला किंमत देणारा कुणी जन्माला आलेला नसतोच. आणि इमानदारी दाखवणे, हात मागे घेणे हे तर इथले नापास असल्याचे प्रमाणपत्र समजले जाते. तो सगळा अनुभव या उत्तमच्या नशिबी येणे अपरिहार्य ठरते. कारण, तो त्याच्या कामात, इमानात आणि शिस्तीला कुठे अपवाद येऊ देत नाही, दुष्काळासारखा. त्यामुळे मानहानी, अपमान, बदली, एकाच पदावर आयुष्यभर. तरीही कुरकुर नाही. कोंडमारा सहन करत राहायचे. आपली गरज, आणि दुसरा पर्याय नाही म्हणून.

एक जागा उत्तमने स्वतःला मोकळे करण्यासाठी जतन केली आहे, तिला हळूवारपणे फुलवली आहे, ती म्हणजे लेखनाची. पाण्याचे एखादे तळे वाळवंटाने जोपासावे, तशी. तिच्यात लौकिक आहे, प्रतिष्ठा आहे, मानसन्मान आहे. परंतु या क्षेत्रातले वातावरण निकोप आहे का? पदरमोड करून पायपीट करून जाणाऱ्या साहित्यिकांच्या झोळीत काही पडावे, अशी रचना असते कुठे? संमेलनापेक्षा गावातल्या लुटूपुटुंचे सत्कार हे महत्वाचे असतात. अभिजात आणि सामान्य साहित्य यातल्या सीमा ठरवण्याचे अधिकारच आता आयोजकांच्या हाती गेलेले आहे. तरीही तो आपली पताका खांद्यावर घेऊन वारी करीत राहतो, मनातले सल मनात दाबून.

सामान्य कुटुंबातील शेतकरी असलेला उत्तम हा आजच्या पिढीचा प्रतिनिधी आहे. जो घराच्या उंबरठ्यापासून ते नोकरीच्या खुर्चीपर्यंत सहन करतो ती घुसमट. प्रेम, प्रतिष्ठा,समाधान यासाठी तो आसुसलेला आहे. पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली शेतजमिनीची वाटणीही वडिलांनी नाकारावी, यासारखे दुर्दैव कोणते! चैन करावी अशी परिस्थिती उत्तमला कधी सापडली नाही. स्वार्थ, बरबटलेपण, भ्रष्टाचार, माणूसकीचा अभाव, हुजरेगिरी, मिरवणे, ज्यातून नाकासमोर चालणाऱ्या सामान्य माणसाची सुटका नाही. सुटका करायचा एकच मार्ग, यापासून स्वतःच दूर होणे. उत्तम एका टप्प्यावर स्वतःची सोडवणूक करून घेतो. अत्यंत नाईलाजाने, अपरिहार्यता समजून. ही आर्तता केवळ सामाजिक नाही, राजकीय नाही, कौटुंबिक नाही, आत्मिक देखील आहे. वणव्यासारखी जी धगधगते आहे, सर्व बाजूंनी वेढण्यासाठी धाव घेते आहे. आणि उत्तम उभा आहे मध्यभागी, तिचे सावज म्हणून.

ग्रामीण भाग, तिथे बोलली जाते ती भाषा, तिथली माणसे, त्यांचे व्यवहारी जग यांचा लेखकाने घेतलेला वेध सखोल म्हणावा, की या सगळ्याने लेखकालाच व्यापून टाकले आहे, असा प्रश्न पडावा. दुसरी बाजू नोकरशाही, शहरीपणाची. नोकरी सरकारी दवाखान्यातील. त्यामुळे, तिथले सहकारी, डॉक्टर, पेशंट, अंतर्गत रचना, त्यांची व्यावहारीक नावे, त्यांचे विश्लेषण, भाषा, सरकारी निवास व्यवस्था, व्यवस्थापनाचे स्तर असा मोठा अवकाश लेखकाने या कादंबरीतून वाचकांच्या समोर ठेवलेला आहे, अगदी हुबेहूब. वाचकाला आपल्या सोबत सहजपणे घेऊन जाण्याची शैली लेखकाने जपली आहे. तिच्यातला डौल हा पात्रागणिक स्वतंत्र आहे. त्याला त्या त्या चालीरीति आणि वागण्याच्या पद्धतीचा गंध आहे. विशेष असा की, तुकारामाच्या अभंगांचे अनेक संदर्भ लेखकाने यात दिलेले आहेत. पुस्तकाला दिलेले शीर्षक हे तुकारामाच्या अभंगावरूनच आलेले आहे.

सतीश भावसारांनी आशयघन मुखपृष्ठ साकारले आहे. शहरात गेलेल्या माणसाची ग्रामीण भागाची, आपल्या मातीची ओढ कमी होत नाही. परंतु तिथल्या माणसांना आता तो आपला वाटत नाही आणि ग्रामीण भागातून आलेला माणूस हा शहराचा कधीच असू शकत नाही. तो कायमच उपरा असतो तिथे. अशा दोन उंच कड्यांच्या दरीत तो सापडलेला असतो. हे जे तुटलेपण वाट्याला येते त्याची आर्तता वेगळीच. या मुखपृष्ठावर ती ठळकपणे उमटलेली आहे.

**मूल्य ६५० रु. ● सवलतीत ४०० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## पप्पूच्या पुड्या

प्रशांत पाठक

अनुवाद : जी.बी. देशमुख




'होमिओपॅथिक ट्रिटमेंट घेणाऱ्या पेशंट्सची तऱ्हा जरा निराळीच असते. कुणी सगळे इलाज थकल्यावर हा इलाजसुद्धा करून बघावा म्हणून असलेले असतात. कुणी आधी इकडे जाऊन बघावे आणि इकडे न जमल्यास मगच खर्चिक इलाजाकडे वळावे ह्या विचाराने आलेले असतात. काही वयस्क दर आठवड्याला विरंगुळा म्हणून कुठल्यातरी असल्या–नसल्या दुखण्याच्या निमित्ताने उपचार म्हणून ह्या उपचाराकडे येत असतात, तर काही होमिओपॅथीचे कट्टर पंथी असतात. ॲलोपॅथीच्या साइड इफेक्टच्या काही खऱ्या व काही ऐकीव कथांनी हबकलेली ही मंडळी होमिओपॅथीची होमिओपॅथ्सपेक्षा काकणभर अधिकच समर्थक असतात.' हे निरीक्षण आहे होमिओपॅथीचे डॉक्टर प्रशांत पाठक यांचे. डॉ. पाठक यांची पुण्याई थोर म्हणायला हवी. घरातच होमिओपॅथीचा दवाखाना असल्याने आणि त्याला आवश्यक असलेला लौकिक त्यांच्या आधीच्या पिढीने अगोदर गाठीशी बांधलेला असल्याने 'डॉ. पाठकांचा होमिओपॅथीचा दवाखाना' ही बिरुदावली वारसाहक्काने त्यांच्याकडे चालत आलेली, तीही थेट आजोबांपासूनची. ती सांभाळण्याचे, तिच्या सन्मानाला उणीव येण्याऐवजी तिच्या शीरपेचात सन्मानाचे पीस खोचण्याचे कौशल्य डॉ. प्रशांत यांनी प्राप्त केले, त्याचे पावित्र्य राखले. आपला वारसा जपताना आवश्यक असलेली सचोटी, संयम आणि कसब त्यांनी अंगी बाळगले. त्यामुळेच या दवाखान्याची परंपरा आणि प्रतिष्ठा कायम राहिलेली दिसून येते.

होमिओपॅथीचा डॉक्टर आणि त्यांच्या दवाखान्यात येणारे पेशंट, यांचे नाते कसे निर्माण झाले, आपसात विश्वास कसा वृद्धिंगत झाला, या निमित्ताने आलेले अनुभव उपचारापेक्षा वैयक्तिक पातळीपर्यंत कसे पोहचले, यांच्या अनुभवावरील कथन या पुस्तकात आलेले आहे. सलवार–कमीजमधील विशीतला साधेपणालाही भेदून जाणारा आकर्षक पेशंट आला तर वयाला/पेशाला न शोभणारे समाधान डॉक्टरांच्या जिवाला स्पर्शून जाते. संध्याकाळी सातला आलेला हा पेशंट दहावाजेपर्यंत थांबतो, इतरांची काळजी म्हणून आपला क्रमांक त्यांना देतो. महिन्याभराचे औषध घेण्याऐवजी आठवड्याचेच औषध घेतो. तेही तब्बल वर्षभर नियमितपणे. शेवटी भेटतो ते जोडीदारासह आशीर्वादासाठी. गूढ स्पष्ट करतो, 'इंटरकास्ट असल्याने लग्नाला घरच्यांचा तीव्र विरोध म्हणून भेटण्याचे ठिकाण हे दवाखाना होते. डॉक्टरांच्या वडिलांच्या काळापासून याच दवाखान्यातून कुटुंबातील औषधं घ्यायची प्रथा असल्याने या दवाखान्यात जायला घरच्यांचा विरोध नसायचा. हा दवाखाना नसता तर प्रेम यशस्वी झालेच नसते.' डॉ. आशीर्वाद तर देतातच पण घेतलेल्या फीच्या दुप्पट गिफ्टचे पाकीट त्यांच्या हाती ठेवतात, पेशंटने दाखविलेला विश्वास म्हणून.

कधीकाळी चिखलदऱ्याच्या वन विभागाच्या ताब्यात असलेल्या हत्तीच्या पायाला जखम झाली होती. त्यावर सगळे उपचार थकले तेव्हा शेवटी भूतदयेपोटी डॉ. प्रशांतच्या डॉ. आजोबांनी उपचार करून गजराजाला व्याधिमुक्त केले होते. पुढे मेळघाटात उन्मादाने चवताळलेल्या, हवा तसा धुमाकूळ घालणाऱ्या हत्तीने वन विभागासमोर मोठे आव्हान उभे केले. तेव्हा त्याच्यावर डॉ. प्रशांत उपचार करून त्याला शांत करतात. पाठक घराण्यातील होमिओपॅथीचा तिसऱ्या पिढीचा वारसा दाखविणारे हे उदाहरण. हा वारशाचा उगम झाला ते साल आहे १९५९. आणि डॉ. प्रशांत यांचा सुरू झालेला कालखंड आहे १९९० पासूनचा. इथे सेवक नाही, रिसेप्शनिस्ट नाही, रांगा लावण्यासाठी टोकन नाही. अमरावतीत बडनेरा रोडवर असलेला हा दवाखाना पूर्ण गर्दी असूनही स्वयंशिस्तीत निरंतर जोमाने सुरू आहे, त्यामागे असलेले कारण म्हणजे जिव्हाळा आणि विश्वास. या कालखंडात अनेक वेगवेगळे अनुभव आले, ते उपचाराइतकेच वैयक्तिक जिव्हाळ्याचे आणि विश्वासाचे.

एका नवदाम्पत्याच्या लग्नाला वर्ष उलटले तरी गुड न्यूज कानी येईना. त्यावर मूल दत्तक घेणे हा एकच उत्तम उपाय. तोच डॉ. प्रशांतनी दिला. पुढे सहा–सात वर्षांनी ते दाम्पत्य डॉ. प्रशांतच्या दवाखान्यात आले, सोबत लहान गोंडस बाळ. हे बाळ दत्तक नसून हिमालयातील तपस्व्याचा दैवी प्रसाद आहे, असे त्याच्या पित्याने आनंदाने उत्तर दिले. ही विज्ञानावर मात होती. परंतु मुलाच्या आईने डॉ. प्रशांतसमोर खुलासा केला गुपचूप, 'डॉक्टरसाहेब, बाबांनी इलाज तर केला, पण विज्ञानावर मात वगैरे काही केली नाही.' हे गुपित त्या बाईने उघड का केले असावे? असे अनेक प्रसंग आहेत, ज्यात डॉक्टरांनी केलेल्या उपचाराच्या कथा आहेत. माणसांच्या आजाराच्या, मानसिकतेच्या, वागण्याच्या आहेत. समुपदेशाच्या आहेत. भरकटलेल्या मनाच्या आहेत. स्वतःच स्वतःला ओळखून जगण्याच्या आहेत.

पुस्तकाची रचना ही अनुभवकथेच्या अंगाने जाणारी आहे. त्यामुळे यात डॉक्टर आणि होमिओपॅथी यांच्या दरम्यानची कथानके आलेली आहेत. लघुकथेसारखी लहान लहान तुकड्यांतून, गप्पांच्या ओघात आल्यासारखी आहेत. शेवटी होमिओपॅथी आणि त्याचा दवाखाना याच्यासंबंधी लोकप्रवाद काय आहेत, त्याचा आढावा घेतलेला आहे. त्यातून मनात शंका असणाऱ्यांचे समाधान नक्कीच व्हावे.

डॉ. प्रशात पाठक यांच्या अनुभवांना लेखनबद्ध करण्याचे उपचार त्यांचेच सहृद जी. बी. देशमुख यांनी पार पाडलेले आहेत. त्याबाबतची भूमिका त्यांनी मनोगतातून व्यक्त केली आहे. लेखन करताना ते ललित आणि रंजक कसे होईल याची त्यांनी मनापासून काळजी घेतलेली दिसून येते. लेखनाला निवेदनाचा बाज न देता प्रथमपुरुषी कथन पद्धतीने लिहिलेले आहे. त्यामुळे डॉ. प्रशांत पाठक आपल्याशी गप्पा मारीत आहेत, इतका सहजपणा त्यात आलेला आहे.

सतीश खानविलकर यांनी मुखपृष्ठ सजविलेले आहे.

**मूल्य १२० रु. ● सवलतीत ७५ रु.**

# ग्रंथपान




यशवंत मनोहर यांचा हा नवा कवितासंग्रह. त्याचे शीर्षक आहे 'बाबासाहेब...' या नावाचे. 'ग्रंथाली'ने डॉ. बाबासाहेबांच्या १२५ व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने खास उपक्रम राबविला. त्यांच्यावरील साहित्यजागराचा, त्यातले हे एक पुष्प. यशवंत मनोहर हे नाव मराठी साहित्यात रुजलेले नाव. आतापर्यंत त्यांचे प्रकाशित झालेले कवितासंग्रह म्हणजे. 'उत्थानगुंफा', 'काव्यभीमायन', 'मूर्तिभंजन', 'जीवनायन', 'प्रतीक्षायन', 'अग्नीचा आदिबंध', 'स्वप्नसंहिता', 'युगांतर', आणि 'युगमुद्रा'. या साहित्याने त्यांच्या कसदार आणि कलात्मकतेचा आनंद वाचकांना दिलेला आहे, तोच अनुभव हा नवा संग्रह देईल, वाचक तितकाच प्रतिसाद त्याला देतील, असा विश्वास वाटतो.

या संग्रहात दहा कविता आहेत. पैकी पहिलीच 'बाबासाहेब...' ही कविता दीर्घकविता आहे. उरलेल्या नऊ कविता या परिशिष्टातील कविता आहेत. त्यांच्यातही दोन भाग केलेले आहेत. त्यापैकी आ) मध्ये रमाईवरच्या सहा कविता आहेत. या कवितांना अनुसरून कवीने आपले मनोगत व्यक्त केले आहे. बाबासाहेबांविषयी केलेले चिंतन, असे त्याचे स्वरूप आहे. बाबासाहेबांचे द्रष्टेपण, त्यांचे सिद्धान्त, त्यांचे कार्य, त्यांना लाभलेली परिमाणे यांचा चिकित्सक पद्धतीने वेध कवीने घेतलेला आहे. त्यामुळेच कवितेइतकेच हे चिंतन स्थायी स्वरूपाचे वाटते.

*बाबासाहेब... मी तुमचे साहित्य वाचतो*
*म्हणजे मी तुम्हालाच वाचतो.*

संपूर्ण मानवी जीवन हाच अगाध विषय बाबासाहेबांच्या सर्वांगीण चिंतनाचा होता, असे ते मानतात.

*बाबासाहेब... मोसम बदलत आहे सांधा*
*तुम्ही लावलेल्या चांदण्यांचा वाफा फुलतो आहे*
*खुद्द पाण्यानेच दुनियेच्या तहानेला तुमचा पत्ता दिलेला आहे.*

बाबासाहेबांचे संपूर्ण साहित्य म्हणजे मानवी जीवनाच्या नव्या रचनेचेच बृहत संविधान आहे. त्यामुळे कवी त्यांना सुधारक मानीत नाही, त्यांना क्रांतिकारक मानतात. म्हणूनच ते कवितेतून व्यक्त होतात,

*'मला मोडायला आणि वाकवायला*
*आलेली दुःखे*
*प्रेरके म्हणून वापरण्याची क्रांतिविद्या*
*मी तुमच्यापासून शिकलो.*

कवी म्हणतात, बाबासाहेबांचा पुनर्रचनासिद्धान्त हा सुधारणासिद्धान्त नव्हे. तो संपूर्णच विद्यमान मानवी जीवनाच्या संपूर्ण नव्या मांडणीचा, संपूर्ण नव्या पर्यायाच्या रचनेचा नवा सिद्धान्त आहे.

*प्रॉमिथिअसने मानवता वाचविण्यासाठी*
*केवळ ग्रीक देवांविरुद्ध बंड केले*
*आणि तुम्ही तर संपूर्ण विश्वातील*
*देव-दैवाला निर्णायक आग लावली.*

बाबासाहेबांना समोर ठेवून लिहिलेली ही प्रदीर्घ कविता, अनेक संदर्भ देते, प्रखर जाणिवांना मोकळे करते आणि या महामानवाच्या प्रकाशाने उजळलेली आपली वाट आहे, हेही विदित करते. विश्वाला गवसणी घालते, नव्या सिद्धान्तांना जन्म देते. रमाईविषयीची मातृत्वाची भावनाही तितकीच हळुवारपणे ते व्यक्त करतात,

*तूज आम्ही पाहिले नाही तरी आम्ही नाही अनाथ*
*तू तेल दिव्यातील अमुच्या अन् अखंड जळती वात.*

बाबासाहेबांविषयीच्या भावना, त्यांच्याविषयीचे चिंतन, त्यांच्या उक्तीकृतीतून व्यक्त झालेले सिद्धान्त कवितेत व्यक्त होत असताना जणू आपलीच भावना व्यक्त करीत आहे असे वाटत राहते. तिच्यातली तरलता, तीव्रता थेट आपला ठाव घेते. वर्तमान आणि भूतकाळ यांना जोडणारा प्रतिबिंबाचा सिंद्धान्त म्हणजे बाबासाहेब, ही संकल्पना मांडणारे सतीश भावसार यांचे मुखपृष्ठही तितकेच तरल आहे.

**मूल्य २०० रु. ● सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

'मळवट' हा फ. मुं. शिंदे यांचा नवाकोरा कविता संग्रह. मुखपृष्ठ पाहताच हबकून थांबलो. बैलगाडीचं चाक, तेही धाव नसलेलं, एक पाटा निघालेलं, त्याचे दोन आरे निराधार सुळक्यांसारखे, नावेच्या इडीत उगवलेलं पिंपळाचं हिरवं दोन पानांचं कोवळं रोप. आणि नावेच्या खाली लालभडक मळवटाचा पट्टा, चंद्राच्या आकाराचा, जणू निखळलेला पाटा असावा असा. त्याच्या बाजूला चिकटून राहिलेली नीळसर खपली, कधीकाळी दिलेल्या रंगाची, वैभवाची आठवण करून देणारी. ते पाहताना मन चर्रर्र झालं. बैलगाडी, बैल आणि गाडी ही जोडी म्हणजे शेतकऱ्याच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक. हात आणि पाय असल्यासारखे. वैभवात नसला तरी शेतकरी समाधानी दिसायचा तो अशा बैलगाडीतून जायचा, यायचा तेव्हा. ते वैभवच असायचं त्याचं. आज मात्र हे वैभव असं कुडाच्या कडेला, मेडीला टेकून उभं असलेलं दिसतं, तेव्हा लक्षात येतं, वैभवाच्या या उरलेल्या स्मृती आहेत. शेतकरीही उरला आहे तो असाच. सारा कवितासंग्रह वाचून काढला, झपाटल्यासारखा. यात दडलेलं जीवन हे केवळ शेतकऱ्याचं नाही, तमाम कृषकाचं, त्यावर अवलंबून असलेल्या जीवांचं, त्यांचं आपलं असणार, आजच्या व्यवस्थेचं असणार याची खात्री वाटत होती, ती खरी ठरली. नव्हे वास्तवच समोर उभे राहिलं.




*काडी पडली की सुडी पेटते, जळून जाते वैरण*
*आणि शिल्लक राखेतलं मन!*

'सुडी' या कवितेतल्या ओळी मनावर सुडीची राख पसरवत जातात. ही एक रचना आहे पोटाची, परंतु ती पेटवतो कोण, हंगाम की महंत? कवी शेवटी जेव्हा हा प्रश्न वाचकाच्या समोर ठेवतात, तेव्हा सगळी नियंत्रण करणारी व्यवस्था आणि तिच्याखाली जळून खाक होणारा माणूस नजरेसमोर उभा राहतो.

*हरेक हंगाम हरेक फुलोरा हेरेक पीक,*
*सगळंच नवं असतं शेताला हमेशा;*
*आणि शेताच्या मुदगेवर ऋतूचा गोषा!*

किंवा,

*रानातल्या काशा काढल्या झाडून कचरा गोळा केला*
*की त्याचा पुंजाणा दिसू लागतो हसू लागतो जीव जणू स्वतःस!*

या ओळी वाचताना शेत, शेती, शेतकरी यांच्या वास्तवाचं चित्रण उभं राहतं. आपण स्वतः शेतात उभे राहून काशा-हरळीच्या वाळल्यासारख्या दिसणाऱ्या मुळ्या. नांगरल्यानंतर उघड्या पडलेल्या गोळा करतो आहोत असे वाटत राहते. पण या काशा शेतात नाही तर समाजातही रुजलेल्या आहेत, ज्यांचा नायनाट केला की आपोआप हसू पसरते, समाधानाचे.

यातल्या सगळ्या कविता वाचताना कितीतरी शब्द पुन्हा भेटायला आले, जे मातीशी, मातीतल्या माणसांशी, त्यांच्या दैनंदिन व्यवहाराशी आपली नाळ घट्ट जोडून आहेत. त्यांच्या भेटीने मनापासून आनंद झाला. हे ते काही इष्टमित्र : बटई, धुरे, कुपाट्या, इसार, काशा, गुल्हेर, आडतीत, बिटात, अश्राप, दुखलं-खुपलं, मुकं जनावर, काजळी, साटेलोटे, पांग, चरत, लेंड्या, निऱ्या, ढळता ढळत, काहीबाही, बिलगत, सालोसाल, पाळू, भावली, हरसाली, हंगाम, पितरं, इचू, सुडी, पेंढी, धांडे, आहाळून, धुरा, पान लागले, आबादानी, खुंदळू, जिभाळी. ही कविता आशय, लय, ताल आणि नाद यांचा आनंद देते, अंतर्मुख करते. तशी कल्पनेच्या उत्कट आविष्कारात प्रकटते,

*पाणी तहानेचा प्रियकर गळ्यातला अपरंपार*
*तहान प्रियकराच्या शोधात काठावरच व्याकुळ अपार.*

जमिनीवर पडलेला सोनमोहराचा चोथा हा जणू तिचा मळवट आहे, ही कल्पना तर स्तब्ध करून टाकणारी. आणि तिला आकार देणारे सतीश भावसार यांची कल्पनाही तितकीच समर्पक!

**मूल्य १०० रु. ● सवलतीत ६० रु.**

## ग्रंथपान

'बाबासाहेबांनी आपल्याला विभूतिपूजा नाकारायला सांगितली; मग आपण निव्वळ पुतळेच का उभारत बसलो? विचार आणि फक्त विचारांचे मोठेपण मानण्याऐवजी आपण केवळ धर्मभोळेपणातच का गुरफटलो? राजकारणाचे नवे अध्याय जगाला सांगणाऱ्या नेत्याचे आपण अनुयायी सर्वच आघाड्यांवर का पराभूत झालो? शिका-संघर्ष करा-संघटित व्हा असा ऊर्जामंत्र ज्याने दिला त्याच्या लेकरांनो, आपण कायम एकमेकांशीच का भांडत राहिलोत? आंबेडकरांचे विचार जगविणे आणि सर्वदूर पसरविणे अगत्याचे आहे. लोक हो, त्यासाठी हवी प्रचंड इच्छाशक्ती, एकजुटीची ताकद आणि चारित्र्याची संपन्नता. या गोष्टींपासून आपण दूर, विलग झालोत... तर याद राखा, आंबेडकरी विचारांचे मारेकरी दुसरे कुणीही नव्हे तर आपणच ठरणार.' इतका धाडसी आणि तितकाच अंतर्मुख करणारा विचार क्वचितच स्वकीयांमध्ये मांडला जाऊ शकतो. इथे तो मांडलेला आहे, 'महासूर्य' या नाटकातून डॉ. सुनील रामटेके या नाट्यशास्त्र पारंगत आणि नाट्य चळवळीशी नाते असलेल्या नाटककाराने.




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर आधारित नाटकाची ही संहिता आहे. डॉ. बाबासाहेबांचे कार्य, विचार आणि व्यक्तिमत्त्व उत्तुंग आहे. त्यांना नाटकासारख्या तीन तासांच्या प्रयोगात बसवणे तसे अवघड काम. त्यातून त्यांच्या जन्मापासूनचा काळ घेतला तर हा आवाका खूपच मोठा होतो. आतापर्यंत डॉ. बाबासाहेबांवर झालेले लेखन, चरित्रापासून ते भाषणांपर्यंत, पाहिले तर ते मोठमोठ्या ग्रंथांच्या स्वरूपात झालेले दिसून येते. यापुढे हे ८० पानांचे नाटक म्हणजे महावृक्षाची एक फांदी ठरावी, अशी शंका प्रथमदर्शनी यावी. परंतु प्रत्यक्ष रंगमंचीय प्रयोग ज्यांनी अनुभवाला असेल, त्यांची खात्री पटली असणार, डॉ. बाबासाहेबांचा साक्षात अनुभव आम्ही घेतला, याचि देही... ज्यांनी नाही घेतला त्यांना मिळेल तो या नाटकाच्या वाचनातून.

डॉ. बाबासाहेबांच्या जीवनाचे कालखंड वाचकांच्या कायम स्मरणात आहेत. त्यांचे बालपण, शिक्षण, सयाजीमहाराज गायकवाड यांची उदात्तता, उच्च शिक्षण, राजकारण, घटनेचे शिल्पकार, नेहरू-गांधी विचारांशी असहमती, महाडचा सत्याग्रह, मनूस्मृतीचे दहन, काळाराम मंदिरप्रवेश, बौद्ध धर्माचा स्वीकार असे हे अनेक टप्पे. या सगळ्यांच्या पाठी पार्श्वभूमी आहे ती सवर्णांचा जातीय विद्वेष आणि स्वकीयांची सुरू असलेली भीषण अवहेलना. त्यातून निर्माण झालेली घुसमट, त्यातून बाहेर पडण्यासाठीची अस्वस्थ तळमळ, प्रखर बुद्धिमत्ता आणि प्रचंड अभ्यास. या सगळ्यांचे वास्तव प्रसंगरूपाने प्रेक्षकांच्या समोर मांडण्याचे धाडस म्हणजे कोलंबसाने समुद्रात शिडाच्या जहाजासह जगप्रवासाला निघण्यासारखेच. नाटककाराने या सर्व प्रसंगांना नेमक्या संवादातून पकडले आहे, उभे केले आहे. नाटकाची सुरुवात रामजीच्या महार रेजिमेंटने केलेल्या पराक्रमापासून होते. इंग्रज सरकार त्यांच्या कर्तबगारीची दखल घेते. परंतु त्याने हुरळून न जाता आपल्याभोवती पसरलेले भीषण वास्तव आपल्याला कसे गिळायला आसुसले आहे, याची जाणीव तिथेच करून दिली जाते. आणि नाटकाचा प्रवाह कुठे कसा वाहणार आहे, याची खूण वाचकाला सापडते. शेवटाकडे जाताना, डॉ. बाबासाहेब म्हणतात, 'मी कोणत्याही देवदेवतांची पूजा करणार नाही. भगवान बुद्ध विष्णूचा अवतार आहे ही गोष्ट मी मानणार नाही. मी अशी प्रतिज्ञा करतो की, आजपासून मी बुद्ध धम्माच्या शिकवणीनुसार आचरण करीन.'

वास्तवाला पारखून पाहायचे म्हणजे, विस्तवाला हातात धरून पाहण्यासारखे. परंतु नाटककाराने अख्खा कालखंड आपल्या आवाक्यात पकडण्याचा प्रयत्न कसोशीने केलेला आहे, हे निर्विवाद. हे नाटक म्हणजे डॉ. बाबासाहेबांचा उदोउदो करण्यासाठी केलेला प्रयत्न नाही, तर तो आहे, त्यांचे विचार पोच करण्याचा प्रयत्न, तोही एकूण २७ प्रसंगांतून. त्यासाठी शाहिराचा सूत्रधारासारखा उपयोग केलेला आहे, तसाच ध्वनीचा माध्यम म्हणून उपयोग केलेला आहे. जो काळाचे, घडणाऱ्या प्रसंगांचे कथानक आणि भान एकत्र गुंफून सादरीकरणाचा वेग कायम ठेवतात. यातले संवाद हे त्या प्रसंगाना आणि डॉ. बाबासाहेबांच्या विचारांना थेट पोचवण्याचे काम चपखल आणि प्रभावीपणाने करतात. नाटकाराचे यश आहे ते इथे.

नाटकाचा प्रवेश आणि डॉ.बाबासाहेबांची प्रतिमा यांचा सुरेख संगम आणि त्याला दिलेली गोल प्रभा, यामुळे सतीश भावसारांचे मुखपृष्ठ आकर्षक झाले आहे.

**मूल्य १२५ रु. ● सवलतीत ७५ रु.**